CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ९ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक ३१० | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# दहशतवाद थांबविल्यास चर्चा शक्य : राजनाथसिंह

## जम्मूतील सभेतून पाकिस्तानला सुनावले

◆ **बनिहाल, ८ सप्टेंबर**

**जम्मू-काश्मिरातील दहशतवादी कारवाया तत्काळ थांबवा, त्यानंतरच भारत चर्चेसाठी पुढाकार घेईल, अशा स्पष्ट शब्दांत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी रविवारी पाकिस्तानला सुनावले. भारतविरोधी दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तानचा हात राहिला असल्याची कबुली नुकतीच पाकी लष्कर प्रमुखांनी दिली आहे. त्यामुळे आता त्यांनी या मार्गावरून दूर व्हावे आणि भारतासोबतचे संबंध मजबूत करण्यासाठी दहशतवाद थांबवावा, असे राजनाथसिंह म्हणाले.**


जम्मू-काश्मीरच्या रामबान जिल्ह्यात भाजपाच्या प्रचारासाठी आलेले संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचे स्वागत करताना भाजपाचे नेते

रामबन जिल्ह्यात भाजपा उमेदवारांच्या समर्थनार्थ आयोजित सभांना संबोधित करताना राजनाथसिंह बोलत होते. आपल्या शेजारी देशांसोबत चांगले संबंध असावे, असे कुणाला वाटत नाही. आपण मित्र बदलवू शकतो, पण शेजारी नाही, ही वास्तविकता मलादेखील माहीत आहे. पाकिस्तानसोबतच्या संबंधात सुधारणा व्हावी, असे भारतालाही मनापासून वाटते, पण त्याआधी पाकिस्तानने भारतविरोधी दहशतवादी कारवाया थांबवाव्या आणि हीच आमची एकमेव अट आहे, असे राजनाथसिंह यांनी स्पष्ट केले.

**केंद्रात भाजपा असेपर्यंत कलम ३७०चा विचारही करू नका**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यास कलम ३७० पुन्हा लागू करण्यात येईल, असे आश्वासन काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स सातत्याने देत आहेत. मी त्यांना इतकेच सांगू इच्छितो की, केंद्रात जोपर्यंत भाजपाची सत्ता आहे, तोपर्यंत असा विचारही मनात आणू नका. आता ते कलम इतिहासजमा झाले आहे, असा जोरदार हल्ला राजनाथसिंह यांनी चढविला.

रामबन विधानसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार राकेश ठाकूर यांच्या प्रचारासाठी आयोजित रॅलीला संबोधित करताना राजनाथसिंह म्हणाले की, कलम ३७० निष्प्रभ करण्यात आल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील स्थितीत सकारात्मक बदल झाला आहे. तरुणांनी बंदुका आणि अन्य शस्त्र बाजूला सारून पोलिस आणि सुरक्षा दलांमध्ये भरती होण्यास प्राधान्य दिले आहे. त्यांच्या हातात लॅपटॉप आणि संगणक आले आहेत. स्थानिक लोकांचे समर्थन मिळत नसल्याने अतिरेकी हताश झाले असून, ते आता घात लावून भ्याड हल्ले करीत आहेत. जम्मू-काश्मिरातील शांतता आणि तरुणांच्या मानसिकतेत झालेला बदल काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सला पाहावत नसल्यानेच ते कलम ३७० पुन्हा लागू करण्याचे आश्वासन देत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीरच्या विकासासाठी अनेक योजना राबविल्या. येथील विकास पाहून व्याप्त काश्मिरातील नागरिकांनाही भारताचा हिस्सा बनण्याची इच्छा होत आहे. त्यांच्या मनात पाकिस्तानविषयी प्रचंड चीड आहे. मी व्याप्त काश्मिरातील लोकांना आवाहन करतो की, त्यांनी देखील भारतात यावे. पाकिस्तान तुम्हाला विदेशी समजत असला तरी, आम्ही तुम्हाला भारताचाच एक भाग समजतो, असेही राजनाथसिंह यावेळी बोलताना म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

त्वमेव केवलं कर्ताऽसि । त्वमेव केवलं धर्ताऽसि ।


ऋषिपंचमीच्या पावन पर्वावर पुण्यातील जगप्रसिद्ध दगडूशेठ गणेश मंडळाच्या परिसरात रविवारी सकाळी सुमारे ३५ हजार महिलांनी 'अथर्वशीर्ष'चे पठन केले. यावेळी सर्व महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी येथे महिला 'अथर्वशीर्ष' पठन करीत असतात
(सविस्तर वृत्त पान २ वर)

## कंगनाच्या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र

### 'इमर्जन्सी'मधील तीन दृश्ये वगळणार

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

हिमाचलप्रदेशची खासदार आणि अभिनेत्री कंगना राणावतच्या चित्रपट 'इमर्जन्सी'ला सेन्सॉर बोर्डने यू/अ प्रमाणपत्र दिले आहे. सीबीएफसीने या चित्रपटाच्या अनेक दृश्यांवर आक्षेप घेतला आहे, त्यामुळे हा चित्रपट अनेक कट आणि बदलांनंतर काही आठवड्यात प्रदर्शित होणार आहे.

सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटातील तीन दृश्ये वगळण्याच्या सूचना दिल्या आहेत. चित्रपट प्रदर्शित करण्यापूर्वी त्यात दहा बदल करावे लागतील, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

या चित्रपटाबाबत शीख संघटनांनी आक्षेप घेतला होता, त्यामुळे सीबीएफसीने प्रमाणपत्र रोखून धरले होते. कंगनाने सांगितले होते की, प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे हा चित्रपट नियोजित वेळेवर प्रदर्शित होऊ शकला नाही. *(वृत्तसंस्था)*

## आरोपींना भारतीय लोकशाही बदनाम करायची होती

### संसद सुरक्षाभंग प्रकरणी पोलिसांचे आरोपपत्र

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

मागील वर्षी १३ डिसेंबर रोजी संसदेच्या सुरक्षाभंगाच्या आरोपींना भारतीय लोकशाहीला बदनाम करायचे होते. त्यांना अल्पावधीत जागतिक कीर्ती मिळवायची होती, सत्ता बळकावायची होती आणि लोकशाहीचे प्रतीक असलेल्या संसदेला लक्ष्य करून समृद्धी व प्रसिद्धी मिळवून घ्यायची होती, असे दिल्ली पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या आरोपपत्रात नमूद आहे.

आरोपींची पहिले समाज माध्यमावर भेट झाली आणि २००१ च्या संसदेवर झालेल्या हल्ल्याच्या स्मृतिदिनानिमित्त गेल्या वर्षी योजनेला अंतिम रूप देण्याआधी सुमारे दोन वर्षे त्यांनी हालचालींची योजना आखली. त्यांची पहिली वैयक्तिक भेट फेब्रुवारी २०२२ मध्ये म्हैसूर येथे झाली होती. आरोपपत्राचा हवाला देऊन सूत्रांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, आरोपींनी योजनेला अंतिम रूप देण्यासाठी आणि योजना साकार करण्यासाठी पाच बैठका म्हैसूर, गुरुग्राम आणि दिल्ली येथे घेतल्या. एक हजार पानांचे विस्तृत आरोपपत्र जूनमध्ये पटियाळा हाऊस कोर्टात दाखल करण्यात आले होते. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### चहाप्रेमींच्या खिशाला बसणार फटका

**नवी दिल्ली :** देशात चहा विकणाऱ्या दोन मोठ्या कंपन्या हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड



लवकरच चहाच्या किमती वाढवणार आहेत. चहाचा कमी होत असलेला साठा आणि वाढत्या खर्चाचा परिणाम चहाच्या किमतीवर होऊ शकतो आणि लवकरच मोठ्या कंपन्या किमती वाढवू शकतात. याचा थेट परिणाम बाजारात उपलब्ध असलेल्या चहाच्या किमतीवर होणार आहे. त्यामुळे ग्राहकांना आता चहा पिण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागणार आहेत.

### मध्य महाराष्ट्र, विदर्भात जोरदार पावसाची शक्यता



**पुणे :** राज्यात गणेशोत्सवाला सुरुवात झाली असताना, पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवली. पुणे जिल्ह्याला पुढील दोन दिवस ऑरेंज अलर्ट देण्यात आला. कोल्हापूरला यलो अलर्ट देण्यात आला. विदर्भातील सर्व जिल्ह्यांना पुढील काही दिवस यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या मते, कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता वाढली आहे. ही क्षेत्र आता वायव्य आणि लगतच्या मध्य बंगालच्या उपसागरावर ठळक कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस कोकण, गोव्यात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाडा व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत सोमवारपासून चार दिवस काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### डॉक्टर हत्या प्रकरणाची आज सुप्रीम कोर्टात सुनावणी

**नवी दिल्ली :** कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटवर अपलोड केलेल्या खटल्याच्या यादीनुसार, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या न्यायासनासमोर ९ सप्टेंबर रोजी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. कोर्ट स्वतःहून दखल घेत या प्रकरणाची सुनावणी करत आहे.

# हरयाणात काँग्रेस-आप आघाडी जमेना

### काही जागांसाठी 'आप' अडला

### काँग्रेस, भाजपाच्या बंडखोरांवर नजर

**नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

हरयाणा विधानसभेची निवडणूक जवळ येत असतानाच सर्व राजकीय पक्ष आघाडी, युती करण्यात व्यस्त आहेत. हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टी आणि काँग्रेस यांच्यात आघाडीची चर्चा अजूनही सुरूच आहे. निवडणुकीत दोन्ही पक्ष आघाडी करून रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. पण, काही मतदारसंघात आप काँग्रेसशी आघाडी किंवा तडजोड करण्याच्या मन:स्थितीत नाही.




आम आदमी पक्ष कलायत विधानसभा मतदारसंघात कोणतीही तडजोड करू इच्छित नाही. तसेच, कुरुक्षेत्रात किमान एका जागेची मागणी आपने केली आहे. अशा स्थितीत आप हा आपल्या पक्षाच्या दुसऱ्या योजनेवर लक्ष केंद्रित करीत आहे, ज्यात ते काँग्रेस आणि भाजपाच्या बंडखोरांवर लक्ष ठेवून आहेत. काँग्रेस आणि आप यांच्यात काही ताळमेळ साधला नाही, तर आम आदमी पार्टी काँग्रेस-भाजपा बंडखोरांसह इतर उमेदवारांना तिकीट देऊन आपली यादी जाहीर करेल. याविषयी आपचे नेते राघव चड्ढा म्हणाले, मला काही जागांबाबत कोणतेही वैयक्तिक वक्तव्य करायचे नाही. मी एवढेच सांगू शकतो की, दोन्ही पक्षांची आघाडीची इच्छा आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १२ सप्टेंबर आहे आणि आम्ही १२ सप्टेंबरपूर्वी निर्णय घेऊ. आमची आघाडी झाली नाही किंवा विजयाची परिस्थिती निर्माण झाली नाही आणि एकमत झाले नाही, तर आम्ही दुसरा मार्ग पत्करू. राघव चड्ढा यांच्या आधी आपचे आमदार सोमनाथ भारती यांनी काँग्रेससोबतची आघाडी चुकीची असल्याचे म्हटले होते आणि राहुल गांधी, प्रियांका वढेरा व मल्लिकार्जुन खडगे यांना काही प्रश्न विचारले होते. हरयाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी ५ ऑक्टोबरला मतदान होणार असून, मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

### अबुधाबीचे युवराज दिल्लीत दाखल

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

अबू धाबीचे वली अहद (युवराज) शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांचे दोन दिवसांच्या भारत भेटीचा एक भाग म्हणून रविवारी नवी दिल्लीत आगमन झाले. त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. येथील मुक्कामात ते पश्चिम आशियातील वाढत्या तणावादरम्यान ऊर्जा आणि कनेक्टिव्हिटीसह विविध क्षेत्रांतील द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर चर्चा करतील. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी त्यांचे विमानतळावर स्वागत केले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, त्यांची भेट ऐतिहासिक संबंधांमधील एक नवीन मैलाचा दगड ठरणार आहे. वली अहद अल नाह्यान यांच्यासोबत यूएई सरकारचे अनेक मंत्री आणि व्यापारी शिष्टमंडळ आहे. *(वृत्तसंस्था)*

## मुंबई झाली जगातील अब्जाधीशांची राजधानी

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई महानगर जगातील सर्वांत जास्त अब्जाधीश असलेले शहर बनले आहे. हुरुन इंडिया रिच लिस्ट २०२४ च्या अहवालानुसार, मुंबईने चीनची राजधानी बीजिंगलाही मागे टाकले आहे. यापूर्वी बीजिंग हे जगातील सर्वांत जास्त अब्जाधीश असणाऱ्यांचे शहर होते. आता मुंबईने हा मान पटकावला आहे.

**बीजिंगला टाकले मागे**

बीजिंगमध्ये वर्षभरात अब्जाधीशांच्या संख्येत जवळपास २८ टक्क्यांची घट झाली आहे. मागील एका वर्षात मुंबईतील श्रीमंतांमध्ये ५८ नव्या अब्जाधीशांची भर पडली आहे. यामुळे शहराची एकूण संपत्ती ४७ टक्क्यांनी वाढली. अलिकडच्या काळात मुंबईत अब्जाधीश असणाऱ्या लोकांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. या कारणाने मुंबई जगातील सर्वांत जास्त अब्जाधीश असणाऱ्या लोकांचे शहर झाले आहे. यामुळे मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, जगात नावलौकीक झाला आहे. *(वृत्तसंस्था)*

**सर्वाधिक अब्जाधीश असणारी १० शहरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुंबई ३६५ | नवी दिल्ली २१७ | हैदराबाद १०४ | बुंगळुरू १०० | चेन्नई ८२ |
| कोलकाता ६९ | अहमदाबाद ६७ | पुणे ५३ | सुरत २८ | गुरुग्राम २३ |

# एक महिन्यात लाखो पदवीधरांना नोकऱ्या देणार बँकिंग क्षेत्र

**मुंबई :** बँका येत्या महिनाभरात २५ वर्षाखालील पदवीधरांना नोकऱ्या देणार आहे. यामुळे देशातील लाखो तरुण-तरुणींना रोजगार मिळणार आहे. या नोकऱ्या ॲप्रेंटिसच्या स्वरूपातील असतील. इंडस्ट्री लॉबी ग्रुप इंडियन बँक्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मेहता यांनी ही माहिती दिली. या कार्यकाळात विशिष्ट कौशल्यांचे प्रशिक्षण घेतलेल्या अशा इंटर्नसना बँका दरम हा पाच हजार रुपये मानधन देणार आहेत. बँकांमध्ये अशी अनेक क्षेत्रे आहेत, जिथे कुशल मनुष्यबळाची गरज आहे. त्यामुळे तरुण वर्गाला प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मिती केली जाणार आहे. ॲप्रेंटिससाठी अर्ज करणारा उमेदवार २१ ते २५ वर्षे वयोगटातील असावा आणि तो पदवीधर असावा. प्रशिक्षण घेतलेल्या पदवीधरांपैकी काही जणांचा कर्मचारी म्हणून बँकेत समावेश केला जाण्याची शक्यता आहे.

## युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी भारत-चीनची महत्त्वाची भूमिका : जॉर्जिया मेलोनी

**रोम :** रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतिन यांच्यानंतर आता इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी भारत किंवा चीन महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे म्हटले आहे. मेलोनी यांनी इटालियन शहर चेरनोबिलमध्ये युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. बैठकीनंतर मेलोनी म्हणाल्या, जगात जेव्हा जेव्हा नियम मोडले जातात, तेव्हा अराजकता आणि तणावाची परिस्थिती निर्माण होते. हे संकट टळले नाही, तर ते आणखी पसरेल. मी चीनच्या नेत्यांनाही हेच सांगितले. त्यामुळेच मला असे वाटते की, भारत आणि चीनसारखे देश युक्रेन युद्ध संपवण्यासाठी महत्त्वपूर्ण सिद्ध होऊ शकतात.




# चिमुकल्यांना मोबाईलमुळे कोरड्या डोळ्यांची समस्या

**नव्या संशोधनातील निष्कर्ष**



◆ **न्यू यॉर्क, ८ सप्टेंबर**

सध्याचे युग हे समाज माध्यमांवरील ट्रेंड आणि मिम्सचे आहे. मोबाईल प्रत्येकाच्या हाती पोहोचला आहे. मात्र, लहानांच्या हाती तो प्रमाणाबाहेर वेळेत वास्तव्यास आहे. याचा प्रतिकूल परिणाम मुलांच्या एकाग्रतेवर, डोळ्यांवर होतो आहे. हाताची बोटे, मान, पाठ, खांदे सारे काही प्रभावित होत आहे. त्यामुळे पालक मुलांच्या हातातील मोबाईल काढून घेताना दिसतात. अरे, इतका मोबाईल पाहू नको, असे पालक सांगतात. पण आता विज्ञान अभ्यास सांगत आहेत की पालक म्हणतात ते अगदी बरोबर आहे.

अमेरिकन अकॅडमी ऑफ चाइल्ड ॲण्ड ॲडॉलेसेंट सायकॅट्रीच्या मते, मुलांचा वाढता स्क्रीन टाईम भविष्यात मोठी समस्या ठरू शकतो. यामुळे अनेक आजारांचा धोका वाढू शकतो. इंडियन जर्नल ऑफ ऑप्थॅल्मोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जास्त वेळ स्क्रीन पाहिल्यामुळे मुलांमध्ये कोरड्या डोळ्यांची समस्या वाढत आहे. *(वृत्तसंस्था)*

### स्क्रीन टाईममुळे समस्या वाढत आहेत

कोरोना महामारीनंतर जसे निर्बंध शिथिल होऊ लागले, तसे सर्व व्यवहार पूर्वपदावर येऊ लागले. दरम्यान, प्रत्येकाच्या लक्षात आले की त्यांच्या स्क्रीन टाईममध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या काळात मुले अभ्यासासाठी स्क्रीनवर अवलंबून असल्याने त्यांच्यासाठी ही समस्या आणखी मोठी झाली. अभ्यासाव्यतिरिक्त ते स्क्रीनवर बराच वेळ घालवू लागले, जो आजतागायत सुरू आहे. आता त्याचे तोटे दिसू लागले आहेत.

### अति स्क्रीन पाहण्याचे तोटे

**● झोप न लागणे ● डोळे कोरडे होणे ● स्वत:विषयीची उदासीनता ● स्वत:च्या शरीराबाबत न्यूनगंडाची भावना ● पुस्तकांपासून दुरावा ● निसर्गापासून नाते तुटले ● शाळेत खराब कामगिरी ● लठ्ठपणाचे प्रमाण वाढणे ● मन एकाग्र न होणे**

### उपाय कोणते?

**● मुलांच्या मोबाईल वापरासाठीची मर्यादा पालकांनी ठरवून द्यावी ● जेवताना मोबाईल पाहण्यावर बंदी असावी ● शाळेच्या आवारातही मोबाईलला मज्जाव असावा ● घरी आणि शाळेत खेळाचा तास सक्तीने मैदानावरच असावा ● पालक आणि शिक्षकांनी वैयक्तिकरीत्या चिमुकल्यांना पुरेसा वेळ द्यावा.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर

**मुंबई, दि.८ सप्टेंबर :**

भाजपाचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे दोन दिवसाच्या दौऱ्यासाठी मुंबईत रविवारी सायंकाळी दाखल झाले. छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर त्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले. विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता कधीही जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षातील घडामोडींना वेग आला असताना महायुतीचे जागा वाटपाचे धोरण तयार करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज सायंकाळी मुंबईच्या दौऱ्यावर आले असल्याने त्याला राजकीय दृष्टीही महत्त्व प्राप्त झाले आहे. शाह यांनी आज रात्री मुंबईतील एका वृत्तपत्राने बनविलेल्या डाक्युमेंट्रीचे अनावरण केले. सोमवारी ते लालबाग बागच्या राजास विविध राजकीय नेत्यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीची दर्शन घेणार आहेत. सकाळी१०.४५ वाजता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर गणपतीचे दर्शन घेतील .त्यानंतर सव्वा अकरा वाजता वर्षा बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री च्या गणपतीचे दर्शन घेतील तर सव्वा बारा वाजता लालबागच्य राजाचे दर्शन घेणार आहे त्यानंतर १२.५० वाजता वांद्रे येथे मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार यांच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे गणरायाचे दर्शन घेतील. दरम्यानच्या काळात ते पक्षाचे नेत्यांशी राजकीय परिस्थितीबाबत व विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करणार असल्याचे समजते.




### जुने सवंगडी अनेक वर्षांनी बार्शीत भेटले

**बार्शी, दि. ८ सप्टेंबर-**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १९८० साली इयत्ता दहावी डच्या वर्गात शिक्षण घेतलेल्या तत्कालीन माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संत तुकाराम सभागृहात उत्साही वातावरणात पार पडला. या स्नेहमेळाव्यात माजी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक कालखंडातील संस्मरणीय आठवणींना उजाळा दिला. यावेळी महाराष्ट्र विद्यालयातील माजी जेष्ठ शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. या स्नेहमेळाव्यात समाजाच्या विविध क्षेत्रातील कार्यरत कर्तबगार व्यक्तींनी आपल्या प्रगतीपथावरील वाटचालीचे श्रेय आपल्या गुरुजनांनाच दिले व आपल्या मनोगतामध्ये गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास तत्कालीन १० वी ड च्या वर्गातील विद्यार्थी व महाराष्ट्र गृहनिर्माण मंत्रालयाचे सल्लागार राजेंद्र मिरगणे, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, गणेश सोळंकी, शहाजी जाधव, रमेश काटे, अशोक पाटील, प्रदीप पडवळ, शिवाजी डोईफोडे, श्रीकांत ताकभाते, नागनाथ झांबरे, चंद्रकांत गटकळ, बाळासाहेब करंजकर, प्रमोद जाधव, अरुण शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी तत्कालीन कार्यरत शिक्षक व माजी मुख्याध्यापक दशरथ जगताप, भगवान गव्हाणे, उपमुख्याध्यापक संजय बागल, माईनकर, उत्तमराव मते, लक्ष्मणराव वाघमारे आदी गुरुजनांसह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थी व महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### मेट्रो मॅन ऑफ इंडिया ई. श्रीधरन, जॉर्ज फर्नांडिस पुरस्काराने सन्मानित

**मुंबई, दि.८ सप्टेंबर-**

जॉर्ज फर्नांडिस यांनी रेल्वेमंत्री असताना कोकण रेल्वे प्रकल्प राबविण्याचे जाहीर केले आणि संरक्षण मंत्री झाल्यानंतरही हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लक्ष दिले होते. अशा मंडळींच्या इच्छाशक्तीमुळेच हा प्रकल्प ७ वर्षाच्या आश्चर्यकारक कालावधीत पूर्ण झाला, जॉर्ज फर्नांडिस आक्रमक कामगार नेते होते, परंतु व्यक्तिगत आयुष्यात साधी राहणी होती. त्यामुळेच त्यांच्या नावे मिळणारा पुरस्कार हा खरोखरच आनंदाचा क्षण असल्याच्या हृद्य भावना मेट्रो मॅन ऑफ इंडिया' पद्मविभूषण डॉ. ई. श्रीधरन यांनी व्यक्त केल्या. माजी रेल्वे आणि संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस स्मृती राष्ट्रीय पुरस्कार यंदा डॉ. श्रीधरन यांना बंटर भवन, कुर्ला येथे झालेल्या सोहळ्यात जयश्रीकृष्ण परिसर प्रेमी समितीच्या वतीने प्रदान करण्यात आला. संस्थापक टी. जयाकृष्ण शेट्टी यांच्या पुढाकाराने आयोजित या सन्मान सोहळ्यात खासदार कॅप्टन ब्रिजेश चौटा, माजी खासदार गोपाळ शेट्टी उपस्थित होते. श्रीधरन यांनी राबविलेले कोकण रेल्वे, दिल्ली, कोची, लखनौ, जयपूर, विजयवाडा, कोईमतूर आदी ठिकाणची मेट्रो निर्मिती ही आज काळाची गरज होती. त्यावेळी घेतलेले निर्णय धाडसी आणि अचूक असल्यामुळेच आज आपला देश गतिमान झाला आहे आणि अर्थव्यवस्था बळकट करत आहे. राष्ट्राच्या विकसनशील प्रक्रियेतील श्रीधरन यांचे योगदान सदैव प्रेरणादायी आहे, असे विचार टी. जयाकृष्ण शेट्टी यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच मंगळुरु आंतरराष्ट्रीय विमानतळाला जॉर्ज फर्नांडिस यांचे नाव देण्यासाठी सर्व पक्षीय नेत्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनदेखील त्यांनी केले.

# मराठा आरक्षणावर विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे

## आ. राजेंद्र राऊत : विधानसभा अध्यक्षांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ सप्टेंबर-**

मराठा आरक्षण ओबीसीतून द्यावे या मागणी संदर्भात विधानसभेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावण्यात यावे, अशी मागणी करणारे पत्र आज सकाळी पत्रकार परिषदेत आ. राजेंद्र राऊत यांनी वाचून दाखवले.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मराठा आरक्षणासंदर्भात विविध मागण्या समोर येत आहेत. त्यापैकी ओबीसीतून मराठा आरक्षण ही मागणी सतत होत आहे. त्यावर मोठ्या प्रमाणात राजकारण चालू असून त्यामुळे राज्यात असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे काही जिल्ह्यात तर ओबीसींना मराठा यांनी बोलण्याचे नाही, एकमेकांच्या सुख-दु:खात जायचे नाही. हॉटेल, दुकान, पानटपरी अशा ठिकाणी एकमेकांच्या दुकानातून माल खरेदी करावयाचे नाही, असे प्रकार मोठ्या प्रमाणात चालू झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात मणिपूर होतो की काय अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. प्रत्येक राजकीय पक्ष वेगळी वेगळी भूमिका घेतात. तरी दुधाचे दूध व पाण्याचे पाणी होण्यासाठी प्रत्येक आमदारांनी आपल्या भूमिका विधानभवनात सर्व राज्यांसमोर मांडण्यात. ज्या मराठा बांधवांना ओबीसीतून आरक्षण हवे त्यांना द्यावे किंवा नाही यावर आपले मत व्यक्त करावे व ज्या मराठा बांधवाला ओबीसीतून नको त्यांनी प्रतिज्ञा पत्र देऊन आम्हाला ओबीसीतून नको असेल तर शासनास कळवावे. अशा पद्धतीवर मतदान घ्यावे व आपल्या पक्षाची व व्यक्तीश: प्रत्येक आमदारांनी आपली भूमिका संपूर्ण राज्यासमोर मांडावी याकरिता आपण विधानसभेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवावे व महाराष्ट्राला मणिपूर होण्यापासून वाचवावे, अशी मागणी त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यावेळी भारत पवार, सुधीर बारबोले, कार्यकर्ते उपस्थित होते.



### सर्व मंत्र्यांना देणार पत्र

हे पत्र कुरियरद्वारे सर्व मंत्रीगण, सर्व पक्षांचे प्रमुखांना पाठवणार आहेत. तसेच प्रत्यक्ष सर्व पक्षांच्या कार्यालयात जाऊन भेट घेणार असल्याचे सांगितले.

**मुद्दा आरक्षणाचा**

# आ. राजेंद्र राऊत यांचे बोलविते धनी फडणवीस

## जरांगे-पाटील यांचा आरोप
## विरोधकांनाही फिरु देणार नाही

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि सप्टेंबर**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या टिकेवर आ. राजेंद्र राऊत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले होते. त्यानंतर शनिवारी मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा आ. राजेंद्र राऊत यांच्यावर शरसंधान साधले. आपण आ. राजेंद्र राऊत यांचे चॅलेंज स्वीकारले असून त्यांनी आधी महायुतीच्या नेत्याची भूमिका लिहून आणावी, असे आव्हान देत विरोधकांनी लिहून दिले नाही तर त्यांना महाराष्ट्रात फिरु देणार नाही.

आ. राऊत यांचे बोलवते धनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असल्याचा टोला मारला.

जरांगे-पाटील म्हणाले, राजेंद्र राऊत यांनी चूक केली, त्यांनी मला छेडलं. आता त्यांनी फितुरीचे संस्कार दाखवू नयेत. निवडणुकीत पडलं किंवा जिंकलं तरी चालेल. पण तुमचे संस्कार दाखवू नका. देवेंद्र फडणवीसांनी एक नवा डाव टाकला आहे. सगळी कोलीत त्यांच्या हातात आहेत. मी उगाच कोणाला बोलत नाही. फितुरीचे बळ देवेंद्र फडणवीसांनी राऊतांना दिले आहे. बाकी कोणाला ओबीसी एक होत नाही, त्यामुळे देवेंद्र फडणवीसानी डाव रचला आहे. त्यामुळे आ. राजेंद्र राऊतांना दोष देऊन उपयोग नाही असं म्हणत मनोज जरांगे-पाटील यांनी राजेंद्र राऊत यांच्या टिकेला उत्तर दिलं आहे. आरक्षणाबाबत महाविकास आघाडीची हमी घ्या, या आव्हानावर बोलताना जरांगे-पाटील म्हणाले, मी कशाला लिहून आणू? तुम्ही आणून द्या, तुम्ही सत्तेत आहात. आधी तुमची भूमिका सांगा. लिहून द्या, त्यांच्याकडून कागद घेऊन लिहून आणा. विरोधकांनी लिहून दिला नाही तर त्यांना महाराष्ट्रात फिरु देणार नाही, असे सांगितले. आता आरसा क्लिअर आहे, मी इमानदारीने शब्द देतो. दिलेला शब्द मी मागे घेत नाही. तुम्ही लिहून आणा आणि दाखवा मला पण दाखवू नका. बार्शीतील कोणत्याही मराठा समाजाच्या बांधवाला दाखवा. तुम्ही सत्तेत आहात तर करुन दाखवा असं उलट आव्हान जरांगे-पाटील यांनी आ. राजेंद्र राऊत यांना दिले आहे.



### जरांगे-पाटलांचा लवकरच बार्शी दौरा

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील व आ. राऊत यांच्यात आरोप-प्रत्यारोप झाल्यानंतर बार्शी तालुक्यातून पं. स. चे माजी सभापती युवराज काटे, माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, कपिल कोरके, आनंद काशीद यांच्यासह बार्शी तालुक्यातून शेकडो मराठा समाजबांधव वाहनांचा ताफा घेऊन आंतरवाली सराटी येथे गेले होते. जरांगे-पाटील यांनी संबंधितांशी चर्चा केली. यावेळी जरांगे-पाटील यांच्या बार्शी दौऱ्याची तारीख ठरली नाही. परंतु लवकरच दौरा होणार आहे.

# समितीची याचिका उच्च न्यायालयात दाखल

## सोमेश क्षीरसागर यांची माहिती
## अनगर अप्पर तहसील रद्द करण्याचे प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ सप्टेंबर-**

अनगर येथे नव्यानेच अपर तहसील कार्यालय मंजूर केल्याचा आदेश राज्य शासनाकडून पारित झालेला आहे. याला विरोध करण्यासाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली असून या समितीच्या माध्यमातून मागील अनेक दिवसापासून अनेक वेगवेगळ्या धाटणीची आंदोलने केली आहेत. तर मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याही भेटी घेऊन मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या सदस्यांनी आपली कैफियत मांडली. मात्र त्यावर कोणताही तोडगा निघत नसल्याने, समितीच्या वतीने न्यायालयीन लढा लढण्यासाठी ॲड. अनंत वडगावकर यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्या याचिकेचा दाखल क्रमांक २५९०४,/ २०२४ असा आहे, अशी माहिती मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीचे सोमेश क्षीरसागर यांनी माध्यमांना दिली.



अनगर येथे नव्याने मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी मोहोळ तालुक्यातून मोठी जनचळवळ उभी राहिली आहे. अनेक आंदोलने करून ही प्रशासन व शासनाला जाग येत नसल्याने मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या वतीने न्यायालयीन लढा लढण्याची तयारी केली आहे. याबाबत संघर्ष समितीचे सोमेश क्षीरसागर हे माध्यमांशी बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, या अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करताना महाराष्ट्र राज्य महसूल अधिनियम कायद्याची अंमलबजावणी झाली आहे काय? , हे कार्यालय नव्याने सुरू करत असताना त्याचे प्रसिद्धीकरण व नागरिकांच्या हरकती मागवल्या आहेत काय?, शासनाने व प्रशासनाने या कार्यालयाची निर्मिती करताना कोणत्या मूलभूत बाबी विचारात घेतल्या आहेत?, हे करीत असताना या अप्पर तहसील कार्यालयाच्या अखत्यारीत घेतलेल्या गावांतील नागरिकांच्या दळणवळणाचा तसेच इतर उपयुक्त साधनांचा विचार केला आहे का?, कारण समाविष्ट केलेल्या गावाचे अंतर तपासले असता ते अनगरपेक्षा मोहोळ हेच जवळचे, सोयीस्कर व मध्यवर्ती ठिकाण आहे हे दिसून येते. अनगर हे त्यांना आडवळणीचे व गैरसोयीचे होते आहे. तसेच कायदेशीरदृष्ट्या व लोकांच्या सोयीच्या दृष्ट्या शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे.त्याच बरोबर एखाद्या राज्याचा संविधानिक प्रमुखाने एखाद्या निर्णयाला स्थगिती दिली. तर त्या स्थगिती निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महसूल विभागाची असते. ती अद्याप का झालेली नाही. म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीला काहीच अर्थ नाही का?, मुख्यमंत्री हे राज्याचे संविधानिक प्रमुख असतात.त्यांचा हा अपमानच आहे. या सर्व बाबी दाखल केलेल्या याचिकेत नोंदविल्या आहेत, असे सोमेश क्षीरसागर म्हणाले.

### हे आहेत याचिकाकर्ते

काकासाहेब विठ्ठल खंदारे (नरखेड), चरणराज हनुमंत चवरे (पेनूर), आशिष नामदेव आगलावे (पोखरापूर), अनिल निवृत्ती कदम (पोखरापूर), शंकर भुजंगा जाधव (पाटकूल), संभाजी नामदेव कोकाटे (तांबोळे), आनंदकुमार श्रीरंग शिंदे (सारोळे), तुकाराम वामन भोसले (खवणी) समितीचे याचिकाकर्ते आहेत. या अगोदर मोहोळ बार असोसिएशनच्या वतीने ही एक याचिका दाखल केली आहे. तसेच अन्य दोन याचिकाही पुढील आठवड्यात दाखल होण्याची शक्यता आहे.



# मोहोळची जनता समस्यांनी त्रस्त

## खरसोळी येथे राजू खरे यांचे लोकप्रतिनिधींवर टीकास्त्र
## ४८ लाख रुपये खर्चाच्या रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

मोहोळ विधानसभा मतदारसंघातील गावोगावी आजही बहुतांश रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. अनेक भागात पिण्याचे पाणी मिळत नाही. आरोग्य सुविधा नाहीत. असे असताना लोकप्रतिनिधींनी आणलेला २७०० कोटींचा निधी गेला कुठे? अनगरपुरता विकास करणाऱ्यांना येत्या निवडणुकीत जनताच धडा शिकवेल, असे प्रतिपादन शिवसेना नेते राजाभाऊ खरे यांनी केले.

खरसोळी गावातील चार रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी खरे यांनी ४८ लाख रूपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. या कामांच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सौदागर गायकवाड, छगन पवार, अशोक भोसले, शरद पवार, महावीर जाधव, नेपतगांवचे सरपंच पांडुरंग परकाळे, अरूण बनसोडे, नानासाहेब व्हनकळस, लखन घाटे, आकाश पवार, अमर पवार, हणमंत शिंदे, बालाजी वाघ, दादा आसबे, उमेश पवार, शंकर पवार, मच्छिंद्र लेंडवे, बंडू कांबळे, जितू ओव्हाळ, कैलास ओव्हाळ उपस्थित होते. पंढरपूर तालुक्याचा सुपूत्र म्हणून मला महाराष्ट्राच्या विधानसभेत पाठविण्याची जबाबदारी १७ गावांची आहे. मी या भागात मागेल त्याला रस्ता, मागेल त्याला पाणी, आरोग्य सुविधा, शाळांसाठी मदत केली. कोणताही गट तट, जात-पात पहिली नाही. काम करणारा आपला माणूस म्हणून सर्वांनी आशीर्वाद द्या. असे आवाहन खरे यांनी केले.

### गट-तट बाजूला ठेवा

पंढरपूर तालुका चार मतदारसंघात विभागाला असून एकही भूमिपुत्र आमदार आज सभागृहात नाही. दादागिरी, तानाशाहीला कंटाळलेल्या मोहोळ आणि उत्तर सोलापूरच्या जनतेने परिवर्तन करण्याचे ठरविले आहे. आपल्या १७ गावांनी गट-तट बाजुला ठेऊन येत्या निवडणुकीत एकमुखाने साथ द्यावी. विकास कामांतून संपूर्ण मतदारसंघाचे चित्र बदलून दाखविल्याशिवाय राहणार नाही, असा शब्दही खरे यांनी दिला.

# सांगोल्यात गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना

**सांगोला, दि.८ सप्टेंबर-**

सांगोला शहरासह तालुक्यात गणपती बाप्पाचे उत्साहात प्रतिष्ठापना करण्यात आली.गणेश मंडळासह घरगुती गणपतीची मूर्ती नेण्यासाठी शनिवारी बाजारपेठेत खूप गर्दी झाली होती.युवक वर्ग,लहान मुले यांचा उत्साह दिसून येत होता. शहरातील गणेश मंडळांनी पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूका काढल्या.घरगुती गणपतीची मूर्ती नेण्यासाठी आलेल्या लहान मुलांनी गणपती बाप्पा मोरया...मंगलमूर्ती मोरया अशा जयघोष करून वातावरण भक्तिमय झाले होते. सांगोला शहर व तालुक्यात एकूण २६९ गणेश मंडळांनी गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना केली आहे.गणेश उत्सवासाठी सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खनदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ अधिकारी,५० पोलिस अंमलदार,५० होमगार्ड यांची बंदोबस्तासाठी नेमणूक करण्यात आली आहे.



# पहिल्याच दिवशी लालबागच्या चरणी कोट्यवधींचे दान!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.८ सप्टेंबर:**

मुंबईसह राज्यात गणेशोत्सव थाटामाटात साजरा केला जात असून सर्वत्र चैत्यन्याचे वातावरण आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील गणेशाच्या दर्शनासाठी गर्दी उसळली असून दानपेटीत पहिल्याच दिवशी कोट्यवधी रुपयांचे दान भाविकांनी अर्पण केले आहे.

लालबागच्या दानपेटीत पहिल्या दिवशी गोळा झालेल्या दानाची मोजदाद सुरू आहे. सुरुवातीला पेटीतील रोख, त्यानंतर भक्तांनी अर्पण केलेले सोने आणि चांदीच्या दागिन्यांची मोजदाद केली जाणार आहे. यंदाही पहिल्याच दिवशी लालबाग मंडळाच्या दानपेटीत गणेशभक्तांनी कोट्यवधी रुपयांचे दान दिले आहे. त्यात रोख रुपये, सोन्या चांदीचे दागिने नाण्यांचाही समावेश आहे. सोन्याच्या मूर्ती, चांदीचे हार,



नोटांचे हार अर्पण केले आहेत. दानपेटीत दोन बॅटही आहेत. रोख रक्कमेत परकीय चलनातील काही नोटांचाही समावेश आहे.

लालबागच्या राजाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी लाखो भाविकांसह राजकीय व मनोरंजनसृष्टीतील मंडळीही येत असतात. प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी हे सहकुटुंब दर्शनासाठी येतात. मुकेश अंबानी यांच्या कुटुंबाने लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या विविध उपक्रमांसाठी सहकार्य केले असून कोट्यवधींची देणगीही दिली आहे.

# परप्रांतियांना शेतजमीन खरेदीला मनाई करण्याची जदची मागणी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ सप्टेंबर**

:मध्यप्रदेश व राजस्थानमधील शेतकरी दाखले वापरून राज्यात विशेषतः कोकणात परप्रांतीयांकडून मोठ्या प्रमाणावर शेतजमीन खरेदी होत असल्याचा आरोप जनता दल (से) पक्ष व कोकण जनविकास समितीने केला असून, उत्तराखंड प्रमाणे राज्यात परप्रांतियांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी, अशी मागणी केली आहे.

स्थानिक जनतेच्या गरिबीचा फायदा घेऊन, मोठ्या प्रमाणावर राज्यातील आणि राज्याबाहेरील व्यक्ती कोकणात शेत जमिनीची खरेदी करीत आहेत. मूळचे राजस्थानमधील असलेल्या बलराम जाखड व उत्तर प्रदेश मधील कृपाशंकर सिंग यांच्यासारख्या कोकणात जमिनी विकत घेतल्या आहेत. नाणार परिसरातही अनेक गुजराती व्यक्तींनी जमिनी विकत घेतल्याचे यापूर्वीच उघड झाले आहे. अलीकडे राजापूर तालुक्यात पुण्यातील एका परप्रांतीय व्यक्तीने तब्बल दोनशे एकर जागा खरेदी केल्याची चर्चा आहे. अख्खा गाव विकत घेण्याचे कांदाटी खोऱ्यातील प्रकरणही असेच आहे.

राज्यात शेतजमीन खरेदी करण्यासाठी खरेदीदार व्यक्तीकडे शेतकरी दाखला असणे गरजेचे असते. परंतु ज्याच्याकडे असा दाखला नसतो, त्यांना राजस्थान - मध्यप्रदेश या राज्यात संबंधित व्यक्तीच्या नावे जमीन खरेदी करून त्या आधारे दलाल शेतकरी दाखला मिळवून देतात. या दाखल्याच्या आधारे राज्यात विशेष करून कोकणात परप्रांतीय व्यक्ती जमीन खरेदी करीत आहेत, असे जनता दलाचे प्रदेश अध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर तसेच कोकण जनविकास समितीचे जगदिश नलावडे, सुरेश रासम, संजय परब, केतन कदम, प्रशांत गायकवाड यांनी म्हटले आहे.

जमीन खरेदीसाठी राजस्थान वा मध्यप्रदेशमध्ये न जाताच घरबसल्या अवघ्या ३५ ते ४५ हजार रुपयांत तेथील शेतकरी असल्याचा दाखला दलाल मिळवून देतात. ही प्रक्रिया २० दिवस ते दीड महिन्यात पार पाडली जाते. त्यामुळे मुळातच हे दाखले बनावट असण्याची शक्यता आहे. हे दाखले खरे आहेत, असे गृहित धरलेफ तरी संबंधित व्यक्ती राजस्थान वा मध्य प्रदेशमध्ये शेत जमिनीची मालक होऊ शकेल, पण तेथे न जाताच व सदर जमीन न कसताच शेतकरी कशी बनू शकेल, असा सवाल या सर्वांनी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

जानेवारी २०२४ मध्ये उत्तराखंड सरकारने राज्यातील शेत जमिनीची राज्याबाहेरील व्यक्तींनी खरेदी करण्यास बंदी आणली आहे. तसेच अकृषिक (एनए) जमीन खरेदीसाठीही २५० चौरस मीटर जागेची मर्यादा घातली आहे. याच आधारे राज्यात आणि विशेष करून कोकणात परप्रांतीयांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी. याबाबत काही तांत्रिक व कायदेशीर अडचणी येणार असतील तर परराज्यात जमीन खरेदी करून शेतकरी दाखला मिळविल्यानंतर, संबंधित जागेवर प्रत्यक्ष शेती केल्याचे पुरावे मागण्यात यावेत वा किमान तीन ते पाच वर्षात महाराष्ट्रात जमीन खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यात यावा, असे या सर्वांनी म्हटले आहे यासाठी कोणी अकृषिक जमीन खरेदी करणार असेल तर त्यासाठी क्षेत्र मर्यादा ठरवून देण्यात यावी व त्या व्यवसायासाठी सदर जमिनीचा तीन वर्षात वापर न करण्यात आल्यास सदर जमीन सरकारने ताब्यात घेण्याची तरतूद करावी, अशी मागणीही महसूल मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# शरद पवार खरंच पुरोगामी आहेत?

शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असलेले सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. वयाच्या नव्वव्या दशकातील त्यांचा प्रवास सुरू आहे. चाटुकार त्यांना 'जाणते' म्हणूनही संबोधतात. पण, वयाच्या नव्वद्या दशकात असणारे शरद पवार हे अलिकडच्या काळात ज्या प्रकारची वक्तव्ये करीत आहेत, ते पाहता ते किती 'जाणते' आहेत, हे सहज लक्षात येते. सत्ता गेल्यापासून ते बावचळल्यासारखे वागताना दिसत आहेत. जातिपातीवरून समाजात फूट पाडण्याचे त्यांचे छुपे आणि उघड प्रयत्न कुणापासूनही लपून राहिलेले नाहीत. विशेषत: ब्राह्मण समाजाबाबत त्यांच्या मनात असलेला आकस वेळोवेळी प्रदर्शित झाल्याचे पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राने पाहिला आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रिपदी बसलेले त्यांना पाहवत नाही, हे एकदा नव्हे, अनेकदा स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीसांची जात पाहूनच पवार त्यांना लक्ष्य करतात आणि तरीही स्वत:ला पुरोगामी असल्याचे भासवितात, हा दुतोंडीपणा राज्यातील जनतेने ओळखला आहे. फडणवीस हे जन्माने जरी ब्राह्मण असले, तरी त्यांनी सत्तेत असताना बहुजनांसाठी जी कामे केली आहेत, ती प्रशंसनीय आहेत. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी सर्वप्रथम प्रामाणिक प्रयत्न केलेत, ते फडणवीस यांनीच. ओबीसींच्या समस्या सोडविण्यासाठी झटले ते फडणवीसच. फडणवीस सत्तेत आले की पवारांना आणि त्यांच्या साथीदारांना पेशवाई आठवते. कारण स्पष्ट आहे, पेशवाईचा मुद्दा उकरून काढत मराठा समाजातील लोकांना फडणवीसांविरुद्ध चिथावणी द्यायची आणि फडणवीस ज्या भाजपाचे आहेत, त्या भाजपाला फटाके लावायचे, पर्यायाने फडणवीसांना राजकीयदृष्ट्या जेरीस आणायचे, हा पवारांचा त्यामागचा हेतू लपून राहिलेला नाही. याउलट फडणवीसांचे आहे. ते कधीच जातीवरून कुणाला लक्ष्य करीत नाहीत. पवार मुख्यमंत्री असतानाच त्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यायला पाहिजे होते. पण, त्यांनी त्याबाबत कधीच विचार केला नाही. उलट, शरद पवार हे जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा ते असे म्हणाले होते की, मराठा समाजाला आरक्षण देणे कायद्याने शक्य नाही. पश्चिम महाराष्ट्रातील एका आघाडीच्या मराठी वर्तमानपत्राने त्याबाबत पहिल्या पानावर ठळकपणे बातमी छापली होती. त्या बातमीचे कात्रण आजही सगळीकडे फिरते आहे. जे कायद्याला मान्य नाही, ते फडणवीसांकडून अपेक्षित करताना शरद पवार कोणती खेळी खेळू पाहताहेत, हे न ओळखता येण्याइतकी जनताही आता खुळी राहिलेली नाही. मनोज जरांगे यांचा बोलविता धनी कोण आहे, हेही एव्हाना स्पष्ट झाले आहे.

एकीकडे स्वत:ला पुरोगामी म्हणायचे आणि दुसरीकडे जातीयवादी राजकारण करायचे हा पवारांचा दुटप्पीपणाच होय. गतकाळात घडलेल्या एका गोष्टीचे स्मरण होताच पवारांचे जातीयवादी राजकारण डोळ्यांपुढे येते. २०२३ च्या जुलै महिन्यात समृद्धी महामार्गावर खाजगी बसला अपघात झाला होता आणि त्यात २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्या घटनेवर प्रतिक्रिया देताना पवारांनी फडणवीसांना मध्ये आणलेच होते. समृद्धीवर झालेल्या अपघातात जो मृत्युमुखी पडतो, तो 'देवेंद्रवासी' होतो, असे लोक म्हणतात, हे वाक्य पवारांनी बोलण्याची काही आवश्यकताच नव्हती. पण, राज्यात कुठेही काही खुट्ट वाजले की फडणवीसांवर टीका करायची, ही पवारांना आता सवयच जडली आहे. राज्याच्या राजकारणात आपल्याशिवाय पान हलत नाही, असा यशस्वी होतो आहे, आपले सगळे डावपेच आपल्यावरच उलटवले आहे, हे शरद पवारांना सहन होऊच शकत नाही. होणारही नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात कुणी चाणक्य निर्माण झालेला पवारांना आवडत नाही. त्यात देवेंद्र फडणवीस हे तर पवारांच्या अर्ध्या वयाचे नेते. शिवाय ब्राह्मण. त्यामुळे पवार फडणवीसांचे अस्तित्व आणि कर्तृत्व मान्य करतील, याचा विचार कुणी स्वप्नातही करू नये. समृद्धी महामार्गावर अपघात झाल्यानंतर त्यात मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करणे स्वाभाविक होते. पण, संवेदना व्यक्त करताना फडणवीसांचा उल्लेख करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. पवार प्रत्येक वेळी जाणूनबुजून फडणवीसांवर टीका करतात. भाजपाला सांप्रदायिक ठरविण्याचा प्रयत्न करतात, हे महाराष्ट्राने नेहमीच अनुभवले आहे. आता विधानसभेच्या निवडणुका महाराष्ट्रात होणार आहेत. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. स्वाभाविकच शरद पवारही कामाला लागलेत. त्यांचे काम स्वत:चा पक्ष वाढविण्याऐवजी भाजपा आणि फडणवीस यांच्या शत्रूंना एकत्र आणून, जनतेच्या मनात विष कालवून सत्ता हस्तगत करण्यासाठी चालले आहे, हे कुणाच्याही सहज लक्षात येते. राजकारण हे सत्तेसाठीच असते, हे मान्य. पण, ते जातीवर नेऊन एका विशिष्ट जातीला लक्ष करून समाजात दुहीची बीजे पेरून केले जाणारे राजकारण पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला परवडणारे नाही. फडणवीसांची 'सुप्रीमसी' पवारांना मान्य होतच नाही. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात माझ्यापेक्षा कुणी श्रेष्ठ आहे वा मातब्बर आहे, हे मान्य करण्याचा मोठेपणा त्यांच्या ठायी नाही. पन्नास वर्षे सक्रिय राजकारणात राहिल्याने आपण श्रेष्ठ आहोत, हा अहंकार बळावला असल्याने आणि आता वयही उताराकडे असल्याने ते फडणवीस यांना लक्ष्य करण्याची संधी सोडत नाहीत, हे पुरते स्पष्ट झाले आहे. पण, फडणवीसांनी स्वकर्तृत्वाने स्वत:चे राजकीय श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. शिंदेंच्या नेतृत्वात सरकार येण्यापूर्वी जेव्हा राज्यसभा आणि विधानपरिषदेसाठी निवडणूक झाली होती, तेव्हा एकेक जास्तीची जागा जिंकत फडणवीसांनी पवारांना आणि उद्धव ठाकरे यांनाही धोबीपछाड दिली होती, हे तुम्ही-आम्ही पाहिलेच आहे. त्यामुळे समृद्धीवरील अपघाताबाबत संवेदना व्यक्त करताना पवार यांनी कारण नसताना फडणवीसांच्या बाबतीतले वाक्य लोकांच्या तोंडी घालून पत्रकारांना सांगितले होते, हे त्यांच्या स्वभावाला धरूनच आहे, असे मानले पाहिजे. असो. काळ जसजसा पुढे जाईल, तसतसे वास्तव अधिक उजळपणे राज्यातील जनतेपुढे येईल, यात शंका नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सगळे विरोधक एकट्या फडणवीसांना लक्ष्य करताना दिसतात. त्याचा अर्थच असा की, फडणवीस हे आपल्या सगळ्यांपेक्षा भारी आहेत, हे त्यांनी मनोमन मान्य केले आहे. खालच्या पातळीवर उतरून अतिशय शेलक्या शब्दांत फडणवीसांवर टीका करायची, जनतेच्या मनात त्यांच्याबाबत विष कालवायचे आणि वाहवा मिळवायची, हा विरोधी मंडळींचा उद्योग आता जनतेच्याही लक्षात आला आहे. हिंमत असेल तर पवारादी नेत्यांनी विचारांची लढाई विचारांनी लढली पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात बसविण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला, ही घटना अतिशय दुर्दैवीच होती. अशी घटना घडायला नको होती. पण, दुर्दैवाने ती घडली. या घटनेसाठीही पवार आणि इतरांनी फडणवीसांनाच जबाबदार धरण्याचा केविलवाणा प्रयत्न चालविला आहे. आपण पन्नास वर्षे राजकारणात आहोत, हे पवार नेहमी सांगत असतात. असे सांगताना ते कायम शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र असा उल्लेख करतात. त्यांनी कधीही छत्रपती शिवरायांचे नाव घेतल्याचे आठवत नाही. कित्येक वर्षे ते रायगडावर गेले नव्हते. पण, पक्षात फूट पडली, पुतणे अजित पवार ४० आमदारांसह बाहेर पडले, तेव्हा कुठे शरद पवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण झाली. ते पहिल्यांदा रायगडावर गेले, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. फडणवीसांची छत्रपती शिवरायांवर प्रगाढ श्रद्धा आहे. ती सिद्ध करण्यासाठी त्यांना कुणाच्याही प्रमाणपत्राची गरज नाही. काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेस नावाचा वेगळा पक्ष काढूनही शरद पवारांना स्वबळावर कधीही २८८ पैकी ७० पेक्षा जास्त जागा जिंकता आलेल्या नाहीत, हे वास्तव आहे. याउलट, फडणवीसांनी स्वबळावर भाजपाला १०५ जागा जिंकून आणण्याचे यश मिळविले. त्यामुळे पवारांनी कितीही द्वेष केला तरी फडणवीस लहान होणार नाहीत; खचणार तर अजिबातच नाहीत, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# हरयाणात तुल्यबळ लढत!

जम्मू-काश्मीर व हरयाणात होत असलेल्या विधानसभा निवडणुकींपैकी हरयाणातील निवडणुकीकडे राजकीय निरीक्षकांचे विशेष लक्ष लागले आहे. जम्मू भागात भाजपा तर काश्मीर खोऱ्यात नॅशनल कॉन्फरन्स असे काहीसे चित्र या राज्यात राहण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता जवळपास नाही. जम्मू-काश्मीरमधील राजकीय चित्र असे काहीसे स्पष्ट असताना हरयाणात मात्र काँग्रेस व भाजपा यांच्यात तुल्यबळ लढत पाहावयास मिळेल, असे मानले जाते.

**सलग दोन विजय** : हरयाणात भाजपाने २०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सलग दोन विजय मिळविले. २०१४ च्या निवडणुकीत हरयाणात भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले होते तर २०१९ मध्ये बहुमतास काही जागा कमी पडल्या. पण, अपक्षांच्या मदतीने राज्यात भाजपाचे सरकार स्थापन झाले. मनोहरलाल खट्टर पुन्हा मुख्यमंत्री झाले. लोकसभा निवडणुकीस काही महिने शिल्लक असताना भाजपाने राज्यात नेतृत्वबदल करण्याचा निर्णय घेतला आणि खट्टर यांच्याऐवजी नायबसिंग सैनी यांना मुख्यमंत्री केले. खट्टर यांच्या विरोधात तयार झालेली स्वाभाविक नाराजी दूर करण्याचा हा एक प्रयत्न होता. तरी लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. शेतकरी आंदोलन हे त्याचे एक कारण होते. लोकसभा निवडणुकीत पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेशचा काही भाग व राजस्थान या भागांत शेतकरी आंदोलनाचा फटका भाजपाला बसला, असा निष्कर्ष लोकसभा निकालानंतर काढण्यात आला; जो बरोबर होता. अशा परिस्थितीत हरयाणात विधानसभा निवडणुका होत असल्याने या निकालाचे स्वरूप कसे राहील याची उलटसुलट चर्चा केली जात आहे.

**काँग्रेस-आप युती?** : काँग्रेसने हरयाणा, पंजाब व दिल्ली या तिन्ही राज्यांत आम आदमी पक्षाशी कोणतीही युती न करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबमध्ये युती न केल्याचा फायदा काँग्रेसला झाला. आम आदमी पक्षापेक्षा जादा जागा काँग्रेसने जिंकल्या. दुसरीकडे दिल्लीत आपसोबत युती केल्याचा कोणताही फायदा काँग्रेसला झाला नाही. दोन्ही पक्ष आपापली मते परस्परांकडे वळविण्यात अपयशी ठरले. पंजाब व दिल्लीतील हे अनुभव विचारात घेत काँग्रेसने हरयाणात आम आदमी पक्षासोबत युती न करण्याचे ठरविले होते. आता त्यात बदल होण्याचे संकेत पक्षाकडून दिले जात आहेत. हरयाणातील काँग्रेस नेते युतीसाठी उत्सुक नाहीत, असे म्हटले जाते; पण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी युतीसाठी अनुकूलता दर्शविली आहे.

**२० जागांची मागणी** : आम आदमी पक्षाने काँग्रेसकडे ९० पैकी २० जागांची मागणी केली आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाने बजावलेल्या कामगिरीच्या आधारे ही मागणी करण्यात आली असल्याचे समजते. राज्यात अशी युती झाल्यास भाजपाला ही निवडणूक निश्चितच जड जाईल, असे मानले जाते. किमान १०-१२ मतदारसंघांत आम आदमी पक्षाची कामगिरी चांगली राहण्याची शक्यता आहे. युतीचा फायदा काँग्रेस व आप या दोन्ही पक्षांना मिळू शकेल.

**गटबाजीचा धोका** : आम आदमी पक्षासोबत युती झाली तरी काँग्रेसला या राज्यात सहज सोपा विजय मिळेल, असे मानण्याचे कारण नाही. राज्य काँग्रेसमधील गटबाजी काँग्रेससाठी नुकसानदायक ठरू शकते. राज्यात भूपिंदरसिंग हुड्डा हे काँग्रेसचे सर्वात प्रभावी नेते मानले जातात. ते जाट आहेत. मात्र राज्यातील अन्य काही नेत्यांचा त्यांना विरोध आहे. काँग्रेसला हुड्डा यांच्याशिवाय पर्याय नाही. त्या स्थितीत राज्यातील निवडणूक जाट विरुद्ध गैरजाट अशी होऊ शकते. याचा फायदा भाजपाला मिळू शकतो. मुख्यमंत्री नायबसिंग सैनी हे काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री झाले असल्याने त्यांच्याविरोधात जनतेत नाराजी तयार झालेली नाही. ते सैनी या मागास समाजातून आलेले आहेत. राज्यात सैनी मतदारांची संख्या ८ ते १० टक्के असल्याचे म्हटले जाते.

**जाट विरुद्ध इतर** : हरयाणात जाट समाज मोठ्या संख्येत असून त्याची संख्या २२.२ टक्के आहे आणि ही काँग्रेसची परंपरागत व्होट बँक मानली जाते. भाजपाने ओबीसी वर्गावर आपले लक्ष केंद्रित केले असून राज्यात ओबीसी समाज २१ टक्के आहे. म्हणजे जाट विरुद्ध ओबीसी असे तुल्यबळ समीकरण राज्यात तयार होऊ शकते. याशिवाय पंजाबी ८ टक्के तर ब्राह्मण ७.५ टक्के असे दोन प्रमुख समाज राज्यात आहेत. हे दोन्ही घटक भाजपाकडे गेल्यास त्याचा पक्षाला फायदा होईल. याशिवाय अहिर, वैश्य, राजपूत असेही काही समाज राज्यात आहेत. अटीतटीच्या लढतीत त्यांचीही भूमिका महत्त्वाची ठरू शकते.

**जाटांचे वर्चस्व** : हरयाणा विधानसभेच्या ९० पैकी ४० मतदारसंघांत जाटांचे वर्चस्व असल्याचे मानले जाते. २०१४ च्या निवडणुकीत जाट समाजाने भाजपाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे भाजपाचा मोठा विजय झाला. नंतर राज्यात जाट विरुद्ध गैरजाट असे आंदोलन झाले. जाट भाजपापासून दुरावला व त्याची परिणती भाजपाच्या जागा कमी होण्यात झाली. २०२४ च्या निवडणुकीत जाट समाज भाजपाच्या पूर्णपणे विरोधात जातो की काही जाट मते भाजपाला मिळतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जाट मतांवर डोळा ठेवूनच भाजपाने माजी मुख्यमंत्री स्व. चौधरी बंसीलाल यांच्या स्नुषा किरण चौधरी यांना भाजपात घेऊन त्यांना राज्यसभेत आणले. चौधरी आता जाट समाजाला किती प्रमाणात भाजपाकडे वळवू शकतात, हे पाहावे लागेल.

**४६ विरुद्ध ४५** : तीन महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतांची टक्केवारी काँग्रेससाठी उत्साहवर्धक असली, तरी भाजपासाठी एकदम निराशाजनक अशीही नाही. दोन्ही पक्षांनी पाच-पाच जागा जिंकल्या असल्या, तरी भाजपाला काँग्रेसपेक्षा एक टक्का मते जास्त मिळाली आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाला ४६ टक्के तर काँग्रेस व आपला ४५ टक्के असे मतदान झाले आहे. पण, काँग्रेसने आपल्या मतांच्या टक्केवारीत मोठी वाढ करण्यात यश मिळविले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**भाजपाची दारोमदार** : भाजपाने राज्यातील ९० पैकी ६७ मतदारसंघांतील उमेदवार निश्चित केले असून उर्वरित उमेदवारही लवकरच निश्चित केले जातील, असे समजते. या निवडणुकीत भाजपाची दारोमदार दोन घटकांवर अवलंबून आहे. एक म्हणजे गैरजाट भाजपाला एकगठ्ठा मतदान करतील. भाजपाची दुसरी आशा म्हणजे शेतकऱ्यांची नाराजी यावेळी मतदानात दिसणार नाही. हे दोन घटक भाजपाच्या बाजूने गेल्यास हरयाणात भाजपाला पुन्हा एकदा निसटता विजय मिळू शकतो. त्याचप्रमाणे काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात युती न झाल्यास त्याचा मोठा फटका काँग्रेसला बसू शकतो. या तीन-चार घटकांपैकी कोणते घटक भाजपाला साथ देतात, यावर या राज्यातील निकालांचे चित्र अवलंबून आहे.

**झारखंडमधील घटनाक्रम** : चंपाई सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चाला राम राम करीत भाजपात प्रवेश केला. त्याने राज्यात भाजपाला बळ मिळेल, असे मानले जाते. झारखंडमधील निवडणूक महाराष्ट्र विधानसभेसोबत होणार आहे. झारखंडमध्ये सध्या झारखंड मुक्ती मोर्चा व काँग्रेस यांचे संयुक्त सरकार आहे. सरकारविरुद्धची नाराजी आणि चंपाई सोरेन यांची नाराजी अशा या दुहेरी नाराजीचा फटका मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना बसेल तर स्वाभाविक फायदा भाजपाला मिळेल, असे चित्र राज्यात तयार होत आहे.

## वेध

**नीलेश अ. डाखोरे**

# कशी होणार शाळा सुंदर?

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करतो तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. यावरून शिक्षण किती महत्त्वाचे आहे, हे समजून येते. मात्र, याचे महत्त्व सरकारला कळले का? आता 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' टप्पा-२ ची नोंदणी करण्याची सूचना सरकारकडून आली आहे. शिक्षकांनी नोंदणी करायची की विद्यार्थ्यांना शिकवायचे, हा प्रश्नच आहे. यामुळेच 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकही आहे. अगोदरच शासकीय शाळांना रिक्त पदांचे ग्रहण लागलेले आहे. शिक्षकांची संख्या अपुरी असताना कित्येक वर्षांपासून रिक्त पदे भरलेली नाहीत. यामुळेच एका शिक्षकावर तीन ते चार वर्गांचा प्रभार सोपविलेला दिसतो. अशा कठीण परिस्थितीतही शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्यास तयार आहेत की त्यांचा नाईलाज आहे, याचाही विचार व्हायला हवा. कमी पटसंख्येत शिक्षकांना खरंच विद्यार्थ्यांना शिकवायला मिळते का, हा प्रश्न प्रत्येक पालकांच्या डोक्यात घर करतो. याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षकांच्या मागे शिक्षणाव्यतिरिक्त लावलेली अन्य कामे...

निवडणूक कोणतीही असो, शिक्षकांना बैलांसारखे जुंपले जाते. जनगणना करायची असल्यास सर्वात अगोदर शिक्षकांची आठवण येते. मतदार याद्या तयार करायच्या असल्यास शिक्षकांना पुढे केले जाते. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांचा मतदानाचा प्रश्न, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम, नवसाक्षर अभियान, महावाचन चळवळ, स्वच्छता मॉनिटर, साक्षरता सप्ताह, वृक्षारोपण, कोणतेही सर्वेक्षण, विविध कामांचे फोटो अपलोड करणे आदी कामे शिक्षकांकडून करून घेतली जातात. याउलट शिक्षक शाळेत जातो की नाही, तो विद्यार्थ्यांना शिकवतो की नाही, शाळेत आवश्यक पटसंख्या आहे की नाही, ही माहिती घेण्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. आम्ही मागितलेली माहिती वेळेवर द्या व सांगितलेले उपक्रम राबवा, हे मात्र ठणकावून सांगितले जाते, हे सांगण्यासारखे... अशी बिकट स्थिती असताना कोणता सुज्ञ पालक आपल्या पाल्याला शासकीय शाळेत ज्ञानार्जनासाठी पाठवेल का? हा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. शासकीय शाळांची ही स्थिती पाहता शहर असो वा ग्रामीण भाग, सर्वत्र खाजगी शाळांचा सुळसुळाट पाहायला मिळतो. ज्यांची परिस्थिती नाही ते नाईलाजास्तव पाल्यांना शासकीय शाळेत पाठवतात. मात्र, ज्यांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी आहे, ते पोटाला चिमटा घेत मुलांना महागड्या शाळेत शिक्षण देतात. यातून ते आपली श्रीमंती दाखविण्याचा प्रयत्न करतात. यावरून पालकांनी जिल्हा परिषद, नगर परिषदेच्या शाळांकडे दुर्लक्ष केल्याचे प्रथमदर्शी लक्षात येईल. मात्र, खोलात जात याचा विचार केला तर याला शैक्षणिक धोरण तितकेच जबाबदार असल्याचे लक्षात येईल. दुसरीकडे जिल्हा परिषद, नगर परिषद शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी नानाविध प्रयोग केले जात असल्याचे भासविले जाते. त्याचा मोठा गाजावाजाही केला जातो. मात्र, प्रत्यक्षात असे होते का? याचा विचार केला तर उत्तर नाहीच मिळणार आहे. असे का? याचा कुठेतरी विचार करावा लागणार आहे. सरकार खाजगी शाळांवर लक्ष असल्याचे भासवते. विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तराचे किती ओझे असावे, हे ठरवून देते. सरकार शाळांची सकाळची वेळ बदलण्यास सांगते. मात्र, जेव्हा शिक्षण शुल्काचा विषय पुढे येतो तेव्हा तो त्या-त्या शाळेने ठरवावा, असे म्हणत हात झटकले जातात. या मागील कारणही लक्षात घेण्यासारखे आहे. कारण १० पैकी ७ ते ८ खाजगी शाळा आजी-माजी आमदार, खासदार, त्यांचे नातेवाईक, मोठ्या उद्योजकांशी संबंधित आहेत. त्यांच्या मिळकतीचा विचार करूनच शैक्षणिक धोरण ठरविले जाते. मग यातून गरिबांची पिळवणूक झाली तरी काही पर्वा नाही. म्हणूनच खाजगी शाळांचे चांगले फोफावत आहे. ज्या शाळेचे शुल्क कमी तिथे विद्यार्थ्यांची पटसंख्या अधिक आणि ज्या शाळेचे शुल्क जास्त तिथे विद्यार्थी पटसंख्या कमी, असे साधारण चित्र असायला हवे. मात्र, शिक्षणाच्या बाजारीकरणाने अगदी याउलट चित्र पाहायला मिळते. वाढती गरिबी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करता शैक्षणिक धोरणात बदल करण्याची वेळ आली आहे. कोणतीही खाजगी शाळा ठरावीक शैक्षणिक शुल्काशिवाय अतिरिक्त शुल्क घेणार नाही, असा नियम करण्यात आला पाहिजे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी शाळेवर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा अध्यादेश काढायला हवा तसेच रिक्त पदे भरण्यावर जोर दिला पाहिजे. हे जरी केले तरी शासकीय शाळांचा दर्जा सुधारेल. अन्यथा, 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळे'चे स्वप्न केवळ स्वप्नच राहील, यात शंका नाही...

९०२१०५५११५

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# गणेश उत्सवामागील व्यवस्थापनशास्त्र



सर्वत्र गणरायाचं उत्साहात आगमन झालं आहे. गणेशोत्सव हा जरी सर्व देशभर साजरा होत असला, तरी महाराष्ट्रामध्ये त्याची धूम काही वेगळीच असते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी इंग्रजांच्या राज्यामध्ये लोकांना एकत्र करण्यासाठी देव, देश आणि धर्म याबद्दल त्यांच्या मनामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी या उत्सवाचा प्रारंभ केला. आज १० हजारांपेक्षा अधिक मंडळं संपूर्ण महाराष्ट्रात आहेत. यांचे लाखो कार्यकर्ते आहेत. तसं पाहिलं तर हा गणेशोत्सव आपल्या सगळ्यांना भरपूर काही शिकवून जातो. काही ठिकाणी बाल गणेश मंडळ असते, काही ठिकाणी तरुण गणेश मंडळ असते. बाल काय अन् तरुण काय सर्वच गणरायासाठी खपत असतात आणि यातूनच त्यांना विविध गोष्टी शिकायला मिळतात. गणरायाचे आगमन ज्यावेळेला होते त्यावेळेला बरेचदा शाळांमध्ये परीक्षाही असतात. परंतु, गणपतीजवळ जायला मिळावे, तिथल्या कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायला मिळावा यासाठी बच्चे कंपनी आपला अभ्यास आणि गणराया समोरचे कार्यक्रम त्याच्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत असतात. गणरायाच्या निमित्ताने वस्तीतील सर्व लहान मुलं एकत्र येतात. त्यांचे खेळ-कार्यक्रम अशा सर्वच गोष्टी यामुळे घडत असतात. वस्तीतील मोठी माणसे या निमित्ताने एकत्र येत असतात. वस्तीमध्ये होणाऱ्या महाप्रसादाला वस्तीतील सर्वच नागरिकांची उपस्थिती असते. यातून सामाजिक समरसता साधली जाते.

गणेशोत्सव पार पाडताना बालगोपाल व तरुणांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात. या अनेक गोष्टी म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून आधुनिक व्यवस्थापनशास्त्राचेच धडे आहेत. यातील बरीच मुलं अशी असतात, की जी कधीही कोणत्याही सामाजिक कार्यासाठी घराच्या बाहेर पडलेली नसतात. गणपतीसाठी सुरुवातीला मुलं एकत्र येऊन जी बैठक घेतात त्यामध्ये कुठलाही सण-समारंभ साजरा करण्यासाठी प्लॅनिंग म्हणजे योजना कशी बनविली पाहिजे, हे त्यांना समजते. ज्यांना गणेशोत्सवाची योजना करण्याचा अनुभव आहे, त्यांच्यापासून इतर मुलं शिकत असतात. योजना ठरविणे आणि ती कागदावर उतरवणे (पेपर प्लॅनिंग) हा अनुभव मुलांना यातून मिळतो. गणेशोत्सव म्हणजे विविध गोष्टींवर होणारा खर्च आलाच. त्यासाठी वर्गणी जमा करणे आलेच. मुलं घरोघरी जातात व ज्या कामासाठी आम्ही पैसा गोळा करतो आहोत ते कार्य कसे चांगले आहे, हे त्यांनाही पटलेले असते व ते ज्यांच्याकडून वर्गणी मागतात त्यांनाही पटवून देऊ शकतात. यामुळे वस्तीमध्ये त्यांची ओळख होते. ते स्वत:ची पण ओळख सांगू शकतात. सामाजिक कार्यासाठी पैसा जमा करण्याची त्यांना सवय लागते. ज्यांनी कधीच कोणाला काही मागितलेले नाही, अशी मुले पहिल्यांदाच सार्वजनिक कामासाठी कोणाला काहीतरी मागत असतात. यातून त्यांच्या मनात असलेली भीड चेपली जाते. जमा झालेल्या पैशाचा योग्य विनियोग कसा करायचा व जमा-खर्च कसा लिहून ठेवायचा, याचे शिक्षण त्यांना मिळते. गणेश उत्सवाचे विविध कार्यक्रम करताना त्यांना तन-मन-धनाने ते कार्य करावे लागते. तन म्हणजे शारीरिक शक्ती त्यांना खर्ची घालावी लागते. मन म्हणजे मनापासून हे कार्य करावे लागते आणि धन म्हणजे स्वत:चे पैसेसुद्धा या कामासाठी त्यांना खर्च करावे लागतात. त्यामुळे सामाजिक कार्य कसे करायचे याचा अनुभव त्यांना मिळतो व एका पिढीपासून दुसरी पिढी शिकत राहते. सामाजिक कार्यासाठी स्वत:च्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्यासाठी ते सज्ज होतात. दिवसभराचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित व वेळेवर पार पडले पाहिजे यासाठी आपला व्यक्तिगत वेळ त्यांना खर्ची घालावा लागतो. वस्तीतील समवयस्क विविध मुलांना सोबत घेतले पाहिजे व त्यांनाही या कामात लावले पाहिजे, ही भावना वाढीला लागते. त्यांचे संघटन कौशल्य यातून वाढीस लागते. मंडळातील प्रत्येकाला कोणती ना कोणती जबाबदारी सोपवावी लागते. जबाबदारी सोपविणे (डिलिगेशन ऑफ ॲथॉरिटी) ही गोष्ट त्यांना शिकायला मिळते. ज्याच्यावर जबाबदारी सोपवली त्यांनी ते कार्य बरोबर पार पाडले की नाही, याकडे कसे बघावे, हे त्यांना शिकायला मिळते. हा सर्व आधुनिक व्यवस्थापनशास्त्राचा भागच आहे. आनंद मेळावा असो वा महाप्रसाद ज्यांच्याकडे जी जी जबाबदारी सोपविलेली आहे त्यांच्याकडून ती सर्व कामे व्यवस्थित पार पडत आहेत की नाही, हे बघणे म्हणजे समन्वय (को-ऑर्डिनेशन) व्यवस्थित साधावा लागतो. जे ठरवले आहे तेच झाले पाहिजे म्हणजे (डायरेक्शन) दिशानिर्देशन त्यांना करावे लागते. जर कुठे ठरवल्यापेक्षा काही वेगळे होत असेल तर त्याला ताबडतोब थांबवणे आणि ठरवलेल्या गोष्टी सगळ्यांकडून जशाच्या तशा करून घेणे म्हणजे कंट्रोलिंग त्यांना शिकायला मिळते. विविध जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या मंडळाच्या या कार्यकर्त्यांचा सत्कार (रिवार्ड ॲण्ड रिकग्निशन) झाला पाहिजे. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळेल व आपणही काही कामाचे आहोत, हा भाव त्यांच्या मनामध्ये निर्माण होईल. मोठ्यांकडून मिळालेली कौतुकाची थाप ही तरुणांचा उत्साह वाढविणारी ठरते. डीजेचा अत्यंत कर्कश आवाज, फॅन्सी ड्रेसच्या निमित्ताने होणारी भडक स्पर्धा, चित्रपटाच्या गाण्यांवर होणारे नाच, गणपतीसमोर ग्रामीण भागात होणारे लावणीचे कार्यक्रम यातून बाहेर पडून काही विधायक, सकारात्मक, बालगोपाल तरुण, वृद्ध या सर्वांच्या कलागुणांना उजाळा देणारे कार्यक्रम करणे आवश्यक आहे.

लाठीकाठी, योग प्रात्यक्षिक, हस्ताक्षर, मेंदी, पाककला, गायन, भजन, फुलांची सजावट, अथर्वशीर्ष पठन, गणपतीच्या कथांचे कथाकथन, फॅन्सी ड्रेस म्हणजे वेशभूषा स्पर्धेमध्ये विविध गणेश रूपे, कार्तिकेय, रिद्धी, सिद्धी अशा विविध वेशभूषा बालकांना धारण करायला लावल्या पाहिजे व त्यांची स्पर्धा असायला हवी. यासाठी वस्तीतील सर्वांनीच पुढाकार घेऊन एकत्रित बैठक घेणे आवश्यक आहे. ती जर झाली तर या कार्यक्रमांच्या ऐवजी आपण कोणते कार्यक्रम घेऊ शकतो, या सूचना अनेकांकडून येतील. तरच लोकसंघटन, लोकसंस्कार, लोकजागृती अशा पद्धतीचा उद्देश असलेला गणेशोत्सव खऱ्या अर्थाने साजरा झाला, असे म्हणता येईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### प्रथम तुला वंदितो...!

मंदिरात गेलो की आपण प्रदक्षिणा घालतो. सर्वात पहिली प्रदक्षिणा कुणी घातली? तर, ती गणेशानेच घातली आहे. विश्वाच्या इतिहासात मातृ-पितृभक्तीसाठी श्रीगणेशाचा उल्लेख होतो. एकदा सर्व देवतांनी पृथ्वी प्रदक्षिणेची स्पर्धा घेण्याचे ठरवले. तेव्हा कार्तिकेय त्यांचे वाहन मोरावर बसून प्रदक्षिणेसाठी निघाले. गणपतीने विचार केला, आपले वाहन तर उंदीर आहे. उंदरावर बसून प्रदक्षिणा घालायला खूप वेळ लागणार! तेव्हा गणपती आपले माता-पिता शिव-पार्वती यांना नमस्कार करून सात वेळा प्रदक्षिणा घालायचे ठरवतात. जेव्हा कार्तिकेय पृथ्वी प्रदक्षिणा घालून परत येतात, तेव्हा गणेशाला पाहून ते म्हणतात, गणेश प्रदक्षिणेला गेलाच नाही. तेव्हा गणेश कार्तिकेय यांना सांगतो की, मी आपल्या माता-पित्यांनाच सात वेळा प्रदक्षिणा घातली आहे. कारण त्यांच्या चरणांपाशी सर्व तीर्थे एकवटली आहेत, हे ऐकून शंकर प्रसन्न होऊन गणपतीला आशीर्वाद देतात की, समस्त देवतांमध्ये सर्वप्रथम तुझीच पूजा होईल. या कथेमधून आपल्याला एक शिकवण मिळते की, कुठल्याही स्पर्धेपेक्षा इतरांचा सन्मान करणे अधिक महत्त्वाचे आहे.

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

### रुग्णवाढ चिंताजनकच

३१ ऑगस्टच्या 'आपलं नागपूर'मध्ये अनेक घरांमध्ये नागपूरकर चिकनगुनियाने त्रस्त असल्याची बातमी वाचली. नागपुरातील डेंग्यू आणि चिकनगुनियाची वाढती रुग्ण संख्या निश्चितच चिंताजनक आहे. या संबंधात मनपाद्वारे डासांच्या उपसर्गावर फवारणीही होताना दिसते आहे, हे चांगलेच आहे. तसेही पावसाळ्यात अस्वच्छतेमुळे साथीचे विकार अपेक्षित असतातच. या सर्व बाबींना घरातील कुंड्या, कुलर, पाण्याच्या टाक्यांची नित्य स्वच्छता ठेवण्याची नैतिक जबाबदारी नागरिकांची असते. काही नागरिकांद्वारा घरातील अवांछित कचराही अयोग्य ठिकाणी फेकण्यात येतो; ज्यामुळे मैला वाहणाऱ्या गटर लाईन तुंबतात आणि रोगराई वाढवणारे घाण पाणी रस्त्यांवर वाहताना दिसते. याला कारण बेजबाबदार नागरिकच. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांद्वारे घरात इतरांना संसर्ग होतो, हेही पाहण्यात येते; ज्यामुळे साथीचे आजार फैलावतात. शाळांमधील स्वच्छतागृह, परिसराची विशेषतः पावसाळ्यात योग्य देखभाल करणे ही जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची आहे. रोगराईचे खापर फक्त शासकीय यंत्रणेवर फोडणे अयोग्य आहे. महानगरपालिकेत प्रत्येक वॉर्डात 'स्वच्छता निरीक्षक' असणे गरजेचे आहे; ज्यांची जबाबदारी रस्त्यांवर, इतर परिसरात साचलेल्या डबक्यांवर लक्ष ठेवून उपाययोजना करण्याची हवी. असे मनपाद्वारे नित्य होते की नाही, याविषयी शंकाच आहे. नागपुरातील अनेक विभागांतील रस्त्यांची दुर्दशा अजूनही संपलेली नाही. ठिकठिकाणी खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी साचते; जे रोगराईस आमंत्रित करते. अशाच झोन, भागात सध्या डासांमुळे उद्भवणाऱ्या साथीचे रुग्ण वाढले आहेत. ही बाब 'तरुण भारतने' निदर्शनास आणली आहे. परंतु जबाबदार यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनावर प्रश्नचिन्ह आहेच. सामान्य नागपूरकरांच्या नशिबी मात्र दरवर्षी पावसाळ्यातील दवाखान्याच्या चकरा आणि वैद्यकीय खर्च यात सुतराम फरक पडलेला नाही.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### शिवप्रेमाची काँग्रेसी ढोंगबाजी

मालवण येथे शिवरायांचा पुतळा कोसळला, ही अत्यंत दुर्दैवी, दु:खाची घटना घडली. त्याबाबतच्या दोषींवर कठोर कारवाई होईलच. महाराष्ट्रातील इतर नेत्यांबरोबरच काँग्रेसी नेत्यांनीही दु:ख व्यक्त करून त्या दुर्घटनेचे राजकारण करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला. राहुल गांधी यांनी सांगलीतील सभेत 'या दुर्घटनेप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांची माफी मागितली, पण त्यांनी समस्त महाराष्ट्राची माफी मागायला हवी' असा उथळ पत्रकारांच्या भाषेत 'हल्लाबोल' करून शब्दच्छल करण्याचा पोरकट प्रयत्न केला. ही काँग्रेसची ढोंगबाजी आहे. काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली. त्यानंतरच्या सत्तरएक वर्षांत काँग्रेसने शिवाजी महाराजांचे नावदेखील उच्चारले नव्हते. कारण काँग्रेसचा 'तुष्टीकरणाचा' कार्यक्रम! १९५६-५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची चळवळ जोरात असताना शिवप्रेम दाखविण्यात मतांचे मार्केट आहे, याचा साक्षात्कार काँग्रेसी नेत्यांना झाला आणि त्यांनी शिवप्रेमाचा बाप्तिस्मा घेऊन शिवाजी महाराजांना हायजॅक करण्याचा प्रयत्न केला. याउलट संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. तेव्हापासून आजतागायत संघामध्ये वर्षभरात जे सहा-उत्सव साजरे केले जातात त्यामध्ये 'शिवराज्याभिषेक दिना'चा समावेश असतो. (काँग्रेस सेवादल कधी काळी अस्तित्वात असताना असा समावेश होता का?) छत्रपती शिवाजी महाराज आणि राणा प्रताप हीच संघाची आराध्य दैवते आहेत. तेव्हा राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींना शिवप्रेम शिकविण्याचे ढोंग करू नये, स्वत:चे शिवप्रेम तपासावे आणि त्यांची भारतावर निष्ठा असेल तर परदेशांत भारताची बदनामी करण्याचे थांबवावे.

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पत्रा तालीमच्या लेझीमचा मुंबई, पुणे, नागपूरमध्ये पैत्रा

## शेकडो युवकांनी लयबद्ध लेझीम सादर करत सोलापूरकरांचे जिंकले मन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून पत्रा तालीम गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यात येतो, याची प्रेरणा घेऊन लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रभर सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात केली. खऱ्या अर्थाने सोलापुरातील मानाचा पणजोबा गणपती म्हणून पत्रा तालमीच्या गणपतीला मानाचे स्थान आहे.

प्रारंभी गणरायाचे पूजन पत्रा तालमीचे खलिफा दत्तात्रय कोलारकर, शिवाजीराव घाडगे गुरुजी, माजी उपमहापौर पद्माकर काळे, महेश गादेकर, राजन जाधव, श्रीकांत घाडगे, नागनाथ बन्ने, बापू जाधव, राजाराम दुधाळ, मनोज गादेकर, गणेश शेळके, सचिन शिंदे, यांच्यासह ज्येष्ठांच्या हस्ते पूजन करून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली.



पत्रा तालीम गणेश उत्सव मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करतात, गणरायाच्या आगमना निमित्त काढण्यात आलेली लेझीम मिरवणूक पाहण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यासह कर्नाटकातील नागरिक देखील दाखल होतात. अनेक वर्षाची परंपरा लयबद्ध लेझीमचे सादरीकरण, युवकांच संघटन, पैलवानांची फळी यामुळे पत्रा तालीमची वेगळी ओळख सोलापूर शहर जिल्ह्यासह महाराष्ट्रात आहे.

यंदाच्या वर्षी गणरायाच्या आगमनानिमित्त काढण्यात आलेल्या लेझीम मिरवणुकीचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वायरल झाल्यानंतर याची चर्चा मुंबई पुणे आणि नागपूर मध्ये मोठ्या प्रमाणात रंगल्याचे पहावयास मिळालं. पत्रा तालीम गणेशोत्सव मंडळाचे नूतन अध्यक्ष पै नवनाथ बन्ने, पिंटू चव्हाण, बाबूभाई बनसोडे, पेजर चव्हाण, धनराज शिंदे, आनंद कोलारकर, सुहास कोलारकर, वैभव गंगणे, पिंटू इरशेट्टी, अभिजीत दुधाळ, प्रकाश काळे, सुरज पाटील, विजय कांबळे, सुहास चाबुकस्वार, निलेश शिंदे, किशोर गादेकर, तम्मा गुडुर, यांच्यासह पत्रा तालीम युवक मंडळाच्या सदस्यांनी मिरवणूक यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# संक्षिप्त वृत्त

## सोलापूर डाक विभागाची अदालत १२ सप्टेंबरला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर,**

सोलापूर हेड पोस्टची १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता प्रवर अधिक्षक डाकघर सोलापूर यांच्या कार्यालयामध्ये डाक अदालत होणार आहे. त्यापूर्वी ९ सप्टेंबरपर्यंत तक्रार अर्ज दाखल करण्याचे आवाहन पोस्टाच्यावतीने करण्यात आले असल्याची माहिती प्रवर अधिक्षक डाकघरचे के. नरेंदर बाबु यांनी सांगितले. के. नरेंदर बाबु म्हणाले की, पोस्टाच्या कार्यपध्दतीविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेला नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अश्या तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल स्पीड पोस्ट, कांउटर सेवा, डाक वस्तु, पार्सल, बचत बँक तसेच मनिऑर्डरबाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील. देशामधील पोस्टाची सेवा ही सामाजिक आर्थिक जीवनाचा अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये वास्तविकपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करुन प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, संभाषणामध्ये पत्रव्यवहारमध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की, त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ह्या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे, असे के. नरेंदर बाबु यांनी सांगितले. पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. प्रवर अधिक्षक डाक कार्यालय सोलापुर विभाग (सोलापूर हेड पोस्ट ऑफिस पाठीमागे) सोलापुर प्रवर अधिक्षक डाकघर सोलापुर यांच्या कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

## राजर्षि शाहू मराठी विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर,**

राजर्षि शाहू मराठी विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला शिवरत्न गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेच्या पूजन करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील विद्यार्थीनी गुलाबाचे पुष्प देऊन सर्व शिक्षकांचा सत्कार केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षकांबद्दलच्या भावना शब्दात व्यक्त केल्या. या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भाषण करताना मुख्याध्यापिक गायकवाड यांनी विद्यार्थीना डॉ. सर्वपल्ली राष्धाकृष्णन यांची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शाळेतील सहशिक्षीका मनिषा पांडूरंग झेंडगे, प्रतिभा गायकवाड, विश्वासरुव घंटेनवरु, प्रियंका गायकवाड, साक्षी जाधव, सोनाली जाधव, मोनीका माने यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन डोईफोडे यांनी केले. इरय्या स्वामी यांनी आभार मानले.

## भारत मराठी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर,**

मजरेवाडी परिसरातील भारत मराठी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रम अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. के. सरसंबे होते. सहशिक्षिका टी. टी. वडावराव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कावेरी पंजलोर, तमन्ना शेख,तमन्ना मकानदार या विद्याध्यानी मनोगत व्यक्त केली. सहशिक्षक एस. एम. ढाकणे यानी डॉ. राधाकृष्णन बद्दल मनोगत व्यक्त केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत बक्षिसांचे वाटप अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी उशी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एच. ए बागवान यांनी केले. सहशिक्षिका वाय. एम. देवणगांवकर यांनी आभार मानले.

## सोमनाग प्रशालेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर,**

सोमनाग प्रशालेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व सावत्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. प्रशालेतील दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रशालेतील सर्व शिक्षकांचे फुले व पेन देऊन गौरव केले. या प्रशालेतील मुलांनी हिंदी, इंग्लिश आणि तसेच मराठीमध्ये भाषणे केली. तसेच आठवी व नववी वर्गातील विद्यार्थीनी प्रार्थना गीत व स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शहाजी नीळ व प्रमुख पाहुणे संस्था सचिव शारदा चौगुले, महात्मा विद्यामंदिर मुख्याध्यापिका सविता गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षक नीळ यांनी शिक्षक दिनाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली व विद्यार्थ्यांच्या जिवनात शिक्षकांचे महत्व किती असतो याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दहावी वर्गातील भूमी तेलंग व आभार प्रदर्शन सुधा शिर्के यांनी मानले.

## आशा अभ्यंकर यांचे निधन

**सोलापूर, दि.८ सप्टेंबरर-**



सोलापूर महापालिकेत आरोग्य खात्यातील आयजीएचओ डफरीन, राजूभाई, गोलचावडी, जिजामाता, बाळीवेस येथे ओपडी विभागात नर्स म्हणून सेवानिवृत्त झालेल्या आशा जयंत अभ्यंकर (वय ७४) यांचे शनिवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सून, नातू, एक मुलगी व जावई असा परिवार आहे.

## मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**



शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www. mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

## सह्याद्री फार्मसीमध्ये ढोल-ताश्याच्या गजरात गणेशाची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.८ सप्टेंबर-**

मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी येथे गणपती बाप्पा मोरया असा जयघोष करीत, ढोल-ताश्याच्या गजरात वाजतगाजत श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.



विधिवत पूजा विश्वजित इंगवले यांच्या हस्ते व संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालकांच्या उपस्थितीत झाली. विद्यार्थ्यांनी आकर्षक स्टेज, रंगीबेरंगी सजावट, लक्ष्यवेधून घेणाऱ्या रांगोळ्या काढल्या होत्या. तसेच श्री विठ्ठल मंदिराची हुबेहूब प्रतिकृती दर्शवणारे स्टेज बनवले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय सांस्कृतिक विभागाचे प्रा. डी. एम. झाडबुके, प्रा. अदिती पवार, विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.

## उत्कर्ष विद्यालयात भक्तिभावात गणरायाचे स्वागत

**सांगोला, दि.८ सप्टेंबर-**

सांगोला येथील उत्कर्ष विद्यालयामध्ये ढोल-ताशाच्या गजरात गणरायाचे स्वागत करण्यात आले. यावेळी माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने लेझीमच्या तालावर उत्कर्ष सभागृहात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. श्री दगडूशेठ गणपतीच्या रूपातील मूर्ती डॉ. रणजीत केळकर यांच्यातर्फे विद्यालयाला देण्यात आली. प्रतिष्ठापना सांस्कृतिक विभागाचे प्रमुख यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर गणपती स्तोत्र भिंगार्डे बाई यांनी म्हटले. गणपतीची गोष्ट मुलाणी बाई यांनी सांगितली. छत्रपती शिवरायांचा इतिहास मुलांपर्यंत पोहोचवा या हेतूने यावर्षी गड-किल्ल्यांचा देखावा सादर करून मेघडंबरीत श्री गणेशाची स्थापना




करण्यात आली आहे.या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संजूताई केळकर उपस्थित होते. लेझीम पथकाचे मार्गदर्शन बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन सर्वगोड यांनी केले. सदर गणेश उत्सवात विविध स्पर्धा, नृत्य व व्याख्याने घेण्यात येणार आहेत.

## होलार समाजातील गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या वतीने समाजातील दहावी व बारावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण तसेच क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

शालेय कुस्ती विभागात विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या गणेश विष्णू आयवळे, तसेच तालुका स्तरावर झालेल्या कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल श्रेया शंकर गेजगे, ॲड. शिवाजी कांबळे यांनी एलएलएम पदवी प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जि.प. शिक्षिका कमलताई गेजगे ह्या होत्या. प्रमुख पाहुणे माजी शिक्षणाधिकारी ज्ञानदेव जावीर, तानाजी भडंगे, मारूती जावीर, मधुकर भडंगे, अश्विनी तोरणे,




ज्योती गुळग, अन्नपूर्णा आयवळे, वैशाली गेजगे, प्रमिला गेजगे, प्रतिभा केंगार, छाया भडंगे, अस्मिता आयवळे, सवित्ता आयवळे दिपक आयवळ उपस्थित होते. प्रास्ताविक पांडूरंग गेजगे यांनी केले. यावेळी मिलींद भडंगे, नवनाथ तोरणे, बालाजी केंगार, डॉ. दत्तात्रय केंगार, आनंद आयवळे, भाऊ प्रतिष्ठानचे सचिन हेगडे, नितीन हेगडे, शशीकांत हेगडे, संजय हेगडे यांनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा केंगार यांनी केले.

## एकलनृत्य स्पर्धेत श्रावणी गायकवाडचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर,**

बालरंगभूमी परिषद' आयोजित जल्लोष लोककलेचा या महोत्सवात एकलनृत्य स्पर्धेत डॉ. भैय्यासाहेब वळसंगकर प्रशालेतील विद्यार्थिनी श्रावणी गायकवाड हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले आहे. हुतात्मा स्मृती मंदिर येथे 'लोककला महोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी एकलनृत्य स्पर्धामध्ये श्रावणीने सादर केलेल्या पारंपारिक नृत्याची द्वितीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. यावेळी हिला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम असे या पारितोषिकाचे स्वरूप होते. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, संचालक, युवा नेते डॉ. पृथ्वीराज माने यांच्या तर्फे श्रावणीचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक काशीद व सर्व शिक्षकांनी श्रावणीचे अभिनंदन केले.

## समाजाला संस्कारक्षम बनविण्यासाठी संस्कृत अध्ययनाची आवश्यकता

हल्ली सर्वत्र समाजविघातक प्रवृत्ती वाढत असल्याचीच आपल्या दृष्टिपथात येत आहे. समाजातील नैतिक अधिष्ठानाचा ऱ्हास होवून क्रौर्याची परिसीमा वाढली आहे.घरोघरी अथवा सामाजिक स्थळी घडणाऱ्या हिंसक घटना या भावनिक बोथट पणाला दर्शवित आहेत. याचेच द्योतक म्हणून वाढत्या वृद्धाश्रमाची संख्या लक्षात घ्यावी लागेल. हिंसक प्रवृत्तीतून घडून आलेल्या अनेक घटना सामाजिक स्तराचे अध:पतन दर्शवितात. नुकत्याच घडलेल्या रायगड, नवी मुंबई व सगळ्यांना अस्वस्थ करणारी कोलकात्याची घटना स्वातंत्र्याच्या कोणत्या निकषाला सूचित करते आहे. तेव्हा ही परिस्थिती सुधारावयाची असल्यास नैतिक आचरणाचे, कर्तव्यापालनाचे, सत्कर्माचे, धर्माचरणाचे, ज्ञान देणाऱ्या संस्कृतभाषेचा समावेश अभ्यासक्रमात पहिली इयत्तेपासून झाला पाहिजे. हीचं काळाची गरज आहे. आपण जेव्हा गुरुकुल पद्धतीचा अवलंब केला होता. तेव्हा सांस्कृतिकदृष्ट्या आपण समृद्ध होतो याचे विस्मरण झाल्याने आज समाजाच्या वर्तणुकीला अमानुषपणाच्या आचरणाचा कलंक लागला आहे. तेव्हा सदवर्तणुकीचा पाया घालणाऱ्या आणि कर्तव्यपालनाचे धडे देणाऱ्या भगवद्गीतेसारख्या धर्मग्रंथांना तसेच नीतिशास्त्र शिकवणाऱ्या पंचतंत्र व हितोपदेश यासारख्या ग्रंथांना अभ्यासक्रमात समाविष्ट करणे गरजेचे वाटते.

**- उज्ज्वला शिंदे**
९५५२१९५१४६

रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे
**शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला**
सर्व्हे नं. ७६/१, ७७ सांगोला - जत रोड, सांगोला. पिन ४१३३०७
वेब : www.spcsangola.com ई मेल : spc_sangola@yahoo.com



**थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा प्रवेश सुरु २०२४-२५**
**DTE Code : 6471**

**रिक्त राहिलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंग अभ्यासक्रमांना खालील मान्यता प्राप्त कोर्सेसना प्रवेश सुरु (ACAP)**

| अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | चॉईस कोड | थेट द्वितीय वर्ष रिक्त जागा | |
|---|---|---|---|---|
| | | | ACAP | EWS |
| १. मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | ६४७१६१२१० | ०१ | ०२ |
| २. सिव्हिल इंजिनिअरिंग | ६० | ६४७११९११० | १३ | ०१ |
| ३. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकॅम्युनिकेशन इंजि. | ६० | ६४७१३७२१० | ०० | ०३ |
| ४. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग | ६० | ६४७१२४५१० | ०० | ०१ |
| ५. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० | ६४७१२९३१० | ०० | ०० |

**प्रवेशासाठी पात्रता**

**थेट द्वितीय वर्ष :** १. १२ वी सायन्स (PCM/ PCMB/ टेक्निकल/बाय फोकल/एमसीव्हीसी/ व्होकेशनल) परिक्षेत किमान ३५ टक्के गुण आवश्यक.
२. आयटीआय (ITI) २ वर्षे कालावधी पास.

**थेट द्वितीय वर्ष :** Non-CAP **प्रवेश प्रक्रिया.**
Application for Non-CAP/Against CAP Seat: 11 September 2024.
General Merit List: 12 September 2024. 11.00am
Final Merit List: 12 September 2024. 05.00pm
Confirmation of Admission: 13 to 14 September 2024.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**प्रा. एस. बी. चंदनशिवे** ९१७२५९८६९९
**प्रा. एस. एस. गायकवाड** ९८६०९८०७३८
**प्राचार्य प्रा. आर. ए. देशमुख** ९७६३३२८४६१

**सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि; शंकरनगर-अकलूज**
ता. माळशिरस, जि. सोलापूर
जा. नं./ ए. जी. एम. /२४०९/ २०२४-२०२५ दिनांक : ०५/०९/२०२४

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
(फक्त सभासदांकरिता)

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि; शंकरनगर-अकलूज या संस्थेच्या अधिमंडळाची सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २६/०९/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता "सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे फॅक्टरी बिल्डिंगमध्ये" खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी, सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय -**

विषय नं. १ :- मागील दिनांक २७/०९/२०२३ रोजी भरलेल्या मा.अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.
विषय नं. २ :- दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा संस्थेच्या कार्याचा मा.संचालक मंडळाकडून आलेला अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.
विषय नं. ३ :- दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर वैधानिक लेखा परिक्षक एम.जी.बी.एम.ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंटस्, बार्शी यांनी तपासलेली व मंजूर केलेली हिशोबाची पत्रके आणि बोनस इत्यादी तरतुदी असलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक दाखल करून घेणे व त्यास मंजूरी देणे.
विषय नं. ४ :- दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षक एम.जी.बी.एम.ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंटस्, बार्शी यांचेकडून आलेला हिशोब तपासणी अहवाल (ऑडीट रिपोर्ट) बाबत विचार विनिमय करणे.
विषय नं. ५ :- सन २०२४-२०२५ वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची (बजेट) नोंद घेणे आणि सन २०२३-२०२४ वर्षामध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
विषय नं. ६ :- पोटनियम नं. ४ अन्वये मा. संचालक मंडळास भांडवल उभारणेचा अधिकार देणेबाबत विचार करणे.
विषय नं. ७ :- सन २०२३-२०२४ सालामध्ये " ई ऑक्शनद्वारे " विक्री केलेल्या स्क्रॅप मालाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.
विषय नं. ८ :- सन २०२४-२०२५ साठी टॅक्स ऑडिटर व सल्लागार यांचे केलेल्या नेमणूकीस मंजूरी देणे व सन २०२५-२०२६ साठी टॅक्स ऑडिटर व सल्लागार यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.
विषय नं. ९ :- सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं.१० :- मा.साखर आयुक्तसो.,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ०५ एप्रिल २०१७ चे परिपत्रकाप्रमाणे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात मा. संचालक मंडळाच्या पुर्व मंजूरीने यंत्र सामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकाम विषयक केलेल्या भांडवली कामाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.
विषय नं.११ :- कारखाना पुरस्कृत स्थापन झालेल्या शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील शेतकरी कल्याण निधी ट्रस्ट या दोन विश्वस्त संस्थांकडील सन २०२३-२०२४ वर्षातील झालेल्या कामकाजाची व हिशोब पत्रकांची माहिती घेवून त्यास मंजूरी देणे व निधी कपातीबाबत विचार करणे.
मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने योग्यरितीने सभेपुढे येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

कळावे,
आपला विश्वासू,
मा.संचालक मंडळाचे आदेशावरून
(आर.के.चौगुले)
कार्यकारी संचालक

**- विशेष सुचना -**

१) सहकारी संस्था सभासदातर्फे मा.अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, कामकाजात भाग घेणे, मतदान करणे इ.बाबत आपल्या प्रतिनिधीस अधिकार दिल्याबद्दल सोसायटी पंचकमिटीच्या ठरावाची खरी नक्कल दि.२१/०९/२०२४ पर्यंत कारखाना कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पोहोचल्या पाहिजेत.
२) ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाच्या नकला सभासदांचे अवलोकनार्थ विभागीय कार्यालय व प्रशासकीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावलेले आहेत.
३) गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झालेस ती सभा कारखान्याच्या पोटनियम क्र.२३ ला अधिन राहून पार पाडली जाईल.
४) मा.सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास ती दि.२१/०९/२०२४ पर्यंत कारखाना कार्यालयात ऑफिस वेळेमध्ये मागणी करणेत यावी.
५) कारखान्याचे थकबाकीदार सभासदांनी थकबाकी भरणा करावी.
६) कारखान्याचे सर्व सभासदांनी त्यांचेकडील संपुर्ण उपलब्ध ऊस सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडे गळीतासाठी द्यावा.
७) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) अपुर्ण रक्कम पुर्ण करावी.
८) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) संदर्भात वारस नोंद संस्थेकडे द्यावी.
९) सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडील उपलब्ध सेवांचा लाभ घ्यावा. ऊसाची नोंदणी करावी, उपलब्ध ऊस गाळपास द्यावा तसेच सभासदास लागू असलेल्या सर्व नियमांची पुर्तता करावी.
१०) सदर नोटीस संस्थेच्या शेतकी विभागातील कर्मचारी यांचे मार्फत पोहोच करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## महत्त्वाचे

### गोवा चॅलेंजर्सला सलग दुसऱ्यांदा यूटीटी विजेतेपद



**चेन्नई** : हरमीत देसाईच्या नेतृत्वाखालील गोवा चॅलेंजर्सने जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात जी. साथियनच्या नेतृत्वाखालील दबंग दिल्ली टीटीसीवर ८-२ असा विजय नोंदवून सलग दुसऱ्यांदा अल्टीमेट टेबल टेनिस लीग स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात गोव्याच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत वर्चस्व गाजविले. पुरुष एकेरीचा पहिला गेम जिंकूनही दबंग दिल्लीला आपली आघाडी कायम राखता आली नाही व ८-२ असा पराभव स्वीकारला.

### विनेश, बजरंगला सेवामुक्त करण्याची रेल्वेची प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली**: उत्तर रेल्वेने कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांचा राजीनामा स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या दोन्ही खेळाडूंना शक्य तितक्या लवकर सेवामुक्ती मिळण्याची अपेक्षा आहे, असे रेल्वे सूत्रांनी रविवारी सांगितले. विनेश व बजरंग या दोघांनीही अलिकडेच काँग्रेसमध्ये प्रवेश केला. हरयाणातील जुलाना विधानसभा मतदारसंघातून विनेशला निवडणूक लढवण्यासाठी तिकीट देण्यात आले आहे. रेल्वे कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्यानंतर तीन महिन्यांचा नोटिस कालावधी देण्याची तरतूद या दोन खेळाडूंना दिलासा देण्याच्या मार्गात अडचण येणार नाही, कारण आम्ही त्यांच्या प्रकरणांमध्ये नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे, असे एका वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. या दोन्ही खेळाडूंना शक्यतो आज किंवा लवकरात लवकर सुटका मिळेल. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना त्यांच्या पक्षात सहभागी होण्यासाठी भेटल्यानंतर उत्तर रेल्वेने (एनआर) यापूर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या नोटीसनंतर दोघांनीही रेल्वेचा राजीनामा दिला. तीन महिन्यांच्या नोटिस कालावधीच्या नियमानुसार फोगट निवडणूक लढवू शकणार नाहीत, अशी अटकळ पसरली होती.

### भारत पुढील ऑलिम्पिकमध्ये हॉकीचे सुवर्ण जिंकेल : श्रीजेश

**पाटणा** : ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरे कांस्यपदक जिंकून यशाची भरारी मारणारा भारतीय हॉकी संघ आता २०२८ मध्ये लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याच्या आशेने हा वेग वाढवण्याचे ध्येय ठेवत आहे, असे गोलरक्षक पी. आर. श्रीजेश म्हणाला. श्रीजेशने नुकतीच बिहारची राजधानी पाटणामधील क्रीडासंकुलाला भेट दिली. त्याप्रसंगी तो बोलत होता. बिहार हे भविष्यातील क्रीडा केंद्र म्हणून पुढे येत आहे. मला बिहारमध्ये अनेक सकारात्मक घडामोडी दिसत आहेत, विशेषत: राजगीर येथील क्रीडा संकुलात आता एक ॲस्ट्रो टर्फ मैदान आहे आणि या वर्षाच्या शेवटी येथे महिला आशियाई चषक हॉकी स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे, असे तो म्हणाला. असे असताना बिहार देशाचे पुढील क्रीडा केंद्र म्हणून उदयास येऊ शकत नाही याचे मला कोणतेही कारण दिसत नाही. मी येथे क्रीडा विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटलो आहे आणि मला क्रीडा विद्यापीठ स्थापनेसारखे अनेक उपक्रम खूप वाटले, असेही तो म्हणाला. कनिष्ठ पुरुष हॉकी संघाचे प्रशिक्षक म्हणून नवीन कार्यभार स्वीकारलेल्या श्रीजेशने पुढील आशिया चषकावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. आपण क्रिकेट संघाचा माजी कर्णधार राहुल द्रविडकडून प्रेरणा घेतल्याचा त्याने पुनरुच्चार केला. यावेळी ३६ वर्षीय श्रीजेशने पॅरिस ऑलिम्पिकमधील आपल्या अनुभवांचे कथान केले.

### अखेरच्या क्षणी मलेशियाने पाकिस्तानला बरोबरीत रोखले

**मोकी** : हिरो आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेत रविवारी पहिले दोन सामने रोमहर्षकपणे अनिर्णित राहिले. अखेरच्या क्षणी एक महत्त्वपूर्ण गोल करून मलेशियाने चुरशीच्या सामन्यात पाकिस्तानला २-२ गोलने बरोबरीत रोखले. तत्पूर्वी, कोरिया व जपान यांच्यादरम्यानचा सलामीचा सामना ५-५ गोलने बरोबरीत राहिला. सुफियान खानने पेनॉल्टी कॉर्नरवर गोल करून पाकिस्तानला १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. त्यानंतर १० मिनिटांनी पाकिस्तानने आणखी एका गोलची भर घातली. झिकरिया हयातने ३२ व्या मिनिटाला अप्रतिम मैदानी गोल केला. पाच मिनिटांनंतर पाकिस्तानच्या बचावात्मक त्रुटीमुळे मलेशियाला पेनॉल्टी कॉर्नरची संधी मिळाली. अनुभवी फैजल सारीने शानदार गोल करून पाकिस्तानची आघाडी १-२ अशी कमी केली. दोन्ही संघ एकमेकांच्या बरोबरीने खेळत असल्याने शेवटच्या चरणात जोरदार चुरस निर्माण झाली होती, परंतु पाकिस्तानने आपल्या सर्व शक्तीनिशी २-१ अशी आघाडी राखली, मात्र अखेरच्या क्षणी मलेशियाला पेनॉल्टी कॉर्नरची संधी मिळाली, या संधीचे सोने करत अईमन रोझेमीने मलेशियाला सामना बरोबरीत राखण्यास मदत केली.

# भारताने जिंकली विक्रमी २९ पदके

## पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेचा समारोप ● ७ सुवर्ण, ९ रौप्य, १३ कांस्यपदके




समारोप समारंभासाठी सज्ज भारतीय पॅरालिम्पिकपटू



◆ **पॅरिस, ८ सप्टेंबर**

पूजा ओझा महिलांच्या नौकानयन एकेरी २०० मीटर केएल१ स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरली, याबरोबरच रविवारी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताची विक्रमी मोहीम संपुष्टात आली.

अंतिम फेरीत प्रवेश करण्यासाठी पूजा पात्रता फेरीत पहिल्या तीन क्रमांकात स्थान मिळवू शकली नाही. अशा प्रकारे भारताने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कांस्यपदकांची विक्रमी कामगिरी केली आणि एकूण पदकतालिकेत १८ वे स्थान मिळविले. रविवारी येथे झालेल्या नयनरम्य कार्यक्रमाने पॅरिस ऑलिम्पिकचा समारोप समारंभ पार पडला. या सांगता सोहळ्यात तिरंदाज हरविंदर सिंग व धावपटू प्रीति पाल भारतीय पथकाचे ध्वजवाहक होते.

शनिवारी रात्री उशिरा भारताच्या अतुलनीय पदकांच्या संख्येत भर पडली. पुरुषांच्या भालाफेक एफ-४१ प्रकारात नवदीप सिंगला सुवर्णपदक बहाल करण्यात आले. या स्पर्धेत नवदीप वास्तविक दुसऱ्या स्थानावर आला ह ोता, परंतु अव्वल स्थानावरील इराणच्या खेळाडूला अपात्र घोषित करण्यात आले, त्यामुळे नवदीच्या श्रेणीत सुधारणा करण्यात आली व त्याला रौप्यपदकाच्या जागी सुवर्णपदक बहाल करण्यात आले. नवदीपचे हे सुवर्णपदक भारताचे सातवे सुवर्ण व एकूण २९ वे पदक ठरले.

त्यापूर्वी सिमरन शर्माने महिलांच्या २०० मीटर टी-१२ शर्यतीत २४.७५ सेकंद अशी वेळ नोंदवत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक मिळविले.

भारताच्या विक्रमी कामगिरीत ॲथ्लिट सुमित अंतिल व नेमबाज अवनी लेखराच्या कामगिरीचा देशाला अभिमान वाटला आणि त्यांनी भारतीय पॅरा-ॲथ्लेटिक्सच्या वाढत्या सामर्थ्याला जागतिक स्तरावर पोहोवले. गत टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारत ५ सुवर्ण, ८ रौप्य व ६ कांस्यपदकांसह २४ व्या स्थानावर होता.

वैरेस-सुर-मार्ने स्टेडियमवर पॅरालिम्पिकच्या समारोपाच्या दिवशी पूजा मैदानात उतरलेली शेवटची भारतीय होती. महिलांच्या नौकानयन एकेरी २०० मीटर केएल१ स्पर्धेच्या उपांत्य फेरी पूजाने १:१७.०३ च्या वेळेसह पूर्ण केली, परंतु ती तिसऱ्या स्थानावर असलेल्या इटलीच्या एलिओनोरा डी पाओलिसपेक्षा ७.०३ सेकंद मागे होती. पहिल्या तीन क्रमांकात स्थान न मिळविल्यामुळे ती अंतिम फेरीत प्रवेश करु शकली नाही. हीट दरम्यान, पूजा पाचव्या स्थानावर राहिली होती.

पूजाशिवाय, प्राची यादव ही आणखी एक कॅनो स्प्रिंटर होती. तिने शनिवारी महिलांच्या व्हीएल२ २०० मीटर नौकायन स्पर्धेत आठवे स्थान पटकावले होते. भारताचा एकमेव पुरुष नौकापटू यश कुमारने केएल-१ २०० मीटर प्रकारच्या उपांत्य फेरीत पाचवे स्थान मिळवले. ◀(वृत्तसंस्था)

# ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाच्या अध्यक्षपदी रणधीर सिंग

## निवडून आलेले पहिले भारतीय ठरले

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

१९७८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते नेमबाज व अनुभवी क्रीडा प्रशासक रणधीर सिंग यांची रविवारी आशियाई ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाचे (ओसीए) चे अध्यक्ष म्हणून अधिकृतपणे बिनविरोध निवड झाली. ओसीएच्या अध्यक्षपदी विराजमान होणारे ते पहिले भारतीय ठरले आहे.



पाच वेळा ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणारे नेमबाज रणधीर सिंग हे ओसीएच्या अध्यक्षपदासाठी एकमेव पात्र होते व त्यांची एकमताने निवड झाली. त्यांचा कार्यकाळ २०२४ ते २०२८ पर्यंत चालेल.

७७ वर्षीय रणधीर सिंग २०२१ पासून ओसीएचे कार्यवाहक अध्यक्ष आहेत, कुवेतच्या शेख अहमद अल-फहाद अल-सबाह यांना या वर्षी मे महिन्यात क्रीडा प्रशासनाकडून नैतिकतेच्या उल्लंघनामुळे १५ वर्षांची बंदी घालण्यात आली.

भारतीय व आशियाई क्रीडा संस्थांमध्ये विविध प्रशासकीय पदे भूषविणाऱ्या रणधीर यांना क्रीडा मंत्री मनसुख मांडविया व आशियातील सर्व ४५ देशांतील सर्वोच्च क्रीडा नेत्यांच्या उपस्थितीत अधिकृतपणे ओसीएचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.

रणधीर सिंग हे मूळचे पंजाबमधील पतियाळा येथील असून ते खेळाडूंच्या कुटुंबातील आहे. त्यांचे काका, महाराजा यादविंद्र सिंग हे भारताकडून कसोटी क्रिकेट खेळले आणि ते आयओसीचे सदस्य होते. त्यांचे वडील भलिंद्र सिंग हे सुद्धा प्रथम श्रेणी क्रिकेटपटू होते. ते १९४७ ते १९९२ दरम्यान आयओसीचे सदस्य होते. रणधीर सिंग हे २००१ ते २०१४ दरम्यान आयओसीचे सदस्य देखील होते, त्यानंतर ते जागतिक क्रीडा संस्थेचे मानद सदस्य म्हणून कार्यरत होते.

मी मनापासून तुम्हा सर्वांचे मनापासून आभार मानतो. आशिया हे कुटुंब आहे. आम्ही दीर्घकाळ हे कुटुंब कायम राखण्याचा प्रयत्न करू, असे रणधीर सिंग निवडून आल्यानंतर म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# भारत ब संघाचा ७६ धावांनी विजय

## दुलिप करंडक क्रिकेट ● मुशीर खान सामनावीर

◆ **बंगळुरू, ८ सप्टेंबर**

दुलिप करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात चौथ्या दिवशी अभिमन्यू ईश्वरनच्या नेतृत्वाखालील भारत ब संघाने शुभमन गिलच्या भारत अ संघावर ७६ धावांनी विजय नोंदविला. पहिल्या डावात १८१ धावांची दिमाखदार खेळी करणारा मुशीर खान सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.




भारत ब संघाने दुसऱ्या डावात ४२ षटकांत सर्वबाद १८४ धावा काढल्या आणि भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना संपूर्ण भारत अ संघ ५३ षटकांत १९८ धावांतच गारद झाला.

भारत ब संघाने पहिल्या डावात ३२१ धावा उभारल्या होत्या व त्याच्या प्रत्युत्तरात भारत अ संघाला २३१ धावांपर्यंतच मजल मारता आली. पहिल्या डावात ९० धावांची आघाडी मिळविणाऱ्या भारत ब संघाने तिसऱ्या दिवस अखेर दुसऱ्या डावात ६ बाद १५० धावा काढल्या होत्या. याच धावसंख्येवरून भारत ब संघाने रविवरी चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली व त्यांचा दुसरा ४२ षटकांत सर्वबाद १८४ धावांत आटोपला.

भारत अ संघाने विजयासाठी २७५ धावा काढण्याचा कसोशीने प्रयत्न केला, परंतु त्यांना ५३ षटकांत १९८ धावांपर्यंतच मजल मारता आली. केएल राहुल (५७) व आकाश दीपने (४३) तेवढी एकाकी झुंज दिली, परंतु अन्य फलंदाज भारत ब संघाच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाहीत. यश दयालने ३ बळी, मुकेश कुमार व नवदीप सैनीने प्रत्येकी २ बळी, तर वॉशिंग्टन सुंदर व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

# गतविजेत्या भारताचा चीनवर ३-० ने विजय

### आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी

◆ **हुल्लनबूर, ८ सप्टेंबर**

येथे रविवारपासून प्रारंभ झालेल्या आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेत गतविजेत्या भारताने चीनवर सरळ ३-० ने मात करून स्पर्धेत विजयी सलामी नोंदविली व विजेतेपद कायम राखण्याच्या दिशेने आगेकूच केली.

भारताकडून सुखजीत सिंग (१४ व्या मिनिटाला), उत्तम सिंग (२७ व्या मिनिटाला) व अभिषेकने (३२ व्या मिनिटाला) गोल नोंदवून संघाचा विजय साकार केला. ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरे कांस्यपदक मिळविल्यानंतर स्पर्धेत उतरताना भारतीय संघ अधिक उत्साही दिसला. भारतीय हॉकीपटूंनी सामन्यात संधी निर्माण केल्या आणि विजय मिळवण्यासाठी मजबूत बचावात्मक खेळ सादर केला.





चीनविरुद्ध विजय नोंदवल्याचा आनंद साजरा करताना भारतीय हॉकीपटू

कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला, मला वाटते आम्ही खूप चांगले खेळलो. आम्ही काही चांगल्या संधी निर्माण केल्या, पण सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आम्ही सामन्यात निर्विवाद वर्चस्व गाजविले, एकही गोल स्वीकारला नाही, असे कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला.

काही नवीन चेहऱ्यांना कामगिरी करण्याची संधी मिळाली व ते खूप चांगले खेळले. त्यांना आशियाई संघांसोबत व वरिष्ठ संघासोबत खेळण्याची ही चांगली संधी आहे. ते कुशल आणि अतिशय प्रतिभावान आहेत. मी त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा देतो, असेही तो म्हणाला.

चीनने सामन्याच्या प्रारंभी काही आक्रमण केल्यामुळे भारताची गती कमी झाली होती, असे तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# आर्यना सबालेन्का अमेरिकन ओपन विजेती



आकर्षक चषकासह आर्यना सबालेन्का

◆ **न्यू यॉर्क, ८ सप्टेंबर**

बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने अंतिम सामन्यात जेसिका पेगुलावर ७-५, ७-५ असा विजय नोंदवून अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. न्यू यॉर्कमधील आर्थर ॲशे स्टेडियमवर हा सामना खेळला गेला.

पेगुलाने उपांत्य सामन्यात झेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हाला पराभूत केले, तर अन्य उपांत्य सामन्यात सबालेन्काने अमेरिकेच्या एम्मा नवारोवर सरळ सेटमध्ये मात केली. यापूर्वीही तिने दोन उपांत्य फेरी गाठली होती. ती गत वर्षीच्या आवृत्तीत उपविजेती ठरली होती. ती अमेरिकेच्या कोको गॉफकडून पराभूत झाली होती.

सबालेन्काने यावर्षी न्यू यॉर्कमध्ये आपल्या स्वप्न व भावनेला मूर्त रूप दिले. दुखापत व निराशेतून बाहेर पडत तिने अमेरिकन ओपन चषकाला गवसणी घातली. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सबालेन्काने आपले विजेतेपद राखले, पण रोममध्ये पाठीला दुखापत झाली आणि रोलॅण्ड गॅरोस उपांत्यपूर्व फेरीत आजारपणामुळे बाहेर पडली. खांद्याच्या दुखापतीमुळे ती पूर्णपणे विम्बल्डन स्पर्धेला मुकली होती.

मला कोर्टात आणि बाहेर खूप आव्हानांचा सामना करावा लागला, मात्र मी हे स्वप्न कधीच सोडले नाही. आज ते साकार झाले, असे सबालेन्का म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

# इंग्लंडचा अष्टपैलू मोईन अली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

◆ **लंडन, ८ सप्टेंबर**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी मालिकेकडे दुर्लक्ष केल्यामुळे इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू मोईन अलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

पुढच्या पिढीसाठी जागा मोकळी करण्याची हीच वेळ आहे, असे वाटले. मी माझे कर्तव्य पूर्ण केले आहे, असे ३७ वर्षीय मोईन अलीने ब्रिटीश वृत्तपत्र डेली मेलला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

मोईन अलीने इंग्लंडसाठी ६८ कसोटी, १३८ एकदिवसीय आणि ९२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि दोन्ही छोट्या प्रकारात विश्वचषक जिंकला.

मी अजूनही सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करू शकतो असे मला वाटते,, परंतु मी आपल्या आंतरराष्ट्रीय भविष्याबद्दल वास्तववादी होण्याचा प्रयत्न करत आहे, असे तो म्हणाला.



मी पुन्हा इंग्लंडसाठी खेळण्याचा प्रयत्न करू शकतो, परंतु खेळणार नाही, असेही मोईनने स्पष्ट केले आहे. वन-डे व टी-२० विश्वचषक स्पर्धेतील निराशाजनक कामगिरीनंतर मॅथ्यू मॉटला गत महिन्यात इंग्लंडच्या मर्यादित षटकांच्या संघांच्या मुख्य प्रशिक्षक पदावरून हटविण्यात आले.


अली व जॉनी बेअरस्टोला संघातून काढून टाकल्यानंतर संघ बदलाची भूक अद्यापही कायम आहे. या दोन्ही खेळाडूंनी ४०० हून अधिक सामन्यात इंग्लंडचे प्रतिनिधीत्व केले आहे. मोईन हा अलीकडच्या काळात जोस बटलरचा प्रभावशाली उपकर्णधार होता. ◀(वृत्तसंस्था)

# २०३० युवा ऑलिम्पिक यजमानपदासाठी भारत दावा सादर करणार

## क्रीडा मंत्री मांडविया यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

भारत २०३० युवा ऑलिम्पिक स्पर्धेच्या यजमानदासाठी दावा सादर करणार आहे. ते २०३६ ऑलिम्पिकच्या यजमानपद भूषवण्याच्या देशाच्या महत्त्वाकांक्षेचा पाया आहे, असे क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी रविवारी सांगितले.



२०३० युवा ऑलिम्पिक ही आंतरराष्ट्रीय स्पर्धेची पाचवी आवृत्ती असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही २०३० च्या युवा ऑलिम्पिकच्या यजमानपदासाठी दावा सादर करणार आहोत, परंतु आमचे लक्ष २०३६ च्या ऑलिम्पिकच्या यजमानपदावर आहे, असे मांडविया यांनी ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाच्या (ओसीए) ४४ व्या आमसभेच्या वेळी सांगितले. ते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही क्रिकेट विश्वचषक, १७ वर्षांखालील फुटबॉल विश्वचषक यासह अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करू शकलो आहोत, असे अध्यक्ष जेपी नड्डा म्हणाले.

२०३० च्या युवा ऑलिम्पिकच्या यजमानपदासाठी भारत पेरू, कोलंबिया, मेक्सिको, थायलंड, मंगोलिया, रशिया, युक्रेन, बोस्निया आणि हर्जेगोविना यांच्याशी लढणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# अफगाणिस्तान-न्यूझीलंड एकमेव कसोटी सामना आजपासून

◆ **ग्रेटर नोएडा, ८ सप्टेंबर**

सोमवारपासून येथे न्यूझीलंड आणि अफगाणिस्तान यांच्यादरम्यान एकमेव कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. न्यूझीलंड संघ अफगाणिस्तानच्या लाल चेंडूच्या क्रिकेटमधील अननुभवीपणाचा फायदा उचलण्याचा प्रयत्न करणार आहे.

उपखंडात उसळी देणाऱ्या खेळपट्टीवर खेळणे न्यूझीलंडसाठी आव्हानात्मक असेल, कारण उपखंडात न्यूझीलंडने ९० पैकी ४० सामन्यात पराभव पत्करला आहे, ही कामगिरी लक्षात घेता न्यूझीलंडला झटपट विजय मिळवायचा आहे. वरिष्ठ फलंदाज केन विल्यमसनने परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या गरजेवर भर दिला आहे, कारण त्यांना पुढील महिन्यात भारताविरुद्धच्या मालिकेसाठी चांगली तयारी करता येईल.

या सामन्यात फिरकी गोलंदाजीचे वर्चस्व अपेक्षित आहे आणि न्यूझीलंडने पाच संथ गतीच्या गोलंदाजी पर्यायांसह चांगली तयारी केली आहे.




न्यूझीलंडचा कर्णधार टीम साऊदी व अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्लाह शाहिदी

२०२१ मध्ये मुंबईत १० बळी घेतल्यानंतर पहिल्यांदाच भारतात परतणारा डावखुरा फिरकी गोलंदाज एजाज पटेल याला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळण्याची अपेक्षा आहे.

चेन्नईतील सीएसके परफॉर्मन्स सेंटरमध्ये सराव करणाऱ्या रचिन रवींद्रला फलंदाजी व गोलंदाजीमध्ये हातभार लागण्याची अपेक्षा आहे. अष्टपैलू ग्लेन फिलिप्स, मिचेल सॅण्टनर व मायकेल ब्रेसवेल उर्वरित फिरकीपटूंच्या जागा भरण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

मॅट हेनरी हा सध्या न्यूझीलंडचा सर्वोत्कृष्ट वेगवान गोलंदाज आहे, पण कर्णधार टीम साऊदीचा कसोटी फॉर्म चिंतेची बाब असेल.

न्यूझीलंड संघाला आलेली मरगळ झटकून काढणे आवश्यक आहे, कारण त्यांनी मार्चच्या सुरुवातीपासून कसोटी क्रिकेट खेळलेले नाही आणि कठोर अफगाणिस्तान संघ मजबूत आव्हान उभे करण्यास तयार आहे.

अफगाणिस्तानने २०१७ मध्ये कसोटी दर्जा प्राप्त केला असून हा त्यांचा १० वा कसोटी सामना असेल.

अफगाणिस्तानने आपल्या छोट्या कसोटी प्रवासात आयर्लण्ड, बांगलादेश व झिम्बाब्वेला पराभूत करण्यात यश मिळविले आहे. अफगाणिस्तानने पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे, परंतु काही खेळाडूंना आता त्वरित टी-२० मधून कसोटी फॉर्मेटमध्ये बदलणे आवश्यक आहे.

आठवडाभर पाऊस आणि वादळाचा अंदाज असल्याने सामन्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**प्रतिस्पर्धी संघः-**

हशमतुल्लाह शाहिदी (कर्णधार), इब्राहिम झादरन, रहमत शाह, अब्दुल मलिक, रियाझ हसन, अफसर झझाई (यष्टिरक्षक), इक्रम अलीखिल (यष्टिरक्षक), बहीर शाह, शाहिदुल्ला कमाल, अजमातुल्ला उमरझाई, शम्स उर रहमान, झिया-उर रहमान , जहीर खान, कैस अहमद, खलील अहमद आणि निजात मसूद.

**न्यूझीलंड** : टिम साऊदी (कर्णधार), टॉम ब्लंडेल (यष्टिरक्षक), मायकेल ब्रेसवेल, डेव्हॉन कॉनवे, मॅट हेनरी, टॉम लॅथम, डॅरिल मिचेल, विल ओ'रुर्क, एजाज पटेल, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सॅण्टनर, बेन सियर्स, केन विल्यमसन व विल यंग. ◀(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### श्री छत्रपती शिवाजी मंडळाच्या श्रींची इंद्रजित पवार यांच्या हस्ते पूजा

**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

श्री छत्रपती शिवाजी मराठा युवा कला, क्रीडा शिक्षण व सांस्कृतिक, शैक्षणिक मंडळाच्यावतीने श्रींची पूजा उत्तर सोलापूर भाजपा नेते इंद्रजित पवार यांच्या हस्ते झाली. यावेळी मागुलचंद्र पवार भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार तसेच काशिनाथ कदम, कमलाकर माने, आंबीर बोगे, प्रभाकर फुलसागर, संभाजी पवार, रुकमोद्दीन शेख, युवराज पवार, गणेश पवार, अझहर शेख, सौदागर जाधव, मनगिन भालेकर, तात्या नागणकरे, दीपक गिरे, मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुतार, खजिनदार बापू जगताप तसेच मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### 'ओला'ची ग्राहकांना आकर्षित फेस्टिव्हल ऑफर्स सुरू

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

आज ओला इलेक्ट्रिकने सणासुदीच्या आधी आकर्षक डील आणि ऑफर जाहीर केल्या आहेत,ज्या अंतर्गत निवडक एस वन स्कूटर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ५००० रुपयांची सूट दिली जात आहे. ग्राहकांना निवडक बँकांच्या ॲक्सेसरीज आणि क्रेडिट कार्ड ईएमआयवर ११,००० रुपयांपर्यंतचे अतिरिक्त फायदे देखील मिळतील.त्यांना १२,००० रुपयांपर्यंतचा एक्सचेंज बोनस देखील मिळू शकेल. ही ऑफर जवळच्या ओला इलेक्ट्रिक स्टोअरमध्ये उपलब्ध आहे आणि निवडक शहरांमध्ये १५ सप्टेंबरपर्यंत लागू असेल.सर्व ओला इलेक्ट्रिक स्कूटर ८ वर्षे / ८०,००० किमीची विस्तारित बॅटरी वॉरंटी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय येते.

# नेहरूजी गणेश मंडळ व आस्थाच्या वतीने गणेश जयंतीनिमित्त गरजूंना अन्नदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

नेहरूजी गणेश बाल मंडळ आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने गणपतीची प्राणप्रतिष्ठापना करून गोर, गरिब बेघर यांना अन्नदान करण्यात आले.

पूर्व मंगळवार पेठ या ठिकाणी गणेश चतुर्थी निमित्ताने गणपतीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, सिद्धू बेऊर, सुहास छंचुरे, पिंटू कस्तुरे, योगीराज आरळीमार, वेंदात तालिकोटी, प्रथमेश गावडे, गणेश ठेसे, आनंद बुरकुले, महेश घोंगडे, सुरज छंचुरे, उदय छंचुरे यांच्या उपस्थितीत गणेशाची आरती करण्यात आली.



मंडळाच्या वतीने परिसरातील लहान मुलांचे विविध मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करून त्यांना बक्षीस देऊन गौरवण्यात येत असते. गणपतीचे प्राण प्रतिष्ठापना झाल्यानंतर आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने गोर, गरीब, वंचित बेघर, निराधार यांच्यासाठी शंभर जणांचे अन्नदान करण्यात आले. आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने रोज दहा दिवस गणपतीनिमित्ताने, गरिबांना अन्नदान करण्यात येणार आहे, असे अध्यक्ष आनंद तालिकोटी म्हणाले.



# सोलापूर विमानतळास 'महाराजा यशवंतराव होळकर' यांचे नाव द्या

## पुण्यश्लोक साम्राज्य संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक साम्राज्य संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत केंद्रीय उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सोलापूर विमानतळास महाराजा यशवंतराव होळकर यांचे नाव द्यावे, अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, अठराव्या शतकामध्ये स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध अठरा लढाया लढणारे राजे महाराजा यशवंतराव होळकर यांचे कार्य भारताच्या इतिहासामध्ये मोलाचे आहे. त्याचबरोबर अनेक पुस्तकांमध्ये त्यांचा उल्लेख भारताचे नेपोलियन असाही केला गेला आहे. इतक्या महान राजाचे नाव महाराष्ट्रामधील एकाही विमानतळास दिलेले नाही. सोलापूर येथील विमानतळास महाराजा यशवंतराव होळकर यांचे नाव देण्यात यावे, ही मागणी करण्यात येत आहे. असे न झाल्यास राज्यभर संघटनेच्या वतीने नामांतरासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर पाटील, सल्लागार शेखर बंगाळे, प्रदेशाध्यक्ष निखील घोडके, जिल्हाध्यक्ष संदिप कांबळे, गौरव पवार, आकाश नागनकेरी, राकेश उमदी, रोहित बंडगर, नागेश सदलापुरकर आदी उपस्थित होते.

# तेलुगू भाषा अभिवृध्दी ग्रंथालयाचा रौप्य महोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ८ सप्टेंबर-**

तेलुगु भाषा अभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालयाचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम थाटामाटात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिध्द उद्योगपती गणेश बुधारम व प्रमुख पाहुणे म्हणून जागरी यादगिरी, गदवाल समय्या व इरला समय्या आंध्र प्रदेश व तेलंगणाचे साहित्यिक उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, खजिनदार गोवर्धन कमटम, कार्याध्यक्ष बालराज बोल्ली, पेंटप्पा



गड्डम उपस्थित होते.

तेलुगू भाषा दिनानिमित्त व तेलुगू भाषा अभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालयाचा २५ वा रौप्य महोत्सवी दिवस कार्यक्रम या निमित्ताने प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहूणे म्हणून व अतिथी यांचे हस्ते तेलुगू तल्ली व गिड्डु व्यंकटराम मूर्ती पंतुलू यांच्या प्रतिमेचे पुजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक गंथालयाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी केले. या कार्यक्रमास गदवाल समय्या यांनी क्रांती क्रिणालू व ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल राधा इरकल यांचे राधा मधुरीमलू या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

तसेच सोलापूरचे प्रसिध्द उद्योगपती बालाजी अमाईन्सचे एम.डी. डी. रामरेड्डी यांनी एम.एस.सी. व यु.पी.एस.सी. तसेच आधुनिक डिजिटल साऊंड सिस्टीमचे स्पिकर व माईक भेट दिले. यावेळी ग्रंथालयाचे अभ्यास केंद्राचे उद्घाटन केले. सर्व मान्यवरांनी या प्रसंगी तेलुगू दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी ग्रंथालयास २५ पुस्तके भेट दिले. गदवाल समय्या यांनी त्यांचे प्रकाशित ५५ पुस्तकांचे संच ग्रंथालयास भेट म्हणून दिले. याप्रसंगी प्रा. कवी नरेंद्र गुंडेली, कवी वोगण्णा देवनपल्ली, शंकर चौगुले यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवित्री रेणुका बुधारम व प्रभाकर भिमनाथ यांनी केले. सचिव तिप्पण्णा गणेरी यांनी आभार मानले.

## क्रीडा



### संगमेश्वर कॉलेजची लॉन टेनिस व वुशु स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

शालेय शहर लॉन टेनिस व वुशु स्पर्धेमध्ये संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाजच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा. प्रसाद कुंटे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** लॉन टेनिस : ईशान मेरू (प्रथम), मयूर वाले (द्वितीय). वुशु : करण पवार (प्रथम), पवन सहानी (द्वितीय), गौरी हडपदरू (प्रथम), अनुष्का जगताप (तृतीय).

# पिराची कुरोली येथे शुक्रवारपासून जिल्हा किशोर व किशोरी खो- खो स्पर्धा

## वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व डीएनपी स्पोर्ट क्लब पिराची कुरोली (जि. पंढरपूर) यांच्या वतीने डीएनपी स्पोर्ट्स क्लबचे मार्गदर्शक सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त किशोर व किशोरी गटाची जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा पिराची कुरोली येथे होईल.

पिराची कुरोली येथील संत तुकाराम महाराज पालखी तळ मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन सहकारी शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या हस्ते व पिराची कुरोली गावातील सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता संपन्न होणार आहे. शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी किशोर गटाची व शनिवार १४ सप्टेंबर रोजी किशोरी गटाची स्पर्धा होईल. या स्पर्धेतून महाराष्ट्र संघ निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील चार किशोर खेळाडू व आठ किशोरी खेळाडू निवडण्यात येणार आहेत.

या स्पर्धेसाठी २ ऑक्टोंबर २०१० रोजी अथवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. मूल्यांकन हे २१५ असे राहील. या स्पर्धेतील निवड झालेल्या खेळाडूंची निवड चाचणी धाराशिव येथे १५ सप्टेंबर रोजी आहे. त्यामुळे संघातील सर्व खेळाडूंनी विहित नमुन्यातील जन्मतारखेचा दाखला आणणे बंधनकारक आहे. इच्छुक संघानी आपली नोंदणी तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड (९८८१३२३०६०) त्यांच्याकडे बुधवार ११ सप्टेंबरपर्यंत प्रवेश शुल्क रुपये पाचशे भरून नोंदवावी. स्पर्धेचे लॉट्स (भाग्यपत्रिका) गुरुवार १२ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता टाकण्यात येतील. त्यामुळे कोणत्याही संघाला ऐन वेळेस प्रवेश दिला जाणार नाही. नोंदणी केलेल्या किशोर संघाने शुक्रवारी १३ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता व किशोरी संघानी शनिवार १४ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता आपली उपस्थिती नोंदवावी, असे असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे यांनी कळविले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघानी भाग घ्यावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी केले आहे.

### इंडियन मॉडेल स्कुलच्या बोकडे व माळवदकर यांची विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड





**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

पुणे विभागीय शालेय स्केटिंग स्पर्धेसाठी इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या स्नेहा बोकडे व शर्विल माळवदकर यांची निवड झाली. दयानंद कॉलेज येथे झालेल्या शालेय शहर स्केटींग स्पर्धेतून त्यांची निवड झाली.

१४ वर्षा खालील मुलींच्या क्वाड या प्रकारत स्नेहा हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच ११ वर्षा खालील मुलांच्या इनलाईन प्रकारात शर्विलने याने तृतीय स्थान मिळविले. त्यांना क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरच्या फुटबॉलसाठी सुवर्ण काळ नक्की

## सोलापूर शहर व जिल्हयातील फुटबॉलचा इतिहास, वर्तमान व भविष्य

### इतिहास

शहरात १९८०मध्ये सोलापूर डिस्ट्रीक्ट फुटबॉल असोसिएशनच्या माध्यमातून फुटबॉल खेळास चालना मिळाली. अतिशय चांगल्या संघाच्या तगडया स्पर्धा व्हायच्या. त्यात सेंट जोसेफ, ह. दे. प्रशाला, पानगल, सोशल या शाळांचा दबदबा होता. सेंट जोसेफ हायस्कूलमधील रॉनी, भरत अवस्थी, बॅरी, बंटी, मनोज भागवत, ह.दे. प्रशालेतील चंद्रकांत सातोस्कर, पोरेडी, भंडारी, मधुकर श्रीराम, उमेश दास्ताने, नितिन देशमुख, महेबुब पटेल, उमेश गायकवाड, नासीर आळंदकर, मुल्ला सर, कडू सर, राजा पटेल असे अनेक खेळाडू शालेय स्पर्धेमध्ये पहायला मिळाले. तेव्हा कोल्हापूर विद्यापीठ असल्याने सोलापूरसह सांगली, सातारा, कोल्हापूर मध्ये प्रथम आंतर महाविद्यालयीन व नंतर विभाग स्पर्धा त्यानंतर विद्यापीठ सिलेक्शन असे टप्पे होते. कोल्हापूरमध्ये फुटबॉल चांगला असल्याने कडवे आव्हान सोलापूरसाठी होते. तरी त्या वेळेचे अतिशय मेहनती खेळाडू दिलीप गव्हाणे, मोहन क्षिरसागर, सिराज शेख, पिसे बंधू, संजय (भांजा) शहा, कैलास गायकवाड व बबलू नाईकवाडी असे अनेक खेळाडू होते. त्यांचा सराव सकाळी ६ व दुपारी ३.३० वाजता काही जण चालत तर काही जण सायकलवर यायचे. त्यावेळी विद्यापीठ खेळणे खूप जिकिरीचे होते असे असताना देखील मेहनतीवर दिलीप गव्हाणे, उमेश गायकवाड, अतुल लकडे व राजा पटेल असे खेळाडू शिवाजी विद्यापीठाकडून खेळले. त्यानंतर आंतर जिल्हा स्पर्धा १९८२-८३ पंढरपूर येथे झाली. परंतू त्यावेळचे चेअरमन पुरणचंद्र पुंजाल यानी प्रथमच पार्कवर त्यांची फायनल मॅच खेळवली. त्यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता. सोलापूर क्लब, ग्रीन स्टार, डायमंड, सेटलमेंट, उत्कर्ष, अर्जून, रेल्वे, लक्ष्मी विष्णू इतर लहान मिळून १५ क्लब होते. ग्रीन स्टार, मशकि डायमंड, मोहन क्षिरसागर, उत्कर्षच्या भरत भागवत यांनी चांगला फुटबॉल वाढविला होता. यासाठी श्री चेष्टर सर, पुंजाल सर यांनी आंध्रमधून इरण्णा दिड्डी यांनी फुटबॉल वाढविला होता. आर. एम. सौदागर यांच्याकडे सचिव पदाची जबाबदारी होती. त्यावेळी ह.दे. प्रशाला, सेंट जोसेफ, नॉर्थकोट, रेल्वे मैदान, होम मैदान, वालचंद कॉलेज, जुने पोलीस मुख्यालय येथे सराव होत होता. त्यावेळी मेडिकल कॉलेजचा संघ देखील चांगला होता. त्यासाठी फुटबॉल असोसिएशनचे सदस्य शरद अकतनाळ यांनी संघासाठी श्रम घेतले.



### वर्तमान

सध्या सोलापूरात फुटबॉलला अतिशय चांगले पोषक व खूप सवलती तसेच कोचेस व ग्राऊंड शाळामधून फुटबॉलला असलेला चांगला प्रतिसाद पहाता फुटबॉल वाढत आहे, त्याचा दर्जा वाढला आहे. सात विभागातून प्रत्येकी ५ म्हणजे ३५ खेळाडू तसेच राज्य अजिंक्यपदसाठी खेळत असलेले सात संघ खेळाडू १२६ म्हणजे १६५ खेळाडू मधून महाराष्ट्र राज्य संघ स्कूल नॅशनलसाठी आपल्या येथून होणे खूप जिकिरीचे आहे. शालेय संघामध्ये सुयश गुरुकुलमध्ये अविनाश भोसले, वैभव कदम, लवटे, बिडकर, मझहर पटेल असे खेळाडू. सुयश गुरुकुलचे प्राध्यापक केशव शिंदे यांनी फुटबॉलसाठी खूप प्रयत्न केले. त्यानी ऑल इंडिया फुटबॉल कोच दामोंत, श्री गमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुकुलचा तगडा संघ उभा केला होता. तरी देखील २००५ सालापासून श्रेयस भोसेकर, महेश ढवळे, किरण राऊत, अश्विन टाक, छत्तरसिंग चौधरी, किरण पांढरे व मुलींमध्ये काही खेळाडू होत आहेत.

त्यानंतर जिल्हा, बाहेर क्लब या माध्यमातून प्रत्येक वयोगटासाठी स्पर्धा होत आहेत. त्यातून डब्लूआयएफएसाठी काही सिलेक्शन होत आहेत. फुटबॉल खेळाडूसाठी सध्या अनेक मैदानावर खेळाडू रोज सराव करत आहेत. यानंतर विद्यापीठ स्पर्धा आंतर कॉलेजसाठी १२ संघ त्यातून विद्यापीठ संघ सिलेक्शन व वेस्ट झोन विद्यापीठ स्पर्धा खेळाडू निवड हा सोलापूर विद्यापीठ झाल्यामुळे खेळाडूची विद्यापीठ खेळण्याची स्पर्धा वाढली. परंतू त्यातून दर्जेदार खेळाडू तयार होणे हा सर्वांच्या चिंतनाचा विषय आहे. जर विद्यापीठ संघाने ऑल इंडियासाठी स्थान मिळवले तर त्यासाठी नोकरीच्या वेगवेगळया संधी प्राप्त होतात. सोलापूर जिल्हा संघटना नवीन रूपाने काम करत आहे. नुकतीच किरण चौगुले यांचा वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन सेक्रेटरीपदी निवड झाली आहे. त्यांनी डब्लूआयएफएमध्ये सोलापूरसाठी संतोष ट्रॉफी सोलापूरात झाली. त्यामध्ये सोलापूरातून ओंकार मस्के या खेळाडूची निवड झाली. २००७ मध्ये मुलींसाठी १९ वर्षाखालील मुलींचा संघाची सोलापूरातून निवड झाली होती. तसेच सोलापूरातील तीन मुलींची त्यामध्ये निवड झाली. येथे घेतलेल्या स्पर्धा मुलींत ४.१९ महाराष्ट्र कॅम्प या गोष्टी नंतर सीआपएल सिस्टीममधून क्लब नियमावली व नंतर त्या स्पर्धा स्पर्धासाठी नियमावलीत सुधारणा झाल्या फुटबॉल खेळात स्पोर्टस, एनआयएस, डीसीबीए लायसन व पंचासाठी कोर्सेस सोलापूरात होणे आवश्यक वाटते. जेणे करून सोलापूरसाठी पुढे नियोजीत जागा, मागणी सोईस्कर होईल. सर्व शाळांमध्ये फुटबॉल कोचेसना ही संकल्पना या काळात खालील साहित्य भरपूर प्रमाणात वाढले. ऑन लाईन कोर्सेस तरी देखील या खेळात न संपणारे शिक्षण आहे. किरण पांढरे हा प्रोफेशनल क्लबकडून गेली ५ वर्षापासून खेळत आहे. श्रेयस भोसेकर यांची बेंगलोर येथील क्लबसाठी निवड झाली होती नुकतेच कादंबरी पाटील, छत्तरसिंग चौधरी यांची पीजी आर्मी स्पोर्टस कोटयातून निवड झाली. त्यामुळे करिअर म्हणून खेळाडू, कोच, पंच ऑफिस, स्पोर्टस मॅनेजमेंट अशा अनेक संधी या खेळातून उपलब्ध आहेत. तरी सर्व सोलापूर करांनी आपल्या मुलांसाठी सर्व खेळासाठी या पध्दतीने पहाणे आवश्यक आहे.

### भविष्य

भविष्यात फुटबॉल खेळाचे देशात सोलापूरचे चांगले स्थान करता येईल असे वाटते. ज्यांना शक्य आहे त्यांनी करावे म्हणजे आपोआप स्ट्रक्चर तयार होईल. सोलापूरात फुटबॉल मैदाने पहाता आपण खूप मेहनत घेणे आवश्यक वाटते. फुटबॉलचा मनुष्याचे आयुष्य घडवण्यासाठी सुद्धा चांगला उपयोग होतो. त्यामध्ये होणारा शारीरिक फिटनेस हे एक वरदान आहे. या खेळापासून गेममध्ये पास देणे हा भाग आयुष्यात चांगले शिकून जातो. सर्व खेळाडूंचा एकमेकाबद्दल जो आदर मैदानात दिसून येतो, खेळ चालू असताना सर्वांचे ध्येय गोल करणे हे असते. तसेच आपणावर गोल होऊ नये हे शिकवतो म्हणजेच आयुष्याचे पण गोलच्या माध्यमातून ध्येय हा विषय खेळाडूंमध्ये होऊ शकतो तसेच गोल न होऊ देणे हा संरक्षणाचा भाग शिकवून जातो. डोक्यापासून पायापर्यंत सर्व शरीराच्या हालचाली यात होतात. त्याचप्रमाणे क्षणात काही सेकंदात निर्णय घेण्याचे शिकवतो. मैदानामध्ये एखादा खेळाडू पडला तर दुसरा खेळाडू त्याला हात देऊन उभा करतो, ही गोष्ट पण बरीच काय शिकवून जाते. मैदानातील हार पण मैदानाबाहेर एकमेकांचे स्वातंत्र करणे खूप काही शिकवून जाते. तसेच हा खेळ माईंड गेम असल्यामुळे आयुष्यामध्ये व्यवहारिक जीवनात वागत असताना समोरच्या माणसाच्या मनाचा अभ्यास करण्याची शिकवण होते. तर पुढील काळ फुटबॉलसाठी सुवर्ण काळ नक्की होईल.

**-राजेश कळमणकर**
फुटबॉल प्रशिक्षक क्रीडा भारती, सोलापूर

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शिक्षकांवर भावी पिढी घडवण्याची जबाबदारी

**● आ. सुभाष देशमुख ● लोकमंगल फाउंडेशनच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण**

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

माणसाच्या आयुष्यात गुरुला मोठे महत्व आहे. गुरुंकडे होणाऱ्या ज्ञानार्जनामुळे आज देशासह जगाने आधुनिक तंत्रज्ञानात भरारी घेतली आहे. देशाला प्रगतीच्या उंचीवर नेण्यासाठी हुशार व चांगली पिढी घडविण्याचे काम शिक्षकांकडून अविरतपणे सुरु असते. देशाची भावी पिढी घडवण्याची सर्वात मोठी जबाबदारी शिक्षकांच्या खांद्यावर आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी शिक्षक अहोरात्र कष्ट घेतात, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांनी केले.



लोकमंगल फाउंडेशन व लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था आयोजित शिक्षकरत्न पुरस्कार व आदर्श शाळा पुरस्कार २०२४ वितरण समारंभ रविवारी हिराचंद नेमचंद वाचनालय किर्लोस्कर सभागृह येथे पार पडला, याप्रसंगी आ. देशमुख बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, गुरण्णा तेली, डॉ. आशालाता जगताप, डॉ. हनुमंत जगताप, अलका देवडकर, अरविंद जोशी आदी उपस्थित होते.यावेळी वैशाली कैलास बोते, मंजुषा बाबुराव फुलारी, शिवकन्या कंदरेकर, शीला सुजित हावळे, लक्ष्मण भागवत माळी, संगीता संतोष रेळेकर, विजय बब्रुवाहन माने, अल्पना पंडित परदेशी, डॉ. गौतम सुभान कांबळे, अब्बास हुसेन शेख, अशोक टिळक यांना शिक्षकरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. खातगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कंदलगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला.

# मोहोळमध्ये गणरायाची भक्तिभावात झाली प्रतिष्ठापना

**तभा वृतसेवा,**
**मोहोळ, दि. ८ सप्टेंबर -**

मोहोळ शहरात शनिवारी सकाळपासूनच गणेश प्रतिष्ठापनेसाठी गणेशमूर्ती व सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. उत्साहात गणेशमूर्तींना प्रतिष्ठापनेसाठी गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया जयघोषात कार्यकर्त्यांनी नेले.

मानाचा गणपती आदर्श गणेशोत्सव मंडळ, चौमुखी मारुती गणेशोत्सव तरुण मंडळ, चाटी गल्ली तरुण मंडळ, नूतन तरुण मंडळ, जय महाराष्ट्र तरुण मंडळ, वन मॅन गणेशोत्सव मंडळ, विघ्नहर्ता तरुण मंडळ, सिद्धनागेश तरुण मंडळ, समर्थ नगर मंडळ,भुसार पेठेतील बाल गणेश तरुण मंडळ, नागनाथ गल्ली तरुण मंडळांनी गणरायाची प्रतिष्ठापना केली.



**४६ गावांत एक गणपती**

तालुक्यामध्ये ४६ ठिकाणी एक गाव, एक गणपती असून १२१ ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळानी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्न केला आहे. १६७ मंडळाने गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. मोहोळ पोलीस ठाण्यांतर्गत ४ पोलीस अधिकारी, ३० पोलीस कर्मचारी व ३० होमगार्ड असा बंदोबस्त पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली ठेवल्याचे कॉन्स्टेबल गोपाळ साखरे यांनी सांगितले.



**सोलापूर : स्त्री शक्तीचा जागर व्हावा, बुद्धी व शक्तीदेवतेच्या आशीर्वादाने समाजात घडत असलेल्या घटनांना आळा बसावा यासाठी राघवेंद्र नगर, मजरेवाडी, होटगी रोड येथील सुभाष मालबा पवार यांच्या निवासस्थानी करवीर निवासिनी कोल्हापूरच्या महालक्ष्मी अंबाबाईचा देखावा साकारण्यात आला आहे. (छाया : आरती कुसेकर)**



# रोलर स्केटिंग स्पर्धेत बार्शीतील खेळाडूंचे यश

**तभा वृतसेवा,**
**बार्शी, दि. ८ सप्टेंबर -**

सीएस अकॅडमी व बदामीकर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय मान्सून रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये बार्शीतील मुलांनी यश संपादन केले.

बिगीनर, क्वाड, रेक- इनलाईन व प्रो- इनलाईन प्रकारांमध्ये स्पर्धा झाली. प्रियांका जितेश येडलवार यांच्या श्रीशा स्केटिंग क्लबमार्फत मुलांनी भाग घेतला. पदके पुढीलप्रमाणे- अर्णव कुलकर्णी- कांस्य, ऋग्वेद काशीद-सुवर्ण, वैष्णवी कापसे-सुवर्ण, स्वरूप पॉल-सुवर्ण, वेदांत बर्डे-रौप्य, प्रांजल गांधी-सुवर्ण, अवंती अंधारे-रौप्य, रामराजे बारंगुळे-रौप्य, प्रसाद शिंदे- सुवर्ण, द्वारकेश झरेगावकर- रौप्य, पृथ्वीराज जाधव- सुवर्ण, प्रसाद मांडे- कांस्य, श्रीशा येडलवार- सुवर्ण, हर्ष बेनारे- सुवर्ण, कृष्णा ढाले- रौप्य, सोहम सावंत-कांस्य. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा स्केटिंग असोसिएशनच्या १७ वर्षाखालील गटातील जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत मुलींच्या गटामध्ये श्रीशा येडलवार प्रथम तर मुलांच्या गटामध्ये हर्ष बेनारे, प्रसाद मांडे, कृष्णा ढाळे हे अनुक्रमे प्रथम, तृतीय व चतुर्थ आले. त्यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धकांचे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश पवार, प्रियंका येडलवार यांनी अभिनंदन केले.



**उद्योग बॅंक व्याख्यानमाला**

**सोलापूर : निर्मलकुमार फडकुले सभागृहात उद्योग बॅंक गणेशोत्सव मंडळ व रोटरी क्लब ऑफ एम.आय.डी.सी यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव व्याख्यानमालेचे उद्‌घाटन रविवारी जिल्हाधिकारी कुमार अशिर्वाद यांच्या हस्ते झाले.**

# न्यासाच्या शमी विघ्नेश गणेश मंदिरात पूजा

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ सप्टेंबर -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात रविवारी अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.



यावेळी हर्षवर्धनराजे भोसले, स्वामिनीराजे भोसले, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, कैलास वाडकर, मनोज निकम, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, वैभव मोरे, पोकॉ संदीप सोमवंशी, वीरभद्र कोलाटी, रोहन शिर्के, आप्पा हंचाटे, निखील पाटील, भारत पाटील, अतिश पवार, गोटू माने, प्रविण घाटगे, मैनुद्दीन कोरबू, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, धानप्पा उमदी, बाळासाहेब घाडगे, राजू पवार, संभाजीराव पवार, पिंटू साठे, दत्ता माने, गणेश पाटील, शिवू काळे, राहुल इंडे, प्रसाद हुल्ले, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, रमेश हेगडे, सागर पवार, अनिल गवळी, पप्पू कोल्हे, सोमनाथ शिंदे, संतोष लकशेट्टी, किरण साठे, विशाल कलबुर्गी, फहीम पिरजादे, योगेश कटारे, कन्हय्या झंपले, दिनेश काळे उपस्थित होते.




# विश्व परिवर्तन पत्रकार संरक्षण समितीच्या शहराध्यक्षपदी विजयकुमार उघडे

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

विश्व परिवर्तन फॉउंडेशन संचलित विश्व परिवर्तन पत्रकार संरक्षण समितीची रविवारी बैठक पार पडली. या बैठकीत नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी विश्व परिवर्तन संचलित पत्रकार संरक्षण समितीच्या राष्ट्रीय अध्यक्ष अशपाक शेख तर राष्ट्रीय सचिव सुबोध वाघमोडे उपस्थित होते. यावेळी शहराध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार उघडे यांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय सदस्यपदी बुऱ्हाण काझी, प्रदेशाध्यक्षपदी युन्नुस अ. अत्तार, प्रदेश उपाध्यक्षपदी राजू साखरे, प्रदेश जनरल सेक्रेटरीपदी अब्दुल रहिम पठाण, पत्रकार संरक्षण समितीच्या कायदेशीर सल्लागारपदी जयप्रकाश भंडारे, जिल्हाध्यक्षपदी शब्बीर मनियार, शहर खजिनदारपदी फिरोज शेख, उत्तर तालुकाध्यक्षपदी राजकुमार तगारे, अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी गणेश भालेराव, दक्षिण तालुकाध्यक्षपदी गिरमल्ला गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार जाकीर हुंडेकरी हे उपस्थित होते. निवडीनंतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# वस्ताद गणपती महामंडळाच्या अध्यक्षपदी बाळासाहेब सरवदे

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

जोशी समाज मारुती देवस्थान, रविवार पेठ जोशी गल्ली येथील लाल आखाडा तालीम (वस्ताद गणपती) गणेशोत्सव महामंडळ या मंडळातील बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. या निवडीत मंडळाच्या अध्यक्षपदी बाळासाहेब सरवदे तर कार्याध्यक्ष रणधिर सरवदे यांची निवड करण्यात आली.



ही पदाधिकारी निवडची बैठक सद्गुरु तुकारामबाबा समाज मंदिर येथे घेण्यात आली. यावेळी प्रथमतः महामंडळाचे संस्थापक मारुती सरवदे पैलवान यांना श्रध्दाजली वाहून पुढील नूतन पदाधिकाऱ्यांची निवड महामंडळाचे संस्थापक हरिकांत सरवदे, विठ्ठल शिंदे, सुरेश सरवदे, लक्ष्मण भोसले व सोलापूर शहर जोशी समाज अध्यक्ष युवराज को. सरवदे यांनी सन-२०२४-२०२५ चे नूतन अध्यक्ष बाळासाहेब सरवदे तर कार्याध्यक्ष रणधीर सरवदे यांची व इतर पदाधिकाऱ्यांची सर्वानुमतांनी निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी सर्व संस्थापक, समाजातील पाटील पंच व सर्व जोशी समाज उपस्थित प्रमुख मंडळी होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा फेटा बांधून सत्कार करुन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# उत्कृष्ट कामिगिरीबद्दल जिल्ह्यातील आठ बॅंकांना पुरस्कार

**● पेन्शन फंड नियामक, विकास प्राधिकरणांतर्गत जिल्हास्तरीय कार्यक्रम उत्साहात**

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए), नवी दिल्ली अंतर्गत राज्यस्तरीय बॅंकर्स समिती, पुणे (एसएलबीसी) आणि जिल्हा अग्रणी बॅंक, सोलापूर यांच्या वतीने अटल पेन्शन योजना (एपीवाय) जिल्हास्तरीय आउटरीच कार्यक्रम ाचे बालाजी सरोवर, सोलापूर येथे संपन्न झाला.




दरम्यान, यावेळी जिल्ह्यातील आठ बॅंकांना त्यांच्या उत्कृष्ट कामिगिरीबद्दल पुरस्कार देण्यात आले. या कार्यक्रमासाठी पीएफआरडीएचे मुख्य महाप्रबंधक परवेश कुमार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. समाजातील संगठीत व असंगठीत वर्गाला कशाप्रकारे अटल पेन्शन योजना फायदेशीर राहील याविषयी मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले. तसेच सर्व बॅंकांनी मिळून सोलापूर जिल्ह्यासाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये दिलेले लक्ष्य १२२ टक्केवारीसह प्राप्त केल्याबद्दल, जिल्ह्यामधील सर्व बॅंका व जिल्हा अग्रणी बॅंकेचे अभिनंदनही केले. सोलापूर जिल्ह्यातील सर्व बॅंकांपैकी विशेषतः प्रामुख्याने बॅंक ऑफ इंडिया, कोटक महिंद्रा बॅंक, बॅंक ऑफ महाराष्ट्र, विदर्भ कोंकण ग्रामीण बॅंक, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, कर्नाटक बॅंक, युनियन बैंक ऑफ इंडिया, आयडीबीआय बॅंक या आठ बॅंकांना त्यांच्या उत्कृष्ट कामिगिरीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हा अग्रणी बॅंक, सोलापूर व जिल्हा अग्रणी बॅंक, धाराशिव यांनाही जिल्हास्तरीय लक्ष्यपूर्ती केल्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तरीय बॅंकर्स समितीचे उप महाप्रबंधक दिपक पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. कार्यक्रमास बॅंक ऑफ इंडीयाचे आंचलिक प्रबंधक चंद्रशेखर मंत्री, आंचलिक प्रबंधक दिगंबर महाडिक, आंचलिक प्रबंधक संजीव कुमार,डीआरडीएचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उमेदचे सचिन चावरे,. माविमचे सोमनाथ लामगुंडे, आरसेडी संचालक दिपक वाडेवाले, आदी मान्यवर उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता जिल्हा अग्रणी बॅंकेचे व्यवस्थापक राम वाखरडे यांनी केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्यस्तरीय बॅंकर्स समितीचे इम्तियाज अली, जिल्हा अग्रणी बॅंकेचे अधिकारी श्रीराम साठे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास जिल्हा अग्रणी बॅंक व्यवस्थापक, पदाधिकारी उपस्थित होते.

# द्राक्ष बागायतदार संघाच्या संचालकपदी हनुमंत गवळी

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील वडगाव काटी येथील द्राक्ष बागायदार हनुमंत गवळी यांची द्राक्ष बागायतदार संघ सोलापूर विभागाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली.



द्राक्ष बागायतदार संघ पुणे विभागाची सोलापूर येथे झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. गेल्या २ दशकांपूर्वी गवळी यांनी दुग्धव्यवसायाबरोबर शेती व्यवसाय सुरू केला होता. वडिलोपार्जित शेतीत २ एकर द्राक्षबाग लागवड करून यशस्वी उत्पादन घेतले. या शेती व्यवसायामध्ये यश मिळत गेल्याने हळूहळू ही बाग वाढवत त्यांनी आज तब्बल ६० एकर क्षेत्रामध्ये विविध नमुन्याची द्राक्ष शेती केली आहे. शेकडो कामगारांच्या हाताला रोजगारही या माध्यमातून दिला आहे. त्यांनी उत्पादित केलेली द्राक्ष विविध देशात निर्यात होत असल्याने विविध नवनव्या कंपन्या वडगावसारख्या ग्रामीण भागात येवू लागल्या आहेत.

**द्राक्ष बागायदारांचे प्रश्न सोडविणार**

काही वेळा नैसर्गिक आपत्ती येवून द्राक्ष बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यावेळी शेतकरी बांधवांनी धीर सोडू नये. अशा अडचणीच्या वेळी द्राक्ष बागायदार संघाच्या माध्यमातून शासन दरबारी त्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणार आहे. इतकेच नाहीतर नवीन बागायदारांना निर्यातक्षम द्राक्ष कशी बनवायची? स्थानिक व परदेशातील मार्केट वगैरेही माहिती देण्याचे मी काम करणार आहे.

**- हनुमंत गवळी,**
नूतन संचालक

# रस्ते रक्तवाहिनी, एसटी प्रवाशांचा श्वास

**● कविता घोडके-पाटील**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

रस्ते हे विकासासाठी रक्तवाहिनी आहेत तर गरीबाचे वहान असलेली लालपरी ही सर्वसामान्य प्रवाश्यासाच्या दळणवळणासाठी प्रवाश्यांचा श्वास आहे.प्रवाश्यांच्या सोयीसाठी एस.टी.धावत असली तरी धावणाऱ्या मार्गावर अपेक्षित उत्पन्न मिळण्यासाठी एस.टी प्रवास करणे ही देखील जाणीव प्रवाश्यामध्ये असली पाहिजे अशी भावना माजी सरपंच कविता घोडके पाटील यांनी व्यक्त केली.




पावसामुळे कौठाळी भागाईवाडी रस्त्यादरम्यान पडलेल्या खड्ड्यामुळे भागाईवाडी जाणारी एसटी सेवा बंद करण्यात आली होती.त्यामुळे प्रवाश्यासह विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय झाली.सदर रस्त्यावरील खड्डे नागरिक, प्रवासी, वहान धारकांच्या सोयीसाठी उपसरपंच तानाजी जाधव, ग्रामविस्तार अधिकारी कृष्णात डवले यांनी तातडीने बुजवुन घेतले.तर एस.टी. महामंडळाने देखील सेवा पुर्ववत सुरु केल्याबद्दल एस.टी.डेपो मॅनेजर उत्तम जोंधळे, जाधव, स्थानक प्रमुख उमा गव्हाणे यांचे आभार मानले

प्रवाश्यांच्या सोयीसाठी एस.टी.धावते. अनेक सवलतीच्या योजना दिल्या जातात. खाजगी वहानधारक हे प्रवाशी मिळेल तिथे व रस्ता पाहुन धावतात व्यावसायिक दृष्ट्या उत्पन्नाचा विचार एक नागरीक म्हणून आपण देखील केला पाहिजे. व एस.टी.नेच प्रवास करुन गरीबाचे वहानास आर्थीक उर्जा देण्याची गरज असल्याचे मतही माजी सरपंच तथा सरपंच परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष कविता घोडके पाटील यांनी व्यक्त केले.

**कौठाळी-भागाईवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण होणार**

मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत कौठाळी भागाईवाडी हा ६ कोटींचा ४-३०० कि.मी लांबीचा रस्ता सिंमेट कॉंक्रीटीकरण होणार असुन यांची निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे सौ.कविता पाटील यांनी सांगीतले.

# ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ संदेशाने श्रीगणेशाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

उद्धव नगर परिसरातील प्रभाकर सिद्धा वाघमारे यांच्या घरात गणेशोत्सव निमित्त विविध सामाजिक, पर्यावरण व शैक्षणिक प्रबोधनात्मक चित्रमय देखावा सादर करण्यात आला आहे.



या देखाव्यात बेटी पढाओ बेटी बचाओ, वृक्ष संवर्धन, स्त्रीभ्रूण हत्या, मतदारजागृतीचा संदेश दिला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी या देखाव्याचे कौतुक केले आहे. देखाव्याचे सादरीकरण निर्मितीसाठी वैष्णवी वाघमारे, मिनाक्षी कोरे, पूजा डिगे, अबोली कोरे, चिन्मय डिगे, देवांश डिगे यांनी सहकार्य केले. प्रभाकर वाघमारे, महानंदा वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विद्या, वृंदा बोद्धूलने साकारले महर्षी मार्कंडेय मंदिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

गणेशोत्सवानिमित्त बोद्धूल परिवारातील विद्या व वृंदाने बनवले सोलापूरातील महर्षी मार्कंडेय मंदीर साकारण्यात आले. सोलापूरातील पदमशाली ज्ञाती संस्था संचलित महर्षी मार्कंडेय मंदीराचे शतक महोत्सव असल्याने अशोक चौकातील बोद्धूल परिवारातील विद्या व वृंदाने स्वता महर्षी मार्कंडेय मंदीर प्रतिकृती व श्री गणेश मुर्ती प्रातिष्ठापणा करण्यात आले. दोन्ही




मुर्ती सॅडो इको फ्रेंडली मातीतून बनवण्यात आले. पर्यावरण पूरक प्रदूषण मुक्त असे इको फ्रेंडली मातीतून महर्षी मार्कंडेय मुर्ती तसेच श्री गणेश मुर्ती बनवण्यात आले हा संपूर्ण देखावा व मुर्ती बनवण्यासाठी एक आठवडा ची काळावधी लागला हा देखावा व श्री गणेश मुर्ती बनवण्यासाठी त्यांचे वडील निरंजन बोद्धूल यांचे मार्गदर्शन लाभले या प्रसंगी श्रीमती पुष्पावती बोध्दूल, विठ्ठल बोध्दूल, वैशाली बोध्दूल,राणी बोद्धूल, आदित्य बोद्धूल, कान्हा बोद्धूल, आदिंसह बोद्धूल परिवारातीत सर्व सदस्य उपस्थिती होते

## ▶▶ क्राईम वृत्त...

### भाजी खरेदी करताना मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

डी मार्ट बाहेर जाण्याच्या गेट समोरील भाजीविक्रेत्याकडून भाजी खरेदी करत असताना फिर्यादी राहुल सदाशिव उंब्रजकर (वय-५३,रा. गणेश हौसिंग सोसायटी,होटगी रोड) यांच्या खिशात ठेवलेला पन्नास हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेला आहे.ही घटना ६ सप्टेंबर रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी राहुल उंब्रजकर यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोराट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिर्के हे करीत आहे.

### स्वत:च्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रमाणे विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २१ ऑगस्ट रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास सैफुल येथे घडली. याप्रकरणी पोलीस हवालदार विनायक सोनार (नेमणूक विजापूर नाका पोलीस ठाणे) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादी अनुसार मन्सूर दुलासाहेब पाटील (वय-६१, रा. वैष्णवी नगर, भाग २ सैफुल) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मन्सूर पाटील याने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रं.एमएच.१३.डीएच.९५०५ ही दुचाकी अविचाराने चालवून वरील ठिकाणी असलेल्या डिव्हायडरला कट मारून अचानक यू टर्न घेऊन सैफुलकडे जाणाऱ्या एमएच १३.ए.डी ०७३६ या गाडीच्या मागील चाकाच्या बाजूला धडक दिल्याने खाली पडून गंभीर जखमी होऊन स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल चव्हाण हे करीत आहेत.

### ज्यादा पैशाच्या परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

बनावट लिंकद्वारे (http:/www.alb.zone) जादा परताव्याचे आमिष दाखवून ३१ लाख ११ हजार १०० रुपयांचे आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सायबर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी अशोक विठ्ठल साळुंखे (वय-४०,रा.उद्धव नगर,सैफुल) यांनी सायबर पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सुनील त्रिवेदी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना दि.१ मे २०२४ ते ३ जुन २०२४ दरम्यान घडली. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे घरी असताना सुनील याने बनावट लिंक व एएलबी नावाचे ट्रेंडिंग ॲप तयार करून त्याच्या माध्यमातून जादा परतावा मिळून देतो असे आश्वासन देऊन फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांच्याकडून एकूण ३१ लाख ११ हजार १०० रुपये वेगवेगळ्या आरटीजीएस व यूपीआयद्वारे खात्यात जमा करण्यास भाग पाडून ती रक्कम स्वतःच्या फायद्या करिता काढून घेतली.तसेच एएलबी ॲपवरील फिर्यादी यांचे अकाउंट मधील माहिती डिलिट करून शेअर ट्रेंडिंग मध्ये गुंतवलेली रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक गजा हे करीत आहे.

### विवाहितेला मारहाण; पतीसह पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

लग्नात मानपान झाला,नाही घर घेण्यासाठी दोन लाख रुपये रोख स्वरूपात आण.उर्वरित घराचे हप्ते फेडण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये असे म्हणत विवाहितेला मारहाण केली.त्यानंतर विवाहितेला शिवीगाळ करत तिसरे लग्न करण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी संध्या सचिन किरात (वय-३७,रा.आंबेडकर नगर,तालुका पोलीस स्टेशनच्या मागे) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती सचिन अशोक किरात,सासू माया अशोक किरात,सासरे अशोक भिमराव किरात,दीर स्वप्नील अशोक किरात व नणंद श्वेता राहुल बाराते (सर्व.रा.आंबेडकर नगर,ता. पोलीस स्टेशनच्या मागे,सध्या विद्यानगर आरटीओ ऑफिस जवळ विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना आंबेडकर नगर येथे घडली. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

# दीड दिवसांचा पाहुणचार आटोपून बाप्पांनी घेतला निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

शनिवार (दि.७) सप्टेंबर गणपती बाप्पाच्या आगमनानंतर दुसऱ्या दिवशी दीड दिवसांच्या गणपती बाप्पांचे दुपारी विधिवत विसर्जन करण्यात आले. शहरातील गणपती घाटसह विविध विसर्जन कुंडांवर जड अंत:करणाने गणपती बाप्पांना गणेश भक्तांनी निरोप दिला. दुपारनंतर श्री गणेशाची परंपरेनुसार विधिवत पूजा करून निरोप दिला गेला.

गणेशोत्सवाची शनिवारपासून सुरुवात झाली. सोलापूर शहरात मोठ्या उत्साही वातावरणात गणपती बाप्पाचे आगमन भक्तांच्या घरोघरी झाले. बाप्पाची प्राण प्रतिष्ठापना करून बाप्पांना गोडाचे नैवेद्य अर्पण करण्यात आले. त्यानंतर दीड दिवसांचा पाहुणचार आटोपून गणपती बाप्पाने भक्तांना निरोप दिला. यावेळी महापालिकेच्या वतीने विसर्जनासाठी पूर्वतयारी करण्यात आली होती. त्यानुसार भक्तांनी पारंपारिक आणि परंपरेनुसार दीड दिवसांच्या बाप्पांचे कुंडांमध्ये विसर्जन केले. जलप्रदूषण होऊ नये यासाठी महापालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने निर्माल्य संकलन करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.



**सोलापूर : दीड दिवसांच्या गणपतीचे संभाजी तलावात विसर्जन करताना गणेशभक्त.**
(छायाचित्र : केवल तिवारी)

### प्रशासनाची तयारी

सोलापूर शहरातील गणपती घाट, विष्णू घाट, धर्मवीर संभाजी तलाव, विडी घरकुल येथील म्हाडा विहीर, अशा विविध ठिकाणी विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहेत. येथे गणपती बाप्पांचे कृत्रिम विसर्जन कुंडांमध्ये गणपती बाप्पांचे विसर्जन करण्याचे व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच तुळजापूर रोडवरील खणीमध्ये देखील गणपती बाप्पांचे महापालिका प्रशासनाकडून विधिवत विसर्जन करण्यात येणार आहे. त्यासाठी देखील महापालिका प्रशासनाने अधिकारी कर्मचारी आणि मूर्ती संकलनासाठी व्यवस्था आणि पूर्वतयारी केली आहे.

### दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन

आमच्या घरी दरवर्षी दीड दिवसांच्या गणपतीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येते. पूर्वापार पद्धतीने ही परंपरा सुरू आहे. त्यानुसार आज आम्ही विसर्जन कुंडांवर गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी आलो आहोत.

**- महेश स्वामी, गणेशभक्त**

## मंगळवारी करा गौराईचे आवाहन

- पंचांगकर्ते मोहन दाते
- पारंपारिक पद्धतीने आवाहन करून बुधवारी करावे विधिवत गौरीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ८ सप्टेंबर -**

श्रीगणेश भक्तांच्या घरोघरी लाडक्या गणरायाच्या आगमनानंतर सर्वांना आता वेध गौराईचे लागले आहेत. दिनांक १० सप्टेंबर रोजी मंगळवारी अनुराधा नक्षत्रावर रात्री ८ वाजून ०४ मिनिटांपर्यंत कधीही जेष्ठा आणि कनिष्ठा गौरीचे आवाहन करता येणार आहे. ज्येष्ठा नक्षत्र मध्यान्ही असलेल्या दिवशी पूजन करावे, त्याचप्रमाणे दिनांक ११ सप्टेंबर रोजी बुधवारी नेहमीप्रमाणे गौरी पूजन करून मूळ नक्षत्रावर गौराईचे विसर्जन करावयाचे असल्याने दिनांक १२ सप्टेंबर रोजी गुरुवारी रात्री ९:५३ पर्यंत गौरी विसर्जन करता येणार आहे , अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली आहे.



दरम्यान यावर्षी दिनांक १७ सप्टेंबर रोजी मंगळवारी अनंत चतुर्दशी आहे. हा गणेश स्थापनेपासून ११ वा दिवस



असल्याने ज्यांच्याकडे अनंत चतुर्दशीचे दिवशी विसर्जन केले जाते , त्यांच्याकडे ११ दिवसांचा उत्सव असेल, तसेच या दिवशी मंगळवार म्हणजे श्रीगणेशाचा वार असला तरीही परंपरे प्रमाणे विसर्जन करावे, या दिवशी चतुर्दशी तिथी दुपारी पावणे बारा वाजताच संपत असली तरीही त्यानंतर देखील विसर्जन करता येईल. विसर्जनावेळी गणपति बाप्पा मोरया.... पुढच्या वर्षी लवकर या..... अशा घोषणा देत असतो. त्या सातत्यात येणार आहेत. पुढच्या वर्षी गणपती बाप्पा खरंच लवकर म्हणजेच २७ ऑगस्ट २०२५ रोजी येणार आहेत. अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली आहे.

## शिक्षक ज्ञानदानातून सामाजिक क्रांती करु शकतात

- खासदार प्रणिती शिंदे यांचे प्रतिपादन
- मराठा मंडळाच्या शारदा आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ८ सप्टेंबर -**

शिक्षक आपल्या ज्ञानदानातून सामाजिक क्रांती घडवू शकतात. त्यामुळे त्यांनी चौकटीच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्यांना ज्ञान दिले तर विद्यार्थी आपली गुणवत्ता सुधारू शकतात. असे मत खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील छत्रपती शिवाजी प्रशालेतील राजश्री शाहू सभागृहात दरवर्षीप्रमाणे यंदाही शिक्षक दिनाचे अवचित साधून मराठा समाज सेवा मंडळ व यशवंत शिक्षक प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमानाने शिवतीर्थ शारदा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण खासदार शिंदे




यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी उद्योजक राम रेड्डी संस्थेचे उपाध्यक्ष विनायक पाटील, महादेव गवळी, शिवदास चटके, नामदेव थोरात,अशोक चव्हाण,सुनीता साळुंखे,रेखा सपाटे आदींची उपस्थिती होती.

स्वागत व प्रस्ताविक ज्ञानेश्वर सपाटे यांनी केले. यावेळेस साताऱ्याचे आदर्श शिक्षक बालाजी जाधव व अक्कलकोटच्या मंगरुळे हायस्कूलचे मुख्याध्यापक नंदाजी कदम यांनी शांतता स्वच्छता शिस्त व गुणवत्तेबरोबरच शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर किती गरजेचा आहे. याबद्दल मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष सपाटे यांनी जीवनात स्पर्धा असली पाहिजे. त्यातूनच माणूस पुढे जाऊ शकतो. असे सांगितले तर उद्योजक रेड्डी यांनी शिक्षणाबरोबरच शिक्षकांनी मुलांना चांगले संस्कार देण्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी नेहा स्वामी, कविता शिंदे,जयश्री मठपती, छाया चिलवेरी,भानुदास घन्दुरे, सुलक्षणा बरगंडे, सुनंदा गाढवे, विनोद सुतार यांना यावर्षीचा शिवतीर्थ शारदा आदर्श पुरस्कार देऊन खासदार शिंदे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तर जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत व आर्चरी आंतरराष्ट्रीय खेळाडू साईराज हनमे यांचाही यावेळी त्यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन सारिका पंडित महामुनी यांनी केले तर आवारा संस्थेचे सरचिटणीस प्रा.महेश माने यांनी मानले.



**कसबा गणपती अर्थर्वशिर्ष पठण**

**सोलापूर : बाळीवेस येथील मानाचा कसबा गणपती मंडळासमोर प्रतिवर्षीप्रमाणे रविवारी सकाळी महिलांनी अर्थर्वशिर्ष पठण केले. यावेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**



**आजोबा गणपती अर्थर्वशिर्ष पठण**

**सोलापूर : शुक्रवार पेठेतील मानाचा आजोबा गणपती मंडपात महिलांनी आजोबा गणपतीसमोर रविवारी सकाळी अर्थर्वशिर्ष पठण केले.**

# बाजार समितीच्या कामगारांचे मंगळवारपासून कामबंद आंदोलन

### प्रशासनाला दिली एक दिवसाची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या हमाल मापडी कामगारांनी आंदोलन आता तीव्र स्वरूपाचे केले आहे.

टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द करण्याच्या मागणीकडे प्रशासन गांभीर्याने विचार करत नसल्याने, बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या सोलापूर जिल्हा हमाल, मापाडी, माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने आता बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान आपल्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी हमाल, मापडी, माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने प्रशासनाला सोमवार (दि. ९) सप्टेंबर पर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. परंतु समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीत प्रशासनाला या प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी आणि तोडगा काढण्यासाठी आणखीन एक दिवस मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे कामगारांनी सोमवार ऐवजी मंगळवार (दि. १०) सप्टेंबर पासून काम बंद करण्याचा इशारा दिला आहे. संबंधित बाजार समिती प्रशासकीय कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, कामगार आयुक्त कार्यालय,




या प्रशासकीय कार्यालयांना यासंबंधीचे पत्रव्यवहार करून कामबंद आंदोलन करण्यासंबंधी कळवण्यात आले आहे. संघटनेच्या वरिष्ठ पातळीवरून याबाबत चर्चा आणि बैठक संपन्न झाली.

त्यानंतर यावर अंतिम निर्णय घेऊन सदरचे काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्या अनुषंगाने संयुक्त समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. असे कामगार समन्वय समितीकडून सांगण्यात आले आहे. यावेळी कामगार समन्वयक कृती समितीचे अधिकारी आणि कामगार यांची उपस्थिती होती.

मंगळवार (दि. १०) सप्टेंबर रोजी सकाळपासून कांदा विभाग, भुसार -आडत विभाग आणि फळ विभागातील दोन हजार कामगार आपले कामबंद ठेवणार आहेत. केवळ अत्यावश्यक असणारे भाजीपाला विभाग सुरू राहील. त्यानुसार रीतसर पद्धतीने जिल्हा प्रशासकीय कार्यालय, शहर पोलीस यंत्रणा, बाजार समिती प्रशासकीय कार्यालय, कामगार आयुक्त कार्यालय या सर्व शासकीय कार्यालयांना कामबंद बाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

### कामगारांच्या मागण्या

- भुसार बाजाराकरीता लागू करण्यात आलेला टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द करा
- संपूर्ण माथाडी कामगारांच्या हमाली-तोलाईचा भरणा माथाडी बोर्डात करा
- माथाडी कामगाराकरीता घरकुल, उपचार केंद्र सुरु करा
- कांदा विभागामधील माल राखणे बंधनकारक करु नका

टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द न केल्यास आंदोलन अधिक उग्र आणि तीव्र स्वरूपाचे होईल. त्यास सर्वस्वी शासन-प्रशासन जबाबदार राहिल.

**-भीमा सीताफळे,**
उपाध्यक्ष, कामगार समन्वय समिती, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८८२

**ऐसी सचाडपणाचिये भुली । न सांभाळावे समस्या आपुली ।**
**यालागीं योग्यता जेवीं माऊली। बाळकाची जाणे।।**

कल्पवृक्षाप्रमाणे श्रीकृष्ण भगवान अर्जुनाच्या सर्व इच्छा पूर्ण करीत आहेत. जशा जशा इच्छा तृप्त होत आहेत, तशा तशा अर्जुन नविन इच्छांची पूर्ती करुन घेण्यासाठी इच्छा व्यक्त करीत आहे. आपण सर्वज्ञ आहात, आपल्यातच सर्व जीवमात्र सामावले आहेत, आपण म्हणजे सर्व जीवमात्राचे एकत्रीकरण आहात. असे म्हणत अर्जुन भगवंतांना सरळ विश्वरुप दाखवावे, असे म्हणत आहेत. ज्या भगवंतानी आपल्या आई-वडीलांना, बंधुला, पत्नीला सांगीतले नाही, त्या भगवंताने सर्व गुहय अर्जुनाला सांगीतले. असा हा भगवंत अर्जुनाची विश्वरुप दर्शनाची इच्छा पूर्ण करणार यात अर्जुनाला शंका वाटत नाही. भगवंता मला विश्वरुप दाखव, असे अर्जुन म्हणाला.



अर्जुनाच्या या इच्छेवर भगवंत मी विश्वरुप दाखविन किंवा दाखवू शकणार नाही, यापैकी कांहीही म्हणण्याच्या आतच भगवंत विश्वरुप दाखविणार आहेत. असे गृहीत धरुन अर्जुन म्हणाला, की माझी विश्वरुप पाहण्याची योग्यता आहे की नाही हे मला माहिती नाही. अर्थात, तशी योग्यता प्रथम भगवंतांनी दयावी. त्यानंतरच विश्वरुप दाखवावे असे अर्जुनाला म्हणायचे आहे. भगवंत आपणाला, विश्वरुप दाखविणारच आहेत असे गृहीत धरुन अर्जुन बोलत आहे.

आपल्या ठिकणी विश्वरुप पाहण्याची पात्रता आहे की नाही हे मला स्वत:ला समजत नाही. रोगी माणसाला आपल्या रोगाचे मूळ समजत नाही. व्यवहारिक जीवनातला प्रकार असा उत्कंठिक आहे की उत्कंठीत माणूस आपली पात्रता विसरत असतो. फार तहान लागलेला माणूस मला पिण्यासाठी आता समुद्रही पुरणार नाही, असे म्हणत असतो. त्याप्रमाणे आपल्या योग्यतेबद्दल बोलता-बोलता अर्जुन म्हणाला,

**ऐसी सचाडपणाचिये भुली । न सांभाळावे समस्या आपुली ।**
**यालागीं योग्यता जेवी माऊली । बाळकाची जाणे ।।.**

अर्थात, विश्वरुप पाहण्याच्या प्रबळ इच्छेच्या वेडाने मला माझ्या शक्तीचा अंदाज कळत नाही. बाळाच्या सामर्थ्याचा अधिकार माता जशी जाणते, तसे भगवंता, आपण माझ्या शक्तीचा, सामर्थ्याचा विचार करा आणि नंतर विश्वरुप दर्शनाला आरंभ करा असे अर्जुन म्हणाला. अर्जुन एवढयावरच थांबला नाही तर पुढे तो असेही म्हणाला की, माझ्या मध्ये विश्वरुप पाहण्याची योग्यता नसेल तर ती योग्यता मला प्राप्त होईल अशी प्रथम कृपा करा, आणि मग विश्वरुप दाखवा. येथे अर्जुन एकतर्फी बोलत आहे. हे जरी सत्य असले तरी, तो श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाजुने होकार गृहीत धरुन बोलत आहे. खरेच अर्जुन फार भाग्यवंत आहे. आपल्या इच्छेप्रमाणे श्रीकृष्णांना बोलण्यास, वागण्यास भाग पाडत आहे. मुल जसे आपल्या आई-वडीलाना लडिवाळपणाने, हक्काने पाहिजे ते करण्यास भाग पाडते, तसे अर्जुन भगवंताना भाग पाडत आहे. म्हणूनच माऊलींनी अर्जुनाच्या प्रेमाचं, अधिकाराचं कौतुक पुन्हा-पुन्हा केलं आहे. आपणाला या प्रमाणे अधिकार गाजवता येईल असा आपल्या कुंटुंबात, समाजात, परिवारात एक तरी व्यक्ति आपण आपल्या प्रेमानं निर्माण केला आहे का ? जर असा व्यक्ति निर्माण केला असेल व आणखी निर्माण करण्याची पात्रता आपल्या अंगी असेल तसेच आपली मानसिकता असेल तर आपल्या सारखा भाग्यवंत तो दुसरा कोण असणार.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. ९ सप्टेंबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - ज्येष्ठ**
**शु. षष्ठी (२१.५२)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- विशाखा (१८.०३)**
**योग - वैधृति (२४.००)**
**करण - कौलव (०८.५९)**
**सुर्योदय - ०६.२७**

**सूर्यास्त - १८.४४**
**दिनविशेष -**
**चांगला दिवस.**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# दरोड्याचा गुन्हा १२ तासात उघडकीस; सात जणांना बेड्या

### २ लाख ४० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

### सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या बारा तासाच्या आत दरोड्याचा गुन्हा उघडकीस आणून सात आरोपींना अटक केली आहे या आरोपींकडून सुमारे अडीच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ०६.३० वा.सुमारास स्वप्नील चंद्रकांत भानप, (वय ४९ व्यवसाय नोकरी रा.१५० रेल्वे लाईन डफरीन चौक सोलापूर) हे तळेहिप्परगा येथील शावर अॅन्ड टावरच्या समोरील बाजुस असलेल्या तळेहिप्परगा तलावाच्या बंधारा जवळ फिरण्यासाठी गेले होते. गुन्हयातील आरोपी यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली १ लाख ५० रूपये किंमतीची रिक्षा, ५० हजार रूपये किंमतीची मोटार सायकल, १०० रूपये किंमतीची फायबर काठी व फिर्यादी यांना धमकी देऊन त्यांचेकडुन जबरदस्तीने काढुन घेतलेल्या रोख रक्कमपैकी ४० हजार हजर रोख रक्कम असा एकूण २ लाख ४० हजार १०० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या याबाबत पोलीससुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शिवीगाळी, दमदाटी करून तुला पोलीसांच्या हवाली करतो असे म्हणून तेथे काही वेळाने दुचाकी मोटार सायकलीस फायबर काठी लावलेली दोन अज्ञात तेथे इसम आले. तेंव्हा त्यातील एका इसमाने फायबर काठी काढुन भानप यांना पोलीस असल्याचे सांगून, त्यांना फायबर काठीने मारहाण व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून भानप यांचेकडील पॅन्टच्या खिशातील १ हजार रूपये जबरदस्तीने काढुन घेऊन त्यांचा मोबाईल फोन मधील पे नंबरचा पासवर्ड विचारून त्यामधुन ४३ हजार रूपये रक्कम फोन पे वरून जबरदस्तीने ट्रान्सफर करून घेऊन भानप यांना जीवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन स्वप्निल भानप यांनी सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे ४ सप्टेंबर रोजी फिर्याद दाखल केली त्या गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम यांचेकडे देण्यात आला होता. त्या गुन्ह्यातील स्रव संशयीत आरोपींनी सर्वांनी मिळुन गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे. संशयित ७ आरोपी यांना गुन्हयाच्या तपासकामी अटक दरोडया सारख्या गंभीर गुन्हयाची १२ तपासाचे आत उकल करून सर्व संशयित आरोपी यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयांनी त्या सर्वांना पोलीस कस्टडी सुनावली होती. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक.अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, पोलीस पोलीस उपविभागीय अधिकारी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, गुन्हे प्रकटी करणातील सपोफौ/ विवेक सांजेकर, पोलीस हवालदार राहुल महिंद्रकर, श्रीराम आदलिंग, पोलीस नाईक लालसिंग राठोड, अनंत चमके, नागेश कोणदे, पोलीस अंमलदार पैंगबर नदाफ व वैभव सूर्यवंशी यांनी पार पाडली आहे.

> गुन्ह्यातील अटक केलेल्या ७ आरोपी यांनी अशाच प्रकारे कोठे गुन्हे केले आहेत काय या अनुषंगाने त्याचेकडे तपास व त्यांच्या गुन्हेगारी अभिलेखाची पडताळणी झाले नंतर त्याच्याकडून आणखीन गुन्हयांची उकल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
> **- संकेत देवळेकर, उपविभागीय पोलिस अधिकारी**

# दिव्यांग विद्यार्थ्यांना कार्यकुशल करण्याचे काम महान : अतुल कुलकर्णी




### मूकबधिर विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**

दिव्यांगांची कार्यकुशलता, एकाग्रता आणि सातत्य याची अनुभूती मला माझ्या शैक्षणिक पर्वात जवळून घेता आली. सॉफ्टवेअर तयार करण्याची कुशलता मी पाहिली. दिव्याग विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या, घडवणाऱ्या व संस्कारित करणाऱ्या शिक्षकांची महानता अलौकिक आहे, असे गौरवोद्गार पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी काढले. रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे अध्यक्षा डॉ. जानवी माखिजा यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास रोटरी नॉर्थचे अध्यक्षा डॉ. जानवी माखिजा, शाळेचे सचिव सुनील दावडा, दीपक आरवे, भैरुरतन दामानी अंध शाळेचे सचिव संतोष भंडारी, दौलत सिताफळे, अण्णासाहेब कोतली, सुभाष जाधव, संजय चौगुले, डॉ. किरण सारडा, आसावरी सराफ, डॉक्टर सुदीप सारडा, संजय पटेल मधुरा वडापुरकर, नमिता पाटील, रेणुका पसपुले, संध्या चंदनशिवे, गजानन गडगे, नागनाथ बसाते, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, गंगाधर मदभवी, अजित पाटील, विठ्ठल सातपुते, चिदानंद बेणुरे, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शबाना शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले तर आभार सचिव सुनील दावडा यांनी मानले.




# आस्था रोटी बँकेतर्फे गणेशमूर्तींचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेतर्फे गणेश उत्सवनिमित्त २१ शाडूच्या गणेशमूर्तींचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर शोभा बनशेट्टी, राजशेखर हिरेहब्बू, सिध्दी डेव्हलर्पसचे संचालक रामचंद्र कबाडे, समाजसेवक राजू हौशेट्टी, न्यायधीश सचिव निता मंकणी, मिथुन शहा, बीएसएनएलचे वरिष्ठ अधिकारी अमित कांबळी, डॉ. मीना गायकवाड, राजशेखर विजापुरे व कैलास जेऊरे आदींचा सहभाग होता. सूत्रसंचलन छाया गंगणे यांनी केले. प्रस्ताविक निलिमा हिरेमठ, आभार संपदा जोशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आस्थाचे सर्वेसर्वा विजय छंचुरे, सांगिता छंचुरे, निलिमा हिरेमठ, कांचन हिरेमठ, पुष्कर पुकाळे, छाया गंगणे ,निता आक्रुडे, सुर्वणा पाटील, स्नेहा मेहता, मंगल पांढरे, अविनाश मार्चला आदींनी परिश्रम केले.

# २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हयात दि. २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येत असून, विधीज्ञ, पक्षकार व नागरिकांनी यामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष सलमान आझमी यांनी केले आहे.

राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये सदर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन सर्व न्यायालयात करण्यात येत आहे. लोक अदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे बँक वसुली प्रकरणे, कलम ३८ एन. आय. अॅक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखारत, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहण्याकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.




# सिंहगड स्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ सप्टेंबर-**

सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज केगाव येथे शिक्षक दिन तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

शिक्षक दिनाची सुरुवात शिक्षकांद्वारे घेतलेल्या परिपाठाने झाली, 'एक शिक्षक एक झाड' या संकल्पनेअंतर्गत शिक्षकांना झाड देण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले तसेच शिक्षकांसाठी मनोरंजक खेळ प्रकारही घेण्यात आले. शाळा सुरू झाल्यानंतर ते सुटेपर्यंत दिवसभराचे नियोजन सांस्कृतिक विभाग, विद्यार्थी परिषद सदस्य, व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी केले होते. या विशेष प्रसंगी शाळेतील सर्व कामकाज विद्यार्थ्यांद्वारे पार पाडले गेले. काही विद्यार्थ्यांनी संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर, प्राचार्या, उपप्राचार्य, शिक्षक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, क्लार्क, आणि अकाउंटंट या भूमिका साकारल्या. कार्यक्रमाचे आयोजन कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. तसेच प्राचार्या निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांचे सहकार्य लाभले.

# 'देहरुपी नको आत्मरुपी जगा'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**




शरीराचा मोह दूर करा.हा देह म्हणजेच मी असे आपण समजतो. दिवस-रात्र या नश्वर देहाचे लाड पुरविण्यात,देह सजविण्यात व्यस्त असतो.परंतु शेवटी शरीर आपल्याला सोडून जाते.शरीराचा मोह सोडा. देहरुपी नको आत्मरुपी जगा, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

एक रुपयाही खर्च न करता आपणही कारखानदार बनू शकता....! आपल्याला कारखाना उभारायचा आहे तो साखरेचा आणि बर्फाचा! आजपासून आपल्या डोक्यावर बर्फ जिभेवर साखर आणि हृदयात प्रेम असू द्या.आपल्याला जीवनात शांतता हवी असेल तर सार्वजनिक जीवनात,घरात, समाजात वावरताना डोक्यावर बर्फ ठेवून वावरा.बोलताना नेहमी शुभ बोला.कटू वचन,अपशब्द टाळा.कोणाचे मन दुखावेल असे बोलू नका .अभद्र बोलणे टाळा. शक्य तेवढे लोकांचा आशीर्वाद घ्या,कोणाचाही तळतळाट घेऊ नका. गोड बोला,शुभ बोला. स्वभाव प्रेमळ असावा. लहान मुलांशी बोलताना देखील त्यांना तुम्ही प्रेमाने सांगा ते ऐकतील. कटू शब्दाचा वापर नको.

पर्यूषण पर्वाचा आज आठवा दिवस. तपश्चर्येचे विविध प्रकार आहेत. तपश्चर्येमुळे केवल ज्ञान आणि केवल दर्शनाची प्राप्ती होते. सिंहावलोकन तप देखील महत्त्वाचे असते.पर्यूषण पर्वानिमित्त आयोजित अंतगड सूत्राचे वाचन आज समाप्त झाले.




# सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने अक्कलकोट नाका येथे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने निळ्या आकाशासाठी स्वच्छ हवेचा आंतरराष्ट्रीय दिन वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

निळ्या आकाशासाठी स्वच्छ हवेचा आंतरराष्ट्रीय दिनाचे हे सलग पाचवे वर्ष आहे. या वर्षाची थीम 'एक पेड माँ के नाम' ही होती. सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग व पर्यावरण विभाग यांच्याकडून या दिनानिमित्त अक्कलकोट नाका येथे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमासाठी सहायक आयुक्त ज्योती भगत, पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, सहायक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी नितीन साके, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्नील सोलनकर आदी उपस्थित होते. सहायक आयुक्त भगत यांनी यावेळी येथील वृक्षारोपण तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या कामाची पाहणी केली.

# ऊस बिलासाठी पाच दिवसांपासून उपोषण सुरु

### 300 शेतकऱ्यांचा सहभाग

### उसाचे पैसे मिळाल्याशिवाय उठणार नाही : शेतकरी संघटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**



तुळजापूर, उमरगा, निलंगा, लोहारा आणि अक्कलकोट तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी मातोश्री शुगर को-जनरेशन रूद्रवाडी (दुधनी), ता. अक्कलकोट या कारखान्याला ऊस घातला होता. मात्र गेल्या ८ महिन्यांपासून या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले नसल्याने त्या-त्या भागातील शेतकरी आणि धाराशिव येथील शेतकरी संघटनेच्या वतीने येथील कॉंग्रेस कमिटी कार्यालयासमार गेल्या ५ दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत २७०० रू. प्रति टनाप्रमाणे पैसे या शेतकऱ्यांच्या खात्यावर पडणार नाहीत; तोवर हे उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा पवित्रा या शेतकरी संघटना आणि शेतकरी बांधवांनी घेतला आहे.

गेल्या ८ महिन्यामपूर्वी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या मातोश्री शुगर को-जनरेशन रूद्रवाडी कारखान्यास ऊस घातला होता. यातील काही शेतकऱ्यांच्या खात्यावर ५०० व १००० रू. प्रतिटनाप्रमाणे बँक खात्यात पैसेही आले आहेत. मात्र उर्वरित ३०० शेतकऱ्यांचे पैसे या कारखान्याकडून येणे बाकी आहेत. यासाठी दि. २९ जुलै २०२४ रोजी चेअरमनच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केल्यावर सिध्दाराम म्हेत्रे यांनी दि. ३ ऑगस्ट रोजी टनाला २७०० रू. प्रमाणे भाव देणार असल्याचे लिखित पत्र दिल्याचे उपोषणकर्त्यांनी या निवेदनात नमूद केले आहे. पण आजपावेतो काही शेतकऱ्यांच्या टनाला ५०० ते ७०० रू. प्रमाणे पैसे मिळाले आहेत. बहुतांश शेतकऱ्यांना आजपर्यंत एक रूपयाही देण्यात आला नसल्याचा त्यांचा आरोप आहे. या कारणास्तव या शेतकऱ्यांनी आता थेट कॉंग्रेस भवन, सोलापूर गाठून आपले उपोषण सुरू केले आहे. त्यांनी माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे यांच्याकडेही आपल्या समस्या मांडल्या आहेत.

शुगर अॅक्टप्रमाणे १५ दिवसात शेतकऱ्यांचे बील देणे बंधनकारक असताना गेल्या ८ महिन्यांपासून हे बील मिळाले नाही. यापूर्वीही दि. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी सोलापूर येथील कॉंग्रेस भवन समोर याच कारखान्याविरोधात शेतकरी संघटना, शेतकऱ्यांनी २८ दिवस उपोषण करून ६० कोटी रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यास भाग पाडले होते. यामुळे एक जबाबदार नागरिक आणि जनसेवक असलेल्या माजी मंत्री म्हेत्रे यांनी या गरीब शेतकऱ्यांचे उसाचे पैसे त्यांच्या खात्यावर जमा करावेत, अशी अपेक्षाही उपोषणार्थी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या उपोषणात धाराशिव जिल्हा शेतकरी संघटना अध्यक्ष सतीश बनसोडे, सुरज बचाटे, प्रशांत पाटील, अरविंद घोडके, जगू गायकवाड, शरद बिराजदार, बाळू त्रिकोळे, प्रविण हारके, बालाजी कुलकर्णी, लेवश घोडके, सुनील जवळगे, पंकज होगाडे, धनराज जाधव यांच्यासह इतर शेतकऱ्यांचा सहभाग आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### महिलांच्या सुरक्षेसाठी राज्यात 'शक्ती' कायदा लागू करावा : शेख

**करकंब, दि. ८ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्यात मागील काही दिवसांमध्ये महिला अत्याचारांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून राज्याच्या विकासाच्यादृष्टीने हे चित्र निराशादायक आहे. त्यामुळे राज्यातील महायुती सरकारने लवकरात लवकर 'शक्ती' कायदा लागू करून महिलांसाठीचे सुरक्षाकवच आणखी मजबूत करावे अशी मागणी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्याकडे करण्यात आली. पंढरपूर दौऱ्यावर आल्या असता राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते तथा पंढरपूर तालुकाध्यक्ष साहिल शेख यांनी पत्राद्वारे केली. यावेळी साहिल शेख यांनी राज्यातील महायुती सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्दल अदिती तटकरे यांचे आभार मानले. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि शक्ती कायद्यासंदर्भात राज्यातील महायुती सरकार संवेदनशील असून यामधील अडचणी दूर करून केंद्र सरकारच्या मदतीने हा कायदा राज्यामध्ये लवकरच लागू करण्यात येईल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांतिक सदस्य कल्याण काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, महिला जिल्हाध्यक्ष वर्षा शिंदे, महिला शहराध्यक्ष संगीता जोगदंड, पंढरपूर तालुकाध्यक्ष अनिल नागटिळक, विद्यार्थी प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे, युवक जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, कार्याध्यक्ष अक्षय भांड, विद्यार्थी सरचिटणीस वंशभूषण शिंदे, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




### लायन्स क्लबतर्फे रेखा सोनकवडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांना शिक्षक दिनी अक्कलकोट लायन्स क्लबतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार अध्यक्ष शिवानंद नंदरगी यांच्या हस्ते देण्यात आला. रेखा सोनकवडे यांचे शैक्षणिक, सामजिक कार्य उत्तुंग आहे. त्यासाठी त्यांना यापूर्वी पण अनेक पुरस्कार मिळाले आहेत. रेखा सोनकवडे म्हणाल्या की पुरस्कारामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. याप्रसंगी पंचप्पा सोनकवडे, सुनिता सोनकवडे, अनुसया कलशेट्टी, नीलिमा जाधव, रत्नाबाई रेऊरे, कविता फड, तोलान बागवान, चनम्मा परीट आदी उपस्थित होते.

### यशराजे साळुंखे-पाटील यांनी मिळवली वकिलीची पदवी

**सांगोला, दि. ८ सप्टेंबर-**



यशराजे दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी सिम्बॉयसिस या विद्यापीठातून एलएलबी पदवी प्राप्त केली. सिम्बॉयसिस इंटरनॅशनल लॉ कॉलेजचा पदवी प्रदान सोहळा राष्ट्रपती द्रौपदी मूर्मूजी, राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन, सिम्बॉयसिसचे कुलगुरू डॉ. एस. बी मुजुमदार, प्रधान सचिव डॉ. विद्या येरवडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी यशराजे यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. एलएलबीचे शिक्षण पूर्ण करत असताना यशराजे यांनी सदैव आ. काकासाहेब साळुंखे-पाटील यांच्या विचारापासून प्रेरणा घेतली. हभप शारदादेवी साळुंखे-पाटील यांच्या संस्कारात वाढल्याने त्यांच्या या यशाला आणखी झळाळी प्राप्त होत आहे. एलएलबीची पदवी पूर्ण केल्यानंतर आता पुढील एलएलएमची पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी विश्वविख्यात लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये जाण्याचा निर्धार यशराजे साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केला.



### पिलीव येथे पोलिसांचा रुट मार्च

**पिलीव, दि. ८ सप्टेंबर-**

माळशिरस तालुका पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील पिलीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या नेतृत्वाखाली पिलीव येथे रुट मार्च काढण्यात आला. यामध्ये सहाय्याक पोलीस निरीक्षक संदीप गोसावी, माळशिरस पोलीस ठाण्याचा स्टाफ व पिलीव औटपोस्टकडील पोलीस नाईक धनाजी झगडे, दत्ता खरात, कॉन्सस्टेबल अमित जाधव व पोलीस मुख्यालयाकडील एक आरसीबी पथक या रुट मार्चमध्ये सहभागी झाले होते. पिलीव येथील हनुमान मंदिरापासून ते बसस्थानकावरील पोलीस चौकीपर्यत पिलीवच्या मुख्य पेठेतून हा रुट मार्च काढण्यात आला. आगामी गौरी, गणपतीचा सण तसेच ईए-मिलाद या सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी तसेच सर्व सण शांततेत पार पडावेत, यासाठीच हा रुट मार्च काढण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# अहिल्यादेवी सिंचन विहिरीची बिले मिळेना

## सात महिन्यांपासून शेतकऱ्यांचे हाल; स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर असलेल्या अहिल्यादेवी सिंचन विहिरीची बिले गेल्या सात महिन्यांपासून मिळालीच नाहीत. शेतकरी हेलपाटे मारुन हतबल झाले . पण बिले मिळालीच नाहीत. याचसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गटविकास अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यावेळी या ठिकाणी जबबादार अधिकारी म्हणजेच गटविकास अधिकारीच नसल्यामुळे त्यांच्या खुर्चीला हार घालण्यात आला. १२ सप्टेंबर रोजी यावर लाभार्थी शेतकरी व संबंधित अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक घेण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. माळशिरस




तालुक्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत १,२०० विहिरींना मंजुरी देण्यात आली. यामध्ये एप्रिल-मे महिन्यात कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर जवळपास ७०० विहिरींची कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये काही शेतकऱ्यांना फेब्रुवारी-मार्चमध्ये कार्यारंभ आदेश मिळाले होते. या सर्व शेतकऱ्यांनी खासगी सावकाराकडून अक्षरशः व्याजाने पैसे काढून विहिरीची कामे पूर्ण केली. पण त्यांना अद्यापही एकही रुपयाचे बिल मिळालेच नाही. शासनाने या योजनेंतर्गत विहिरीसाठी चार लाख रुपये अनुदान केले आहे. यामुळे शेतकऱ्यांचा या योजनेकडे ओढा वाढला आहे तर आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खूष करण्यासाठी या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात विहिरी मंजूर करण्यात आल्या खरे. पण माळशिरस पंचायत समितील रोजगार हमी विभागाने बिलासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरले. याविरुद्ध स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर व इतर पदाधिकारी माळशिरस पंचायत समितीत गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, रोजगार हमी विभागातील अधिकाऱ्यांना पूर्व सूचना देऊन जाब विचारण्यास गेले असता त्याठिकाणी अधिकारीच नसल्यामुळे माळशिरस पोलीस स्टेशनला निवेदन देऊन माळशिरस पंचायत समितीत गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयातच घोषणाबाजी करीत ठिय्या आंदोलन केले. माळशिरस पंचायत समितीमध्ये सध्या कायमस्वरूपी गटविकास अधिकारीच नाहीत. या ठिकाणी प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून करमाळ्याचे मनोज राऊत आहेत. ते आठवड्यातून फक्त दोनच दिवस या ठिकाणी येतात. यामुळे येथील अधिकारी कोणाचेही वचक नसल्यामुळे कार्यालयाकडे फिरकतच नाहीत. तसेच ते लाभार्थी शेतकऱ्यांकडून मोठी आर्थिक लूट करीत आहेत.

### शेतकऱ्यांच्या लुटीची चर्चा

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहिरीची मंजुरी मिळविण्यासाठी माळशिरस पंचायत समितीतील रोजगार हमी विभागातील अधिकारी, ग्राम रोजगार सेवक व काही गावातील सरपंचांची मिलीभगत होऊन विहीर मंजूर करण्यासाठी शेतकऱ्यांकडून मोठी रक्कम घेतली असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.

## कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना सहा लाखांच्या धनादेशाचे वाटप

### आ. शहाजीबापू पाटील यांच्या पत्राची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ सप्टेंबर-**



कटफळ (ता. सांगोला) येथील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सहा महिलांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाने सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. शुक्रवारी आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते कटफळ येथील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सहा महिलांच्या नातेवाईकांना धनादेशाचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रांताधिकारी बी. आर. माळी, मंडल अधिकारी प्रशांत जाधव, परमेश्वर हाके, दत्ता बंडगर, अंबादास हांडे, जेजीनाथ धंगेकर, अजित भिंगे, तानाजी हांडे, विकास खरात उपस्थित होते. १८ जून २०२४ रोजी पंढरपूर-कराड रोडवरील चिकमहूद जवळ (बंडगरवाडी) पाटी येथे अपघातात आश्विनी शंकर सोनार, इंदुबाई बाबा इरकर, शिरमाबाई लक्ष्मण जाधव, कमल यल्लाप्पा बंडगर, सुलोचना रामा भोसले, मनीषा आदिनाथ पंडित (सर्वजण रा. कटफळ) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आ. शहाजीबापू पाटील यांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त करून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची तसेच जखमी महिलेच्या उपचारासाठी २५ हजार रुपयांची व्यक्तिगत मदत दिली होती. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिकची मदत मिळवून देण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. या पत्राची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेतली असून सकारात्मक प्रतिसाद देत विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या. मुख्यमंत्री सचिवालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या.

## माळशिरस शहर, परिसरात गणपतीचे उत्साहात आगमन

### मुख्य मार्गावरुन पोलिसांचा रुट मार्च; शासकीय, निमशासकीय कार्यालयात गणरायाची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ८ सप्टेंबर-**



माळशिरस शहर व परिसरात आज गणेश चतुर्थीच्या दिवशी गणपतीचे उत्साहात आगमन झाले. घरोघरी नागरिकांनी गणपतीची उत्साहात प्रतिष्ठापना केली तर दिवसभर अनेक मंडळांनी गणपतीची प्रतिष्ठापना केली. गणपती खरेदीसाठी व गणपतीच्या सजावटीच्या लागणाऱ्या वस्तूच्या खरेदीसाठी बसस्थानक परिसरात नागरिकांनी गर्दी केली होती.

यंदा गणेशमूर्ती पंधरा ते वीस टक्क्यांनी महाग झाल्याने शंभर रुपयांपासून पाच हजारापर्यंतच्या मूर्ती विक्रीसाठी आल्या होत्या. माळशिरस शहरासह परिसरातील व्यापाऱ्यांनी मूर्ती विक्रीसाठी आणल्या होत्या. त्याचबरोबर गणपती सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याची अनेक दुकाने शहरात आली होती. माळशिरस शहरातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच सर्व शाळांमध्ये आज गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. माळशिरस पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या ३२ गावात १२१ सार्वजनिक गणेश मंडळांनी नोंदणी केली आहे. गणपती उत्सव व ईद-ए-मिलाद या सणामध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी माळशिरस पोलीस ठाण्यात जादा पोलिसांची कुमक तैनात करण्यात आली असून त्यात महिला पोलिसांचाही सहभाग आहे. आज पोलिसांनी शहराच्या प्रमुख मार्गावरून रूट मार्च काढला.

### हलग्यांचा कडकडाट

यावर्षी प्रथमच गणपती विक्रीच्या ठिकाणी चार हलगी पथके होती. नागरिकांनी गणपती खरेदी केल्यानंतर ही हलगी पथके नागरिकांना वाजत गाजत त्यांच्या वाहनापर्यंत सोडत होती.

## करमाळा उपजिल्हा रुग्णालयात भूलतज्ज्ञाच्या नेमणुकीची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ सप्टेंबर-**

करमाळा उपजिल्हा रुग्णालयामध्ये कायमस्वरूपी भूलतज्ज्ञाची नेमणूक नसल्याने रुग्णांना उपचारासाठी सोलापूर अथवा अन्यत्र पाठवले जाते. त्यामुळे येथे भुलतज्ज्ञाची त्वरित नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार संजयमामा शिंदे यांच्याकडे करण्यात आली.

याविषयी आमदार शिंदे यांना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये असं म्हंटलं आहे की,आपल्या प्रयत्नांमुळे या रुग्णालयात महिलांसाठी मोफत सिझरची सुविधा सुरू झाली,परंतु कायमस्वरूपी भुलतज्ज्ञ नियुक्त नसल्याने ही सुविधा मिळण्यामध्ये बऱ्याच वेळा अडचण निर्माण होते आहे तेव्हा कायमस्वरूपी भुलतज्ज्ञ नियुक्ती चा प्रश्न आमदार शिंदे यांनी लक्ष घालून त्वरित सोडवावा असे या निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन देताना सुजित बागल, किरण फुंदे, अशपाक जमादार, आशिष गायकवाड, भरत आवताडे, ॲड. अजित विघ्ने, स्वप्निल पाडुळे, महादेव फंड व पदाधिकारी उपस्थित होते.

> करमाळा उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांना सर्व सुख सुविधा मिळाव्यात यासाठी मी प्रयत्नशील असून याबाबतीमध्ये माझा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. सध्या वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियमित बदली प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेमध्ये उपजिल्हा रुग्णालय करमाळासाठी निश्चितच कायमस्वरूपी भुलतज्ञ मिळेल. याविषयी वरिष्ठस्तरावर माझे बोलणे झाले आहे.
>
> **-आ. संजयमामा शिंदे**

## ३२ लाख अफरातफरप्रकरण; आरोपीस जामीन

### वि. के. मार्टमध्ये मूळ बिलात बदल केल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ सप्टेंबर-**



बार्शी येथील वि. के. मार्टमधील ३२ लाखांच्या अपरातफरप्रकरणी आरोपीला जामीन मंजूर झाला आहे.

येथील प्रसिद्ध वि.के. मार्टमध्ये कॅशियर व सॉफ्टवेअर ऑपरेटर म्हणून कार्यरत असणाऱ्या संकेत गौरीशंकर सोनवणे यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन सॉफ्टवेअरमध्ये मूळ बिलात बदल करुन ५ वर्षाच्या कालावधीमध्ये सुमारे ३२ लाखांची अफरातफर केली, अशा आशयाची फिर्याद मॉलच्यावतीने युवराज सोपल यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे दि. २१ एप्रिल रोजी दाखल केली होती. सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुद्ध भादंवि कलम ४२०, ४०६, ४०८, ४६७, ४७७ अंतर्गत गुन्हा नोंद होऊन आरोपीस अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी आरोपीच्यावतीने ड. योगीराज पुरवंत यांच्यामार्फत बार्शी येथील सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

सदर अर्जाच्या सुनावणी वेळी युक्तिवाद करताना ड. पुरवंत यांनी दाखल पुराव्याच्या विश्वासार्हतेवर तसेच तपासाच्या निपक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच गुन्हा घडल्याचे माहिती झाल्यानंतर देखील आरोपीस २ महिने कामास ठेवले व सुमारे ४ महिने उशिराने फिर्याद दाखल केल्यामुळे फिर्याद संशयास्पद असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद केले. तसेच आरोपी व्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांनी देखील बिलात बदल केलेले रिपोर्टवरुन दिसून येत असून त्यामुळे केवळ आरोपीनेच गैरहेतूने बिलात बदल केला असे प्रस्थापित होत नाही, असे नमूद केले.

तसेच अद्ययावत सॉफ्टवेअर, सेक्युरिटी चेकिंग, सीसीटीव्ही रेकॉर्डिंग अशा सुविधांनी सुसज्ज असणाऱ्या मॉलमध्ये दैनंदिन बिलाचे ऑडिट होत असताना देखील सलग ५ वर्षे होणारी अफरातफर ही कोणाच्या लक्षात आली नाही ही बाब आश्चर्यकारक आहे, असे कथन केले. तपासादरम्यान सादर करण्यात आलेल्या ४ सीसीटीव्ही फुटेजमध्ये जरी आरोपी खिशात पैसे टाकताना आढळून आला असला तरी सदर घटनेचा पूर्ण व्हिडिओ असताना देखील अर्धवट व्हिडिओ दाखल करुन न्यायालयाची दिशाभूल करण्यात येत आहे असे स्पष्ट केले. त्यामुळे आरोपिताने गैरहेतूने खिशात पैसे टाकले असा निष्कर्ष काढता येणार नाही असे सांगितले.

फिर्यादीने स्वतःच्या गहाळ व्यवस्थापनाचे खापर आरोपीवर फोडून केवळ संशयाच्या आधारावर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे असे सांगितले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून माननीय जिल्हा व सत्र न्यायालयाने २५ हजारांच्या जातमुचलक्यावर आरोपीची मुक्तता करण्याचे आदेश दिले आरोपीच्यावतीने ड. योगीराज पुरवंत, ॲड. सुदर्शन सोनवणे तर मूळ फिर्यादी तर्फे ॲड. श्याम झालटे व सरकारतर्फे ॲड. राजश्री कदम यांनी काम पाहिले.

## मध्यरात्री घिरट्या घालणाऱ्या ड्रोनमुळे भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ सप्टेंबर-**



गेल्या काही दिवसांपासून सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागात रात्री अपरात्री आकाशात घिरट्या घालणाऱ्या ड्रोनमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.प्रशासकीय अधिकाऱ्यांनी याबाबत अधिकृत माहिती घ्यावी आणि नागरिकांना भयमुक्त करावे अशी मागणी माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शुक्रवार दि.६ सप्टेंबर रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. डॉ. पियुषदादा साळुंखे-पाटील, अशोक शिनगारे, तुकाराम घेरडे,निरंजन गडहिरे, सुयश बिनवडे यांनी हे निवेदन दिले.

गेल्या काही दिवसांपासून सांगोला तालुक्यातील कोळा, जुनोनी, नाझरा, बलवडी, चोपडी, चिणके, घेरडी, हंगीरगे, वाकी, आलेगाव, जवळा परिसरात रात्री अपरात्री आकाशात अनेक ड्रोन घिरट्या घालत असताना निदर्शनास आले आहेत. ड्रोनच्या माध्यमातून चोर रेकी करून चोरीची तयारी करत असल्याच्या अफवेमुळे सांगोला तालुक्यात रात्रभर महिला, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक तसेच सर्वच नागरिक भयभीत होत आहेत. शिवाय ड्रोनच्या बाबतीत सोशल मीडियावर वेगाने पसरत असलेल्या अफवामुळे ग्रामीण भागातील जनतेत आणखी असुरक्षितता वाढू लागली आहे.पोलीस निरीक्षक तसेच तहसीलदारांनी याबाबतीत वरिष्ठांशी चर्चा करून नक्की हे ड्रोन कशासाठी रात्री अपरात्री फिरत आहेत याची माहिती घ्यावी आणि अधिकृतपणे यावर खुलासा करावा असेही या निवेदनात दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी नमूद केले आहे.

### नागरिकांनी अफवांना बळी पडू नये.

रात्री अपरात्री आकाशात घिरट्या घालणारे ड्रोन नक्की कशासाठी फिरत आहे याबाबत अद्याप अधिकृत माहिती नाही.परंतु,या ड्रोनच्या माध्यमातून रेकी करून चोऱ्या केल्या जातात ही निव्वळ अफवा आहे.नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.लवकरच याबाबतीत वरिष्ठांकडून अधिकृत माहिती घेऊन सदर ड्रोन बाबतीत योग्य तो खुलासा करण्यात येईल.

**- भीमराव खनदाळे,** पोलीस निरीक्षक, सांगोला

## जत्रेच्या रथोत्सवात झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. ८ सप्टेंबर-**



जत्रा रथोत्सवादरम्यान रथाच्या चाकात अडकून एका तरुणाचा मृत्यू झाल्याचे घटना घडली आहे.

विजयपूर जिल्ह्यातील देवरहिप्परगी तालुक्यातील बीबी इंगळगी गावात गुरु सिद्धेश्वर जत्रेत रथाच्या चाकात अडकून देवेंद्र बडिगार (वय २४) तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेचे दृश्य मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली आहे. रथ ओढत असताना हा तरुण रथाच्या चाकात अडकला. गंभीर जखमी झालेल्या देवेंद्रला रुग्णालयात नेण्याचे प्रयत्न करण्यात आले. वाटेतच देवेंद्रचा मृत्यू झाला. कलकेरी पोलीस या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अकलूजमधील विद्यार्थिनींनी बनवले पर्यावरणपूरक बाप्पा



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ सप्टेंबर-**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लक्ष्मीबाई कन्या प्रशालेमध्ये पर्यावरणपूरक गणपती बनविण्याच्या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी मूर्ती बनविल्या.

विद्यार्थिनींनी पर्यावरणपूरक मुंबई माती (बॉम्बे क्ले)चा वापर करून आपल्या कल्पकतेनुसार सुंदर गणपती बाप्पांच्या मूर्ती तयार केल्या. आपल्या स्वतःच्या हाताने गणपती बाप्पांची मूर्ती आपण तयार करू शकलो याचा आनंद सहभागी सर्व विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.दरवर्षी याचप्रमाणे पर्यावरण पूरक गणपती तयार करून त्याच गणपतीची प्रतिष्ठापना आम्ही आमच्या घरी करू असा विश्वास विद्यार्थिनींनी बोलून दाखवला. सहभागी सर्व विद्यार्थिनींचे संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते -पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते - पाटील, संस्थेच्या संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव खराडे यांनी कौतुक केले. कार्यशाळेसाठी मुख्याध्यापिका पवार यांचे मार्गदर्शन लाभले. चित्रकला शिक्षक विशाल लिके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## संक्षिप्त वृत्त...



### माढा येथे बँक ऑफ इंडियाचा स्थापना दिन उत्साहात साजरा

**माढा, दि. ८ सप्टेंबर-**

माढा येथे बँक ऑफ इंडियाचा ११९ वा स्थापना दिवस केक कापून शाखेत साजरा करण्यात आला. वरिष्ठ शाखाधिकारी प्रमोद गलांडे म्हणाले की, बँक ऑफ इंडियाच्या माढा शाखेतून सभासदांना विनम्र सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. ग्राहकांना कर्जवाटप करुन कर्ज स्वरुपात आम्ही मदत करु. कर्ज वेळेत परत करणे ही त्यांची जबाबदारी आहे. ग्राहकांनी सिबीलकडे लक्ष देणे गरजेचे आहे. यावेळी दोन ग्राहकांना कर्ज वितरण करण्यात आले. यावेळी उद्योजक वैजिनाथ माळी, प्रसाद भास्करे, नेताजी लांडगे, महादेव परबत, केंद्र व्यवस्थापक अविनाश शिंदे, नितीन वरळे, अरविंद बट्टीन, सागर देशपांडे, सुरज भराटे, अमर ढावरे, प्रदीप क्षीरसागर, आशिष चोरमले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्माकर खराटे यांनी केले तर आभार गणेश सर्जे यांनी मानले.



### अण्णाराव खंडागळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**माढा, दि. ८ सप्टेंबर-**

शेटफळ येथील लिटिल मास्टर इंग्लिश मीडियम स्कूलमधील कलाशिक्षक अण्णाराव नागनाथ खंडागळ यांना स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य व मंत्रालय समन्वय समिती मुंबईतर्फे शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, अध्यक्ष बापूसाहेब अडुळ यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयराज डोंगरे, अजय डोंगरे, प्राचार्य फराह शेख, कार्यालयीन अधीक्षक चेतन कोरके, श्रीकांत पुजारी, संतोष कवडे, रवी वसेकर, गजानन क्षीरसागर, स्वप्निल चव्हाण, जैसल पवार, नितीन कांबळे, वैभव गायकवाड, दिनेश गाडेकर, नगरसेवक सुधीर लंकेश्वर, जिल्हा कलाध्यापक संघाचे अध्यक्ष दीपक कन्ना, चित्रकार देवेंद्र निंबर्गीकर यांच्यासह शैक्षणिक सामाजिक व कलाक्षेत्रातील कला प्रेमींनी केले.



### स्वेरीतर्फे नवरंगे बालकाश्रमाला पाणी शुद्धीकरण यंत्र भेट

**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या इलाईट फोरममार्फत पंढरपूरमधील वा. बा. नवरंगे बालकाश्रमाला पाणी शुद्धीकरण यंत्र भेट देण्यात आले. यावेळी नवरंगे बालकाश्रमाच्या अधीक्षिका राजश्री गाडे, डॉ. एम. एम. पवार उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार, व्यवस्थापक सुचित्रा पवार आणि लेखाधिकारी धर्मराज डफळे, इलाईट फोरमचे समन्वयक प्रा. एस. आर. वाघचवरे, प्रा. एम.ए. सोनटक्के, प्रा. एस. एस. गावडे, प्रा. ए. ए. गरड, इलाईट फोरमचे अध्यक्ष तुषार बर्ले आणि गिरीजा देशमुख उपस्थित होते. पाणी शुद्धीकरण यंत्र बालकाश्रमातील मुलांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. नवरंगे बालकाश्रमाच्या व्यवस्थापनाने स्वेरीच्या या भेटवस्तू बाबत आभार मानले.

### स्वेरीत मंगळवारी 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन

**पंढरपूर, दि.८ सप्टेंबर-**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगतर्फे 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२४' या राष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या स्पर्धेच्या अंतर्गत महाविद्यालय स्तरावर 'स्वेरीज् स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२४' चे मंगळवारी १० सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थाध्यक्ष दादासाहेब रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष एन. एस. कागदे, प्रा. सूरज रोंगे, डॉ. एम. एम. पवार, प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार, विद्यार्थी प्रतिनिधी अवधूत भोसले, सोनाली करवीर, प्रा. डॉ. पी आर. कुलकर्णी उपस्थित होते. हॅकाथॉनमध्ये निवडल्या गेलेल्या ५० संघांना राष्ट्रीय स्तरावरील अंतिम हॅकाथॉन-२०२४ मध्ये सहभाग घेण्यासाठी शिफारस केली जाईल.

# धनगर समाजाचे पंढरीत आजपासून आमरण उपोषण

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर समाज आक्रमक; मुख्यमंत्र्यांनी आदेश घेऊनच यावे, अन्यथा सत्तेवरून पायउतार करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

राज्यातील धनगर समाजाला घटनेनुसार एसटी आरक्षण असून त्यांची अंमलबजावणी करा अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. मात्र याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. म्हणून धनगर समाज आक्रमक झाला असून सोम वार ९ सप्टेंबरपासून पंढरपुरात आमरण उपोषण सुरु करण्यात येणार असल्याची माहिती सकल धनगर समाजाच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी पांडुरंग मेरगळ, अॅड. विजय गोफणे, भीमराव सातपुते, दीपक बोराडे, माऊली हळणवर, सुभाष मस्के, विठ्ठल पाटील, सोमनाथ ढोणे, प्रशांत घोडके, प्रसाद कोळेकर, संजय लवटे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या घटनादत्त आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी ९ सप्टेंबरपासून टिळक स्मारक येथे राज्यव्यापी आमरण उपोषण होणार असल्याची माहिती सकल धनगर जमात महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आज उपोषण आंदोलनाचे राज्य समन्वयक पांडुरंग मेरगळ यांनी दिली. मागील ७० वर्षांपासून धनगर समाज सनदशीर मार्गाने आरक्षण अंमलबजावणीची मागणी करत आहे. परंतु प्रत्येक सरकारने आश्वासना पलीकडे काही दिले नाही म्हणून धनगर जमातीमध्ये असंतोष पसरलेला आहे. विद्यमान राज्य सरकारने आता तरी तात्काळ आरक्षण अंमलबजावणीचा जीआर काढावा, यासाठी राज्यव्यापी आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

पंढरपूर येथील उपोषणापूर्वी ३ सप्टेंपासून जेजुरी येथून खंडेरायाचा भंडारा उधळून जागर रथयात्रेला सुरुवात केली असून ती ११ तालुक्यातून फिरून पंढरपूरमध्ये ९ सप्टेंबर रोजी येईल. याठिकाणी आराध्य दैवत असणाऱ्या विठुरायाला सरकारला एसटी आरक्षण अंमलबजावणीची सद्बुद्धी यावी. मुख्यमंत्र्यांनी तसा आदेश घेऊन पंढरपूर येथे यावे असे साकडे घातले जाईल. त्यानंतर टिळक स्मारक येथील मैदानावर उपोषणाला सुरुवात होईल. उपोषण आंदोलनादरम्यान राज्यभरातील धनगर बांधव पंढरपुरात दाखल होणार असून आषाढी यात्रेचे स्वरूप येणार आहे. उपोषण आंदोलनाची जय्यत तयारी करण्यात आली असून सर्व सोपस्कार पूर्ण करण्यात आले आहेत. तरी या राज्यव्यापी आमरण उपोषणास राज्यातील सर्व जिल्ह्यातील हजारो समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.





### नो नेता, नो पक्ष... धनगर आरक्षण एकच लक्ष्य!

संपूर्ण राज्यातून विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, विविध पक्षात काम करणारे नेते, कार्यकर्ते, प्रबोधन मंच, आजी-माजी आमदार, उपोषणकर्ते या सर्वांच्या वतीने सकल धनगर समाज या बॅनरखाली, 'नो नेता ना, नो पक्ष, धनगर आरक्षण एकच लक्ष्य' या धोरणाने सामूहिक नेतृत्वात पांडुरंगाच्या नगरीत आमरण उपोषण ला धनगर जमातीचे अनेक कार्यकर्ते बसणार आहेत.

### सरकारकडून मूळ प्रश्नाला बगल

राज्यातील दोन करोडपेक्षा अधिक धनगरांच्या मतदानाच्या जीवावर सर्वच पक्ष सत्तेच्या खुर्चीवर बसलेत. भाजपा शिवसेना युतीने लेखी आश्वासन देऊनही व सत्ता उपभोगूनही गरीब आदिवासी धनगरांच्या जमातीच्या तोंडाला आजपर्यंत पाने पुसलेली आहेत. त्यामुळे जमातीमध्ये राज्यातील सर्वच पक्षांच्या नेत्यांबद्दल प्रचंड चीड आणि राग आहे.सनदशीर मार्गाचा अवलंब करूनही वर्षानुवर्षांची घटनादत्त मागणी मान्य न करणे म्हणजे फुले, शाहू, आंबेडकरांच्या राज्यात, छत्रपती शिवरायांच्या, मातोश्री पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या राज्यात लोकशाहीचा व धनगरांच्या न्याय हक्क अधिकाराचा दिवसा ढवळ्या खून पाडला जातोय. आत्ता हा सर्व प्रकार धनगर बांधवांच्या सहनशीलतेचा कडेलोट करणारा आहे. सरकार मूळ प्रश्नाला बगल देऊन धनगरांची घोर निराशा करत आहेत.आता आरक्षणाची अंमलबजावणी केल्याशिवाय माघार नाही, हाच उद्देश घेऊन आमरण उपोषणाला सकल धनगर जमातीसाठी बसत आहे.

# करकंब पोलिसांमुळे मूकबधिर बालकाची आई-वडिलांशी भेट



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ८ सप्टेंबर-**

चिलाईवाडी (ता. पंढरपूर) येथे मूकबधिर बालक गावकऱ्यांना दिसून आला. परंतु सदर मूकबधिर बालकास काहीच बोलता येत नसल्याने चिलाईवाडीचे पोलीस पाटील सागर जमदाडे यांनी तात्काळ पोलीस नाईक दत्ता वाघमारे यांच्याशी संपर्क करून याबाबत माहिती दिली. पोलीस नाईक दत्ता वाघमारे हे तातडीने चिलाईवाडी येथे जाऊन या मूकबधिर बालकास सोबत घेऊन करकंब पोलीस ठाणे येथे घेऊन आले.

या बालकाबाबत माहिती व चौकशी करून करकंब पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि सागर कुंजीर, पोहेकॉ ए. बी. भोसले, हेड कॉन्स्टेबल आर. आर. जाधव, पोलीस नाईक दत्ता वाघमारे, चिलाईवाडीचे पोलीस पाटील सागर जमदाडे यांनी सोशल मीडियाद्वारे तात्काळ माहिती प्रसारित केल्यानंतर सदर बाललाचे नाव रविराज दत्तात्रय जाधव (रा. गुरसाळे, ता. पंढरपूर) येथील असल्याचे समजले. त्यानंतर करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांनी तात्काळ संबंधित बालकाच्या आई, वडीलास पोलीस ठाण्यास बोलावून या मूकबधिर बालकाचा ६ तासात शोध घेऊन आई, वडिलांच्या सुखरूपपणे ताब्यात दिले. याप्रसंगीआई, वडिलांचे डोळेही आनंदाने पाणावले होते. करकंब पोलिसांनी कार्यतत्परता दाखवून त्या बालकाचा ६ तासात शोध घेऊन आई, वडिलांच्या ताब्यात दिल्याबद्दल नागरिक व दिव्यांग बांधवानी समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

# पंढरीत १६ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र

## नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेकडून नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने शहरात विविध १६ ठिकाणी खास गणेश मूर्ती संकलन केंद्रे उभारली जात आहेत.

या ठिकाणीच नागरिकांनी आपल्या गणेशमूर्ती जमा कराव्यात असे आवाहन पालिकेचे उपमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी केले आहे.

गणेश मूर्ती संकलित करण्यासंदर्भात ग्रामपंचायतीला सूचना केल्या आहेत. ग्राम पंचायतींकडून त्या त्या ठिकाणी संकलन केंद्र सुरू करण्यात येतील, असे पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी सांगितले. सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा फुले चौक, महाद्वार चौक, अर्बन बँक, कर्नल भोसले चौक, शेटे पेट्रोल पंप, कॉलेज चौक, ठाकरे चौक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुक्ताबाई मठा जवळ, अंबाबाई पटांगण, अहिल्या पुलाजवळ तसेच यमाई तलाव गेट जवळ.

# श्री विठ्ठल कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

वेणुनगर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा २०२४-२०२५ हंगामातील मिल रोलरचे पूजन हभप भगवंत महाराज चव्हाण यांच्या हस्ते व कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

हभप भगवंत महाराज चव्हाण म्हणाले की, दोन वर्षापासून बंद असलेला कारखाना त्यांच्या नेतृत्वात उत्तम प्रकारे चालवित आहेत . यापुढेही कारखान्याच्या सभासदांना न्याय देतील. अभिजीत पाटील म्हणाले की, आपला कारखाना बंद होता त्यावेळी शेजारील कारखानदार हे आपल्या ऊसावर डोळा ठेवून होते. परंत श्री विठ्ठल कारखाना चालू झाल्यामुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप होऊन त्याचा आर्थिक फायदा झाला आहे. कारखान्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत असतानासुध्दा आपण जिल्ह्यात सर्वात जास्त दर देऊन जिल्ह्यात ऊसदराची स्पर्धा निर्माण झाली. याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळतो आहे. एनसीडीसीकडून कारखान्यास कर्ज मंजूर झाल्याने थकीत असलेली ऊस बिले, तोडणी वाहतुकदार यांची बिले पूर्णतः अदा केली आहेत. सेवानिवृत्त कर्मचारी व मयत कर्मचाऱ्यांचे फायनल पेमेंट अदा करण्यात येणार आहे. यावेळी दत्ता नागणे, राम वाघ, वाय. जी. भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के यांनी केले. सूत्रसंचालन नितीन पवार यांनी केले.

याप्रसंगी स्वेरी कॉलचे संस्थापक सचिव बी. पी. रोंगे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रेमलता रोंगे, संचालक संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सीताराम गवळी, अशोक जाधव, सिद्धेश्वर बंडगर, कलावती खटके, सविता रणदिवे, तज्ज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, निमंत्रित संचालक धनाजी खरात, सचिन पाटील, तानाजी बागल, उमेश मोरे, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, गणेश ननवरे, समाधान गाजरे, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड उपस्थित होते.

### येदूचामळा-चोपडी येथे श्री गणेशाची स्थापना

**सांगोला, दि.८ सप्टेंबर-**



चोपडी (ता. सांगोला) येथील येदूचामळा येथे श्री. हनुमान गणेश तरुण मंडळाच्या वतीन श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. मंडळाचे हे ३५ वे वर्ष असून गणेश उत्सवानिमित्त दररोज सात दिवस महाप्रसादाचे आयोजन केले जाते.तसेच गणेश उत्सवानिमित्त सामाजिक व धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. आ. शहाजीबापू पाटील यांच्या आमदार निधीतून १० लाख व मंडळाचे १० लाख रुपये असा एकूण २० लाख रुपये खर्च करून गणेश मंदिरासमोर मोठा सभामंडप तयार केला आहे. सोमवारी ९ सप्टेंबर रोजी सायं.५.३० वा. आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते सभामंडपाचे उद्घाटन होणार आहे.

# मोहोळमधील पिकांना नुकसान भरपाई द्या : मुळीक



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ सप्टेंबर-**

अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची नुकसान भरपाई द्यावी आणि सोयाबीनला ६,९४५ रुपये हमीभाव द्यावा असे निवेदन मोहोळ तालुका भारतीय किसान संघाच्या वतीने तहसीलदार सचिन मुळीक यांना दिले.

किसान संघाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व तहसील कार्यालयांना अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. त्यानुसार मोहोळ तहसील कार्यालयात हे निवेदन देण्यात आले. खरीप हंगामातील मुख्य पीक असलेले सोयाबीनला ६,९४५ रु. दर प्रति क्विंटल द्यावा, अशी शिफारस कृषी मूल्य आयोगाने राज्य शासनाला केले आहे. एकूण एकरी उत्पादन खर्च ६०३९ आहे आणि एकूण परिस्थिती पाहता ती शिफारस योग्य आहे. तसेच सोयाबीनच्या खरेदीदाराने संघटनेच्या प्रयत्न करून दर ४,५०० च्या पुढे जाऊ दिले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याला उर्वरित रक्कम भावांतर पद्धतीने किंवा बक्षीस पद्धतीने देण्यात यावे असे ही या निवेदनात म्हटले आहे. त्याचबरोबर तालुक्यातील ज्या गावांमध्ये अतिवृष्टी झाली आणि नदीच्या कडेला असलेला गावांच्या मध्ये पुराचे पाणी घुसून शेती पिकाचे नुकसान झाले. अशा सर्व पिकांचे तातडीने पंचनामे करावेत आणि ते तातडीने शासनाला पाठवून द्यावेत जेणेकरून शासनाकडून मदत मिळू शकेल असेही या निवेदनात म्हटले आहे. यावेळी भारतीय किसान संघाचे सोलापूर जिल्हा मंत्री तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. मनोज व्यवहारे, मोहोळ तालुका उपाध्यक्ष विनोद देशपांडे, तालुकाध्यक्ष मच्छिंद्र गाडे-पाटील, महेश सोवनी, बाबा पाटील, गोरख पाटील, धनंजय मोहोळकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दमदार पावसाची प्रतिक्षा

## ओढे, नाले, तलाव कोरडेठाकच; पिलीव परिसरातील शेतकऱ्यांचे परतीच्या पावसाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात यंदाच्या पावसाळ्यात जून महिन्यातच पावसाने अगदी वेळेवर हजेरी लावली. यामुळे सध्या या भागातील खरीप हंगामातील बाजरी, मका व इतर पिके चांगली आहेत.वरचेवर थोडाथोडा पाऊस पडत गेल्याने खरीप हंगाम आता संपण्याच्या मार्गावर आहे. सध्या शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा लागली आहे.

या भागातील दुष्काळी पट्ट्यातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी व इतर गावात बाजरी असेल किंवा मका, कडवळ व इतर पिके चांगलीच आहेत. आता सध्या या भागातील बाजरी काढणीला आल्या आहेत. पण शेतकऱ्यांना चिंता आहे. ती अद्यापही पिलीव भागात जोरदार पाऊसच झाला नाही. अद्यापही या भागातील तळी, तलाव, बंधारे भरलेच नाहीत, याची शेतकऱ्यांना चिंता लागली आहे. पिलीव परिसरातील पिलीवचा सर्वात मोठा ओढा जो सुळेवाडी-पिलीव, झिंजेवस्ती-कुसमोड-मळोली-धानोरे ते अगदी तोंडलेबोंडलेपर्यंत जाऊन नदीला मिळतो. हा ओढा पावसाळा संपला तरी एकदाही वाहिलाच नाही. या मोठ्या ओढ्यावर पाणी अडविण्यासाठी मोठमोठे बंधारे बांधले आहेत. तेही अद्यापही कोरडे ठणठणीत आहेत.



सध्या पावसाळ्याचे परतीचे दिवस सुरू आहेत. पण अद्यापही समाधानकारक पाऊस न पडल्यामुळे पुढील हिवाळा व उन्हाळा हे हंगाम कसे जातील, शेतीला व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो की काय अशी विदारक परिस्थिती सध्या या भागात आहे. गौरी-गणपतीच्या काळात तरी मोठा पाऊस होतो की नाही याची चिंता सध्या शेतकऱ्यांन लागली आहे. सध्या नीरा उजवा कॅनॉलच्या खालच्या भागात पाण्याची कमतरता नाही. या भागात सध्या ऊस, केळी, मका, बाजरी, कडवळ, डाळिंब व इतर बागा चांगल्या आहेत. पण पिलीव परिसरातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, पठाणवस्ती, गारवाड या भागातील शेतीच्या व पिण्याच्या पाण्यासाठी जोरदार पाऊस अपेक्षित असून या भागातील बंधारे, तळी, तलाव भरले तरच पुढील हंगाम सुरळीत पार पडणार आहे. अन्यथा या भागातील नागरिकांच्या पाचवीलाच दुष्काळ पुजलेला आहे.

### ढगाळ वातावरणामुळे आशा पल्लवित

गणेश आगमनापासून या भागातील वातावरण बदलले असून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे चांगला पाऊस पडेल अशी अपेक्षा या भागातील शेतकऱ्यांनीच आहे. जर या भागात पाऊस पडला नाही तर पश्चिम भागातील गावातील शेतकऱ्यांना फक्त खरीप हंगामातील पिकावरच वर्ष घालवावे लागेल. यंदा या भागात अद्यापही जोरदार पाऊसच पडला नाही. यामुळे पिकांचे कसल्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. मात्र या भागातील शेतकरी सध्या परतीच्या पावसाकडे डोळे लावून बसला आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री तुळजाभवानी मातेस भक्ताकडून २४०.७ ग्रॅम सोन्याचे दागिणे अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ सप्टेंबर -**

कर्नाटकातील बागलकोट येथील देवीभक्ताने शनिवार दि.८ रोजी श्री तुळजाभवानी मातेवरील श्रध्देपोटी देवीजीस एक लाख, एक रुपये तसेच २४०.७०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने देवीला अर्पण केले. यानंतर श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान वतीने जनसंपर्क अधिकारी विश्वास सातपुते यांनी देविची प्रतिमा व देविची साडी देवुन त्यांचा सन्मान केला.

२४०.७०० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, लॉकेट, कानातील व सोन्याच्या अंगठ्यांचा समावेश आहे.





## संक्षिप्त वृत्त...



### रणसम्राट गणेश मंडळांच्या श्री गणेश मूर्तीची पत्रकारांच्या वतीने आरती

**तुळजापूर दि.८ सप्टेंबर -**

श्री गणेश चतुर्थीनिमित्त श्री तुळजाभवानी मंदीर परिसरात असणाऱ्या रणसम्राट गणेश मंडळाच्या श्रीगणेश मुर्तीची आरती शनिवार दि.७ रोजी स्थानिक पत्रकारांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी धाराशिव जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाउपाध्यक्ष श्रीकांत कदम, प्रदीप अमृतराव, सचिन ताकमोघे, संजय खुरूद, नंदकुमार नाईकवाडी सह अध्यक्ष शुभम क्षिरसागर, दत्ता क्षिरसागर, प्रथमेश सोंजी, समर्थ रोचकरी, अक्षय करडे, कृष्णा शिंदे, अभिषेक छत्रे, अमोल शिंदे, आलोक शिंदे, शितल अमृतराव सह मंडळाचे पदाधिकारी उपस्थितीत होते.



### जयप्रकाश विद्यालयाचा विद्यार्थी अजय लोमटे याची पोलीसपदी निवड

**धाराशिव दि.८ सप्टेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी अजय लोमटे याची अमरावती ग्रामीण पोलीस भरतीत निवड झाल्यामुळे डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अजय लोमटे याने जयप्रकाश विद्यालयात इयत्ता पाचवी ते बारावीचे शिक्षण घेतले. याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, बालाजी कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार,पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सचिन कांबळे यांनी मानले.



### समर्थ सेवाभावी संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान स्पर्धा

**जळकोट दि.८ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील समर्थ बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व्हावा. यासाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञानस्पर्धा घेण्यात आली. समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी सामाजिक संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या या सामान्य ज्ञानस्पर्धेत ६०० शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. जळकोट येथील जिल्हा परिषद प्रशाला, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक संभाजीनगर भाग शाळा व पार्वती कन्या प्रशालेत हि स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून, प्रत्येक शाळेत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना एका कार्यक्रमात पारितोषिके देण्यात येणार असल्याचे रामशेट्टी पाटील यांनी सांगितले. पालक वर्गातून घेण्यात आलेल्या या सामान्य ज्ञानस्पर्धेचे कौतुक करण्यात येत आहे.

### रुक्मिणीबाई देशमुख यांचे निधन

**धाराशिव दि.८ सप्टेंबर -**



प्राचार्य डॉ. जयसिंगराव श्रीराम देशमुख (रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव) व सुहास देशमुख यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई देशमुख यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले असून त्यांच्यावर दि.८ सप्टेंबर वार रविवार रोजी कपिलधार स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## नळदुर्ग महाविद्यालयाची ग्रीन क्लब राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, एक्काडाम, सेंटर फॉर एन्व्हायरमेंट एज्युकेशन, व्हाय वेस्ट आणि युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने युवा सहभाग जलप्रबंधन कार्यक्रम राज्यात २०२३ ते २५ या वर्षात राबवीला जात आहे. या मोहिमेत वेगवेगळ्या जल संरक्षण पद्धतीच्या अवलंबनाने अंदाजे ४० दशलक्ष घन लिटर पाणी वाचण्याची संकल्पना आहे.

या अभियानांतर्गत नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रीन क्लबला महाराष्ट्र सरकारच्या उच्च शिक्षण मंत्रालयाने राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार नामांकन घोषित केले आहे. यामध्ये सर्व बाबींमध्ये नळदुर्ग महाविद्यालयाने १०० पैकी ९९ गुण प्राप्त केलेले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालयामध्ये ग्रीन क्लब ची स्थापना करून महाविद्यालय स्तरावर निर्माल्य जमा करणे, ग्रामीण भागात शोषखड्डे व पाझर खड्डे बनवण्यास प्रवृत्त करणे गळक्या नळांची दुरुस्ती त्यासंदर्भाने प्रात्यक्षिक, पाणी व ऊर्जा बचतीचे मुल्यांकन अशा बऱ्याच प्रशिक्षण कार्यशाळा या उपक्रमात राबवुन वातावरणीय बदलांच्या (climate change) वाढीस रोखण्याचा सकारात्मक असा प्रयत्न ग्रीन क्लबच्या माध्यमातुन केला जात आहे. ग्रीन क्लब च्या माध्यमातुन जागतीक जलदिन २०२४ मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने राज्य आणि जिल्हास्तरावर विविध गटातील स्पर्धेचे पुरस्कार जाहीर झालेले आहेत.



यामध्ये नळदुर्ग येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाला एकाच वेळी महाराष्ट्र शासनाचे एकुण चार पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

यामध्ये राज्यस्तरीय उत्कृष्ठ ग्रीन क्लब पुरस्कार, जिल्हास्तरीय उत्कृष्ट ग्रीन क्लब पुरस्कार, जिल्हास्तरीय उत्कृष्ट व्हिडिओ द्वितीय पुरस्कार, जिल्हास्तरीय उत्कृष्ट पोस्टर तृतीय पुरस्कार असे एकुण एकाच वेळी महाराष्ट्र शासनाचे चार पुरस्कार मिळवणारे नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.

## विधी सेवा चिकित्सालयाचे न्या. कळसकर यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ सप्टेंबर -**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली आणि ज़िल्हा विधी सेवा प्राधिकरण धाराशिव (उस्मानाबाद) यांच्या आदेशानुसार तालुका विधी सेवा समिती लोहारा यांच्या वतीने माकणी विधी सेवा चिकित्सालयाचे उदघाटन दिवाणी कनिष्ठस्तर न्यायाधीश एस.एस. कळसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सह दिवाणी कनिष्ठस्तर न्यायाधीश पी.एस. बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी न्यायाधीश एस.एस.कळसकर यांनी विधी सेवा चिकित्सालयाबाबतचे उपस्थित



नागरीकांना महत्व सांगितले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली यांच्या कार्यक्रमाची माहिती देशातील तळागाळातील लोकांना व्हावी, विविध योजनाची अंमल बजावणी प्रभावीपणे होण्यासाठी या विधी चिकित्सालयाची स्थापना करण्यात आली असल्याचे सांगितले. तर माकणी येथील विधी चिकित्सालयाचे प्रमुख म्हणून ऍड.डी.एस. जानकर यांची नेमणूक करण्यात आली. व स्वयंसेवक म्हणून अ‍ॅड.एन. बी. मोरे यांची नेमणूक करण्यात आली. सदर विधी चिकित्सालय महिन्याच्या प्रत्येक रविवारी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत चालू राहील. यावेळी अ‍ॅड. जानकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी लोहारा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष डी.बी. जाधव, अ‍ॅड.डी.एस. जानकर, अ‍ॅड. एस.बी. मार्डीकर, अ‍ॅड.पी.एस. मुसांडे, विधीज्ञ, अ‍ॅड.एम.डी. घवाळे, माकणी येथील उपसरपंच फुलचंद आळंगे, तंटामुक्ती अध्यक्ष पंडित ढोणे, ग्रामपंचायत सदस्य भास्कर ढोणे, दीपक आळंगे, गोवर्धन आलमले, सरदार मुजावर, भिमराव कांबळे, सचिन ढोणे, गोपाळ राजपूत यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमास माकणी येथील गावातील नागरिकानी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अ‍ॅड. मार्डीकर यांनी केले तर आभार अ‍ॅड. मुसांडे यांनी मानले.

## एकलव्य विद्या संकुलात आरोग्य विषयी डॉ. यादव यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यम गरवाडी (ता. तुळजापूर) येथे महाराष्ट्र शासन विद्यांजली पोर्टलवर नोंदवलेल्या मागणी प्रमाणे तुळजापूर येथील प्रसिद्ध डॉ. रामेश्वर यादव यांनी मार्गदर्शन केले.

शारीरिक स्वच्छता व निरोगी राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी काय करावे याचे मार्गदर्शन केले. नियमित व्यायम, खेळ, फिरायला जाणे यामुळे आरोग्य चांगले राहते, योग्य आहार घ्यावा, जंक फूड खाऊ नये, दात वेळेवर व्यवस्थित घासावे, शरीराची व्यवस्थित स्वच्छता ठेवावी असे सांगितले. आजारी पडला तर अभ्यासावर परिणाम होतो.

व्यर्थ पैसा व वेळ जातो. शिक्षणात मन लागत नाही. यावेळी हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी क्षीरसागर यांनी तर आभार विठ्ठल म्हेत्रे यांनी मानले.

यावेळी संगीता पाचंगे, यशवंत निंबाळकर, शालिवाहन वाघमोडे, अनिल घुगे, अण्णासाहेब मगर, दयानंद भडंगे, कोंडीबा देवकर उपस्थित होते.

## रक्तदान शिबिरात ३१ गणेश भक्तांनी केले रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ सप्टेंबर -**

तुळजापूर खुर्द भागातील जय शिवाजी तरुण मंडळ महात्मा फुले युवा मंच तुळजापूर खुर्द यांच्या वतीने गणेशोत्सव निमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३१ गणेश भक्तांनी रक्तदान केले.

या शिबीराचे उदघाटन पोनि. रविंद्र खांडेकर यांच्या हस्ते श्रीची आरती करुन करण्यात आले. यावेळी नारायण नन्नवरे, धैर्यशील कापसे, गणेश नन्नवरे, अजिंक्य नन्नवरे, बालाजी जाधव, महेश चव्हाण, विजय नन्नवरे, अजय गायकवाड, विश्वास भोजने आदी उपस्थित होते.

शिबिर यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष चैतन्य क्षीरसागर, आकाश घाटोळे, माऊली भोजने, पांडुरंग खारे, चंद्रसेन भोजने, अमर माळी, संतोष भोजने आदींनी परिश्रम घेतले. मल्लिकार्जुन ब्लड बँक यांचे सहकार्याने शिबिर घेण्यात आले.

## नळदुर्गसह परिसरात विघ्नहर्त्याचे जल्लोषात आगमन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

नळदुर्ग शहर व परीसरात दि. ७ सप्टेंबर रोजी लाडक्या विघ्नहर्त्याचे जल्लोषात व मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६० ठिकाणी श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. त्यातील २० गावांमध्ये एक गाव एक गणपतीची ही संकल्पना राबविण्यात आली आहे. त्याचबरोबर नळदुर्ग शहरात देखील गणेश भक्तांकडुन ढोल ताशांच्या निनादात वाजत, गाजत व गणपती बाप्पा मोरया चा प्रचंड जयघोष करीत गणरायाचे स्वागत करण्यात आले. दि.७ ते १७ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा होत आहे. दि.७ सप्टेंबर रोजी श्री गणरायांचे नळदुर्ग शहरात गणेश भक्तांनी मोठ्या उत्साहात व जल्लोषात स्वागत केले. सकाळी शहरांतील प्रत्येक हिंदु बांधवांच्या घरात श्री गणरायांची प्रतिष्ठापना करण्यात आली.



त्याचबरोबर शहरातील शिवशाही तरुण गणेश मंडळ, भोईराज गणेश मंडळ, जय हिंद तरुण गणेश मंडळ व्यासनगर, व्यापारी गणेश मंडळ, नव चैतन्य तरुण गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, धर्मवीर संभाजी तरुण गणेश मंडळ, न्यु-चैतन्य तरुण मंडळ, शिवनेरी तरुण गणेश मंडळ, जय हिंद तरुण गणेश मंडळ पोलिस ठाणे,माऊली गणेश मंडळ, वीर महाराणा प्रताप तरुण गणेश मंडळ, जय भवानी तरुण गणेश मंडळ, इंदिरानगर गणेश मंडळ या प्रमुख गणेश मंडळासह जवळपास २० गणेश मंडळांनी सार्वजनिक ठिकाणी श्री गणरायांची प्रतिष्ठापणा केली आहे.

रात्री उशिरापर्यंत श्री गणरायांची प्रतिष्ठापना सुरू होती. वाजत-गाजत तसेच पारंपरीक ढोल व हलग्यांच्या वाद्यात श्री गणरायांचे स्वागत करण्यात आले.

## आलुर येथील व्यापाऱ्यांनी केली व्यापारी महासंघाची स्थापना



**तभा वृत्तसेवा**
**आलुर, दि.८ सप्टेंबर -**

आलुर बाजारपेठ सध्या पंचक्रोशीतील मोठी बाजारपेठ म्हणून नावारुपाला येत आहे. आलुर गावात व्यापाऱ्यांची संख्या जवळपास दोनशेच्यावर आहे. या अनुषंगाने आलुर येथील व्यापाऱ्यांनी केली व्यापारी महासंघाची स्थापना करण्यात आली.

यावेळी व्यापारी महासंघ आलुर या नावाने संघटन करण्याचे ठरले व या संघटनेच्या अध्यक्षपदी सिद्धप्पा ब्याळिकुळ्ळे, उपाध्यक्षपदी कल्याण लाटे, रत्नाकर माने तर सचिव सोमनाथ काशेट्टी, कोषाध्यक्षपदी विजयकुमार बिराजदार यांची एकमताने निवड करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निजाम हुच्चे, संतोष कलशेट्टी, बसवराज लाटे, दिलीप पोतदार, गाजीबक्ष सन्नाटे, महिबूब येनेगुरे, परवेज सौदागर, डॉ. दत्तात्रय पाटिल, बसवराज धमगुंडे, नागेश गणेशकर, श्रीशैल उमशट्टे, मल्लिनाथ नारळे, जब्बार लोहारे या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## परंड्यात खेळ पैठणीचा, सन्मान नारी शक्तीचा कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ सप्टेंबर -**

गौरी-गणपती निमित्त खास लाडक्या बहिणींसाठी सिने अभिनेता क्रांतीनाना मळेगावकर प्रस्तुत व बालगायिका टिव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर प्रस्तुत खेळ पैठणीचा सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून धनंजय सावंत मित्र परिवार परंडा-भुम-वाशी यांच्या वतीने दि.१३ शुक्रवार रोजी परंडा येथील राजवीरा लॉन्स, बावची रोड येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात प्रथम बक्षिस फ्रिज, व्दितीय बक्षिस एलईडी टीव्ही, तृतीय बक्षिस वॉशिंग मशीन, चतुर्थ बक्षीस आटा चक्की, पाचवे बक्षिस शिलाई मशीन असे असणार आहे. तर या खेळ पैठणीचा सन्मान नारी शक्तीचा कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महीला भगिणीस आकर्षक साडी बक्षिस म्हणून देण्यात येणार आहे.

न्यु होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर धुमाकूळ घालणारे टिव्ही फेम बालगायिका सह्याद्री मळेगावकर व सिने अभिनेता क्रांतीनाना मळेगावकर हे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत.

तरी सदरील कार्यक्रमात परंडा-भुम-वाशी तालुक्यातील सर्व लाडक्या महीला भगिणीनी सहभागी होऊन कार्यक्रमाचा लाभ घेऊन शोभा वाढवावी, अशी विनंती धनंजय सावंत मित्र परिवाराकडून करण्यात आली आहे.

## धाराशिवमधील बालविवाह निर्मूलनाची दखल...

# तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

### २१ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणार स्कॉच पुरस्कार प्रदान...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

धाराशिव, बीड जिल्ह्यात बाल विवाह, हुंडाप्रथा आणि स्त्रीभ्रूणहत्या सारख्या अनिष्ठ प्रथा निर्मूलनाकरिता केलेल्या यशस्वी कार्याबद्दल धाराशिव व बीड जिल्ह्याच्या तत्कालीन जिल्हाधिकारी तथा विद्यमान पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ-मुंडे यांना स्कॉच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे वितरण २१ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे.

मराठवाड्यात छुप्या पद्धतीने होणारे बालविवाह रोखण्यात व त्याविषयी जनजागृती करण्यात तत्कालीन जिल्हाधिकारी मुंडे यांचा मोठा वाटा असून त्यांनी अनेक बालविवाह रोखण्यात यश मिळविले होते.



त्या कार्यात त्यांना तत्कालीन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांचीही मोलाची साथ लाभली होती.

त्यांनी केवळ बालविवाह रोखले नसून त्या मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणल्याने त्या मुली आज उच्चशिक्षित बनल्या आहेत. आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणल्याने अनेक मुलींचे आयुष्य घडले.

त्या कार्याची दाखल घेत मुधोळ-मुंडे यांचा या पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. मुधोळ-मुंडे यांनी सामान्य कुटुंब, वाडी, वस्ती, तांडे यावर स्वतः जात बालविवाह रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. शिवाय बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना मार्गदर्शन करीत जिल्ह्यात टास्क फोर्सची निर्मिती करून बालविवाह-एक अभि:शाप या लघुपटाची निर्मिती करून समाजात जनजागृती घडवून आणली.

अशा नानाविध जनजागृती उपक्रम राबविले त्याचे फलित म्हणून अनेक अल्पवयीन मुलींचे विवाह रोखले व त्याच्या आयुष्यात हसू आले. अनेक मुलींच्या आयुष्यात त्यांनी बदल घडविला त्याची दखल यानिमित्ताने घेतली गेली आहे.

आजही बालविवाह हा शब्द जरी कानावर पडला तर तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांचे नाव धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक वाड्यावस्त्यातील सर्वसामान्य नागरिकांत आजही आदराने चर्चिले जाते.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात नरवीर नाईक यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.८ सप्टेंबर -**

भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड (ता.उमरगा) शाळेत आद्यक्रांतीवीर नरवीर उमाजीराजे नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रशालेचे मुख्याध्यापक जयवंत मोरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

यावेळी सहशिक्षक माळी के.बी., जाधव जे.जी., सूर्यवंशी एम.आर., राठोड एन.एच., बिराजदार ए.एस., वडदरे एन.टी., शिक्षकेत्तर कर्मचारी पाटील ए.एस., मोरे पी.बी. व विद्यार्थी उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे शेकडो हेक्टर खरीप पिके पाण्याखाली; शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.८ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर व परिसरामध्ये अतिवृष्टीमुळे शेकडो हेक्टर पिके पाण्याखाली गेल्याने शेक-याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी दिसून येत आहे.

धाराशिव तालुक्यातील तेर व परिसरामध्ये १ ऑगष्ट व १ सप्टेंबरला प्रचंड पाऊस पडल्याने अतिवृष्टी होऊन शेकडो हेक्टर जमीनीवरील खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतक-याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. मोठ्या प्रमाणात खरीप पिकांचे नुकसान झाले आहे.

तेरचे भौगोलिक क्षेत्र ३२४५ हेक्टर असून लागवडी लायक क्षेत्र २९५६ हेक्टर आहे. यामध्ये भात २ हेक्टर, मका २४ हेक्टर, तूर ९५ हेक्टर, मुग १२ हेक्टर, उडीद १२ हेक्टर, भुईमूग ५ हेक्टर, सोयाबीन २५५० हेक्टर, ऊस १३५ हेक्टर, एकूण पेरणी झालेले क्षेत्र २८०५ हेक्टर आहे. तेर व धरणं परीसरात ३१ ऑगष्टला व १ सप्टेंबरला मुसळधार पाऊस पडून अतिवृष्टी झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खरीप पिकांचे नुकसान झाले.

शेतकऱ्यांना नांगरणी, पाळी, पेरणी, कोळपणी, डुबे त्याचबरोबर महागडे बियाणे, महागडे खत, पिकावर विविध प्रकारचे रोग पडल्यामुळे महागड्या औषधांची फवारणी अशा प्रकारच्या प्रचंड खर्चामुळे शेतकऱ्यांचा विविध खर्चामुळे जीव मेटाकुटीला आलेला असताना हातातोंडाशी आलेली खरीपाची पिके अतिवृष्टीमुळे हातची वाया जात असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असून प्रपंच कसा चालवायचा या विवंचनेत शेतकरी वर्ग दिसून येत आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### बोबडे यांचा भाजपच्या वतीने सत्कार
**तुळजापूर दि.८ सप्टेंबर -**
महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण ग्राम समृद्धी योजना धाराशिव जिल्हाधिकारी समितीमध्ये अशासकीय सदस्यपदी निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी तुळजापूरच्या वतीने तालुकाध्यक्ष संतोष बोबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा सरचिटणीस दिपक दादा आलूरे, प्रदेश का. सदस्य प्रभाकर मुळे, जिल्हा चिटणीस, साहेबराव घुगे, बाजार समितीचे संचालक सिध्देश्वर कोरे, प्रशांत लोमटे, आशिष सोनटक्के, दयानंद मुडके, पद्माकर जेवळे, महादेव सालगे, आंगद जाधव, राम जवान, युवराज पाटील, प्रवीण घोडके आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



### बिअरबार संघटनेच्या अध्यक्षपदी समाधान बारकुल, उपाध्यक्षपदी उकरंडे
**येरमाळा, दि.८ सप्टेंबर -**
येरमाळा विभागातील सर्व बिअर बार मालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये येरमाळा विभागातील येरमाळा, तेरखेडा, दहिफळ बिअरबार संघटनेची कार्यकारीणी निश्चीत करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी समाधान बारकुल यांची एकमताने निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी सचिन उकरंडे यांची निवड करण्यात आली. दहिफळ येथील दादा ढवळे यांच्यावर पण उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. येरमाळा येथील जयवंत पलंगे यांची संघटनेच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. साठ सदस्य संख्या असलेल्या या संघटनेतील सर्वांनी नुतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रणजीत बारकुल, बाबा घोलप, संजय बारकुल, तेजस बारकुल, रमेश बारकुल, दत्ता बारकुल, प्रशांत बारकुल, अमरजीत बारकुल, उमेश बारकुल, आबा रूमणे, सतिष पवार, रवि घोलप, आदेश घुले, राजेंद्र घुले, निखील घुले, यांच्या सह सर्व सदस्य उपस्थित होते.



### सावित्रीबाई फुले शाळेत विद्यार्थ्यांनी बनवल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती
**कळंब, दि.८ सप्टेंबर -**
शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यानुभव या विषयांतर्गत मातीच्या वस्तू बनवणे यामध्ये पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. कार्यानुभव विषय शिक्षक ज्ञानेश्वर तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यशाळा घेण्यात आली. गणेश मूर्ती बनवणाऱ्या विद्यार्थी प्राची भवर, दूर्वा माळी, राजनंदिनी माळी, आराध्या राऊत, ज्ञानेश्वरी दीक्षित, दिव्या लोखंडे, आर्या हारकर, संध्या पाटोळे, गौरी ताटे, आरोही कदम, दूर्वा जंत्रे, स्वरा हातोलकर, अनधा गुठाळ, श्रावणी कदम, श्रावणी चोंदे, सई चोंदे, सुशांत कापसे, सोहम बोराडे, राजवीर लोखंडे, अभिनव खामकर, शौर्य कदम, श्लोक माने, शंतनु बारटक्के आधी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



### तेरणा विद्यालयात शिक्षक दिन साजरा
**तेर, दि.८ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील तेरणा विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी तेरणा ट्रस्टचे विश्वस्त बाळासाहेब वाघ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक संतोष गायकवाड हे होते. याप्रसंगी प्रशालेतील ज्येष्ठ सहशिक्षक नंदकुमार खोत यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अच्युत हाजगुडे, सूर्यकांत जाधव, बिभीषण देटे, रमेश लकापते, प्रदीप कोकाटे, सुवर्णा घुटे, सुधाकर चव्हाण, नवनाथ जाधव, निळकंठ लाकाळ, राधाकृष्ण राऊत इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नवनाथ पांचाळ यांनी केले.

### शिवराज कवठे यांचे निधन
**जळकोट, दि.८ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेचे सेवानिवृत्त कर्मचारी शिवराज राचणाप्पा कवठे (वय ६६) यांचे दि.६ सप्टेंबर रोजी सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू असताना निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जळकोट येथील सार्वजनिक स्मशानभूमीत शनिवारी (दि.७) रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, दोन भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## धाराशिव शहरात गणपती बाप्पांचे उत्साहामध्ये आगमन...



**धाराशिव :** गणेशोत्सवानिमित्त धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गणेश मूर्तींच्या खरेदीसाठी तसेच गणेश पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. दहा दिवसांच्या गणेशोत्सवाच्या तयारीच्या निमित्ताने धाराशिव शहरात मोठा उत्साह दिसून आला. यानिमित्ताने गणेश मूर्ती आणि गणेश पूजेच्या साहित्याचे दुकानांनी ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आकर्षक गणेश मूर्ती विक्रीसाठी ठेवलेल्या दिसून आल्या. तर आबाल वृद्धांनी गणेश मूर्तींच्या खरेदीचा मुहूर्त साधत गणरायाची मूर्ती मोठ्या उत्साहात खरेदी करून गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणीत केला. (छाया - किशोर माळी)

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या तेर येथील निवासस्थानी श्री गणेश मूर्तीची स्थापना



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.८ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील निवासस्थानी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी श्री गणेश चतुर्थी निमित्त श्री गणेशाची स्थापना केली.

यावेळी त्यांनी जनसेवेच्या प्रत्येक कार्यात यश यावे ही श्रींच्या चरणी प्रार्थना केली.

यावेळी माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील, पृथ्वीराजसिंह पाटील, नरहरी बडवे, श्री संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पद्माकर फंड, उपसरपंच श्रीमंत फंड, तेर सोसायटीचे चेअरमन सतिष कदम, प्रविण साळुंके, नवनाथ नाईकवाडी, भास्कर माळी, विठ्ठल लामतुरे, भारत नाईकवाडी, नवनाथ इंगळे, बालाजी पांढरे, अजित कदम, गणेश फंड, संजय लोमटे, प्रजोत रसाळ, अर्शाद मुलांनी यांच्यासह तेर महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूरात विघ्नहर्त्याचे उत्साहात आगमन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ सप्टेंबर -**
गणरायाचे आगमन शनिवार दि.७ रोजी पारंपारिक पध्दतीने मोठ्या उत्साहात आगमन झाले. शहरातील काही सार्वजनिक गणेश मंडळांनी मिरवणूक काढुन तर काही मंडळांनी साधेपणाने श्रीगणेश मुर्तीची प्रतिष्ठापना केली.

श्री तुळजाभवानी मंदीरात प्रशासकीय व्यवस्थापक तथा तहसिलदार माया माने यांच्या हस्ते धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक सिध्देश्वर इंतुले, संतोष भिंके, विश्वास परमेश्वर आदमाने, यांच्यासह मंदीर, अधिकारी, कर्मचारी भाविक यांच्या उपस्थितीत श्रीगणेश मुर्ती प्रतिष्ठापना केली. राजाकंपनी गणेश मंडळाच्या श्रीगणेश मुर्तीची प्रतिष्ठापना माजी नगराध्यक्ष श्री व सौ सचीन रोचकरींच्या हस्ते करण्यात आले.

## भारत विद्यालयात पर्यावरण पूरक गणपतीची निर्मिती

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ सप्टेंबर -**
भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित भारत विद्यालय प्राथमिक विभाग, उमरगा शाळेमध्ये पर्यावरण पूरक गणपतीची निर्मिती करण्यात आली.

मातीपासून गणपतीच्या सुंदर मूर्ती बनविता येते. या मूर्ती पाण्यात अगदी सहजपणे विरघळतात. या मूर्तींना रंगविण्यासाठी नैसर्गिक रंगांचा वापर केला जातो.

इकोफ्रेंडली गणपती तयार करताना कागद, टिश्यूपेपर, माती, वॉटरकलर, भाज्यांपासून तयार केलेले रंग, डिंकापासून बनविलेला गम, कापड इत्यादी साहित्य लागते. त्यामुळे पर्यावरण संरक्षण हा संदेश जातो. कमी वयात याचे महत्व पटवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दासिमे डी.व्ही. व डांगे, माचे, सोमवंशी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

## येरमाळ्यात गणेशोत्सवानिमित्त आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.८ सप्टेंबर -**
श्री गणेश आगमनानिमित्त येरमाळ्यातील श्री नृसिंह गणेश मंडळ व डॉक्टर, केमिस्ट असोसिएशनच्या वतीने येडेश्वरी हॉस्पिटल येथे गणेशोत्सव काळातील कार्यक्रम पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे पदाधिकारी गावातील सर्व डॉक्टर व केमिस्ट उपस्थित होते.

यावेळी आरोग्य शिबीर आयोजनावर चर्चा झाली. श्री नृसिंह गणेश मंडळ दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपत समाज उपयोगी विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन गणेशोत्सव साजरा करते. मंडळाच्या उत्सवकाळातील कार्यक्रम पत्रिकेचे प्रकाशन प्राथमिक आरोग्य केंद्र व पोलीस ठाण्यात करण्यात आले. श्री नृसिंह गणेश मंडळाचे हे अकरावे वर्ष आहे.

शनिवारी झालेल्या बैठकीला गावातील सर्व डॉक्टर व केमिस्ट, पत्रकार, मंडळाचे पदाधिकारी उपास्थित होते. गणेश मंडळाच्या उत्सव काळात पुढील प्रमाणे कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे.

शनिवारी (ता.सात) ढोल ताशाच्या गजरात गणरायाचे आगमन व प्राणप्रतिष्ठापना, सोमवारी (ता.नऊ) उमेश काशीद बार्शी यांचे सुश्राव्य व्याख्यान, मंगळवारी (ता.१०) लहान मुलांच्या विविध स्पर्धाचे जि.प. शाळेत शाळेच्या वेळेत घेण्यात येतील. बुधवारी (ता.११) आराधी मंडळाच्या देवीच्या गाण्याचे आयोजन बाजार चौक, येथे सायं.७ वा. केले आहे. गुरुवारी (ता.१२) सकाळी ९ ते दु. ४ बाजार चौकात भव्य आरोग्य तपासणी शिबिर डॉक्टर व केमिस्ट संघटना यांच्या वतीने याच दिवशी रक्तदान शिबीर घेता येईल का यावर वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन तेलप यांनी सुचनेवरुन चर्चा झाली. गुरुवारी (ता.१२) खास महिलांचा कार्यक्रम होम मिनिस्टर भरपूर बक्षिसांचा कार्यक्रम घेतला जाणार आहे. शनिवारी (ता.१३) विविध शाळेतील इयत्ता ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परिक्षा, रविवारी (ता.१५) बाजार चौकात

रात्री ८ वा. लहान मुला मुलींच्या भव्य डान्स स्पर्धा तर सोमवारी (ता.१७) सांस्कृतिक कार्यक्रम ढोल, ताशाच्या गणरायाला निरोपपाची बाजार चौकातून भव्य गणेश विसर्जन मिरवणूक होईल.

## वागदरी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी राजकुमार पवार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.८ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात विविध विषयांवर ग्रामसभा पार पडली.

या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्षपदी राजकुमार रावण पवार तर उपाध्यक्षपदी मदन राजेंद्र पाटील यांची एकमताने फेरनिवड करण्यात आली.

सरपंच तेजाबाई मिटकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच ग्रामसभा घेण्यात आली. या ग्राम सभेत विविध विषयांवर चर्चा करून ठराव सहमत करण्यात आले.

## कदेर जिल्हा परिषद शाळेमध्ये शौचालयाअभावी विद्यार्थ्यांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.८ सप्टेंबर -**
उमरगा तालुक्यातील कदेर गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये लहान मुलांसाठी आणि मुलींसाठी बाथरूम आणि पान्याची व्यवस्था नाही. त्यामुळे लहान मुलांना बाथरुमला जाणे आवघड जात आहे.

शाळेमध्ये महिला शिक्षिका व शिक्षक यांना सुधा बाथरुमची व्यवस्था नाही. वारंवार माहिती देऊन तक्रारी करून सुधा यावरती शालेय समिती आणि प्रशासन हे काहीच उपाय करत नाहीत. वाढत्या महिला व लहान मुलीवरील अत्याचराविरोधात हजारो मोर्चे निघत आहेत. त्यात अशा सरकारी शाळेमध्ये मुलींसाठी बाथरुम नाहीत.

सर्व मुले मुली आणि शिक्षक हे उघड्यावर जायचं का? हा प्रश्न सर्वांना पडला आहे. शाळेला कंपाऊंड नाही ना व्यवस्थित गेट अशा विविध कारणामुळे जिल्हा परिषद शाळेचा पटसंख्या कमी होत जात आहेत.

यावरती प्रशासन काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हिंदु-मुस्लिम बांधवांनी सण शांततेत साजरे करावेत : गौहर हसन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**
आगामी काळात साजरा होणारा गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे दोन्ही उत्सव हिंदु-मुस्लिम बांधवानी शांततेत साजरे करून पोलिस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन धाराशिव जिल्ह्याचे अप्पर पोलिस अधीक्षक गौहर हसन यांनी नळदुर्ग येथे गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद निमित्त नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने आयोजित केलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत बोलतांना केले.

दि. ६ सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद निमित्त शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलिस अधीक्षक गौहर हसन हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार हे उपस्थित होते.





या बैठकीस कमलाकर चव्हाण, शहेबाज काझी, मुश्ताक कुरेशी नय्यर जागीरदार, शफिभाई शेख, बसवराज धरणे, शब्बीर कुरेशी, इमाम शेख, हाफेज सय्यद, मैनोद्दीन जागीरदार, हाफेज सय्यद नियमातुल्ला इनामदार, हाफेज फारुख शेख, सुधीर हजारे, सरदारसिंग ठाकुर, संतोष पुदाले, सुनिल उ्कंडे, शिवाजी गायकवाड, तलाठी विश्वास वायचळ यांच्यासह वीज वितरण कंपनीचे कर्मचारी, पदाधिकारी व नागरीक उपस्थित होते.

# ३० एप्रिलचे परिपत्रक रद्द करून स्पष्टता आणा

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**
कृषी प्रदर्शनात परळी येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी शब्द दिल्याप्रमाणे दिल्ली येथे बैठक घेऊन ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रक रद्द करून स्पष्टता आणावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

२१ ऑगस्ट रोजी परळी येथे झालेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात देशाचे कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी ३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक रद्द करण्यासंदर्भात दिल्ली येथे बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मात्र पंधरा दिवस लोटूनही अद्यापपर्यंत या बाबतीत साधी बैठक देखील झाली नाही. ती तातडीने घ्यावी, अशी विनंती ई-मेल निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी केली आहे. लोकसभा आचारसंहितेच्या कालखंड ३० एप्रिल रोजी परिपत्रक काढल्याने धाराशिव जिल्ह्यातील पाच लाख १९ हजार शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २०००० रुपयांचा फटका बसला असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ९०० कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे. हे परिपत्रक केवळ धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांवरच नव्हे तर महाराष्ट्रातील ७५ टक्के शेतकऱ्यावर अन्याय करणारे असल्याने ते तातडीने रद्द व्हावे यासाठी आता आंदोलने सुरू झाली आहे. मात्र शासन याबाबत कुठलीही गतिमानता दाखवत नाही.

मुख्यमंत्री यांनी पुढाकार घेऊन दिल्ली येथे बैठक घेऊन परिपत्रक रद्द करावे, अशी विनंती देखील अनिल जगताप यांनी केली आहे. परिपत्रक गेल्यावर्षीचे मात्र यावर्षी देखील शेतकऱ्यांमध्ये संभ्रम अवस्था कृषी विभागाने पुढाकार घेऊन स्पष्टता आणावी.

गेल्या वर्षी काढलेले परिपत्रक हे केवळ खरीप २०२३ साठीच लागू केलेले होते. मात्र त्यात अद्यापही स्पष्टता आलेली नाही तेच परिपत्रक केंद्रशासन पुढे चालू ठेवते की काय अशी भीती आता शेतकऱ्यांना वाटत आहे. १५ सप्टेंबर हा वैयक्तिक नुकसानीच्या पूर्व सूचना देण्याचा अंतिम कालावधी असून त्यापूर्वी पूर्व सूचना द्यायच्या का नाही त्या २५ टक्क्यापेक्षा जास्त झाल्या तर महसूल मंडळांना केवळ पाच-सहा हजार रुपये इतकीच हेक्टरी मदत मिळेल या भीती खाली शेतकरी वावरत असून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम अवस्था आहे.

खरंतर कृषी विभागाने पुढाकार घेऊन कृषी आयुक्तालय व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून मार्गदर्शन घेऊन या परिपत्रकासंदर्भात स्पष्टता आणणे आवश्यक असताना कुठलीही कृती होत नाही, असेही जगताप यांनी म्हटले आहे.



केंद्रीय कृषिमंत्र्यांनी घोषणा करून पंधरा दिवस लोटूनही साधी बैठक झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे नुकसान होत आहे तसेच चालू वर्षी देखील हे परिपत्रक राहते की काय? अशी भीती शेतकऱ्याच्या मनात आहे. तातडीने ३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक रद्द झालेच पाहिजे. शासनाने किमान यात तरी गतिमानता दाखवावी एवढीच माफक अपेक्षा आहे.

**- अनिल जगताप, पिक विमा याचिकाकर्ते**

# श्री गणेश उत्सव कालावधीत डॉल्बी सिस्टीम वापरास प्रतिबंध

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०८ सप्टेंबर-**

जिल्ह्यात श्री गणेश उत्सव ७ ते १९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत डॉल्बी सिस्टीम मालक, चालक, इतर कोणत्याही व्यक्तीस डॉल्बी सिस्टीम वापरात , चालविण्यास भारतीय सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी काढला आहे.



जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार ७ ते १९ सप्टेंबर रोजी श्रीचे विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत नांदेड जिल्ह्यात कोणत्याही डॉल्बी मालक, चालक, गणेश मंडळाचे पदाधिकारी यांनी त्यांचे कब्जातील डॉल्बी सिस्टीम वापरात, उपयोगात आण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या डॉल्बी मशीन व यंत्रसामुग्री संबंधितांनी स्वत:चे कब्जात सिलबंद स्थितीत ठेवावी. हा आदेश ७ रोजीच्या मध्यरात्रीपासून ते १९ सप्टेंबर २०२४ रोजी २४ वाजेपर्यंत श्रीचे विसर्जन होईपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहील,

डॉल्बीचे आवाजामुळे व कंपनामुळे लहान मुले, वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला तसेच आजारी व सामान्य नागरीक यांच्या कानास, ऱ्हदयास आरोग्यास,जिवितास धोका होण्याची तसेच सामाजिक स्वास्थ बिघडण्यास व मालमत्तेस हानी पोहचण्याची शक्यता असल्याने सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेस बाधा उत्पन्न होण्याची शक्यता असल्याने गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये डॉल्बी मालक, चालक यांचेवर बंदी घालण्यात आली आहे. असेही आदेशात नमुद केले आहे.

# निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन आदिवासी समाजात फूट पाडण्याचे विरोधकांचे षडयंत्र

## भाजपाचे जिल्हा संयोजक गोविंद अंकुरवाड यांनी साधला विरोधकांवर निशाणा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ०८ सप्टेंबर-**

आगामी विधानसभा निवडणुकित विकासकामांच्या मुद्यावरून आपण भाजपासी लढत देऊ शकत नाही याची जाणीव झाल्याने विरोधकांनी आता आदिवासी समाजामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करत फूट पाडण्याचे प्रयत्न चालविले आहेत. परंतु मागील ३०-४० वर्षाचा इतिहास बघितला तर या मतदारसंघातील आदिवासी समाज एकसंधपणे आमदार भीमराव केराम यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला आहे आणि याची प्रचिती प्रत्येक निवडणुकीत सर्वांनाच आली आहे.आगामी निवडणूकितहि विरोधकांचे धूर्त डावपेच कदापिही यशस्वी होणार नाहीत. आ भीमराव केराम यांच्या विकासाची आणि विजयाची घोडदौड थांबणार नाही असा दृढविश्वास भाजपाचे जिल्हा संयोजक गोविंदराव अंकुरवाड यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना व्यक्त केला आहे.




दीपावली सणाच्या मागेपुढे राज्यात विधानसभा निवडणुकीचा बार उडण्याची शक्यता असून त्या दृष्टीने भारतीय जनता पक्षाकडून सध्या किनवट माहूर विधानसभा मतदारसंघात पक्षसंघटनात्मक बांधणी जोमाने सुरू आहे.नांदेड जिल्हा संयोजक गोविंद अंकुरवाड हे पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन जिल्ह्यातील विधानसभानिहाय दौरे करत आहेत. आदिवासीबहुल किनवट मतदार संघाच्या दौऱ्यावर आल्यानंतर त्यांनी दैनिक तरुण भारतशी बातचीत केली.ते म्हणाले की आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विरोधक व त्यांचे चेलेचपाटे आदिवासी समाजामध्ये संभ्रम निर्माण करून फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु आदिवासी समाज जागृत आहे.विरोधकांच्या षडयंत्राला ते कदापिही बळी पडणार नाहीत याची आम्हाला खात्री आहे. सर्वसमावेशक राजकारण व निस्वार्थ सामाजिक कार्यामुळे गेल्या ४० वर्षापासून आदिवासी समाज एकसंधपणे आमदार भीमराव केराम यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे. आणि याची प्रचिती प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना दिसून आलेली आहे. आदिवासी समाजाच्या जाती प्रमाणपत्राचा मुद्दा असो, विद्यार्थ्यांच्या समस्या असो अथवा सामाजिक अन्याय अत्याचाराच्या घटना असो प्रत्येक वेळी आमदार भीमराव केराम यांनी समाजाच्या हितासाठी शासन व प्रशासनाच्या विरोधात उघड भूमिका घेऊन रस्त्यावरचा संघर्ष केला आहे.आमदार म्हणून निवडून आल्यानंत दुर्दैवाने कोरोनात दोन वर्षे गेली त्यानंतर काही महिने त्यांना तब्येतीने साथ दिली. प्रत्यक्ष काम करण्यासाठी त्यांना जेमतेम दोन वर्षे मिळाले. परंतु या अल्प काळात त्यांनी संधीचे सोने करून दाखविले. रस्ते, आरोग्य, सिंचनाचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न गेल्या दोनच वर्षात कायमस्वरूपी मार्गी लागून किनवट माहूर तालुक्याचा कायापालट झाला.गेल्या पंधरा वर्षाच्या विकासाचा अनुशेष मागच्या दोन वर्षात भरून निघाला हे जळजळीत वास्तव विरोधकांना अस्वस्थ करत असल्याची बोचारी टीका अंकुरवाड यांनी केली.आ. भीमराव केराम यांना

रोखण्याचा आता कोणताही विधायक मार्ग शिल्लक राहिला नाही त्यामुळे विरोधकांनी आदिवासी समाजाला टार्गेट करणे सुरू केले परंतु विरोधकांचा हा डाव आदिवासी समाज पूर्णतः ओळखून आहे. त्यामुळे आमदार भीमराव केराम यांची विकासाची आणि विजयाची घोडदौड कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास गोविंद अंकुरवाड यांनी व्यक्त केला. याप्रसंगी त्यांच्यासमवेत बोधडी बु चे सरपंच बालाजी भिसे, गंगाधर प्रचाके, बामणांजी मेटकर, भगवान हुरदुखे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांना पुरस्कार

**नांदेड** - जांब येथील रहिवासी तथा महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील मुखेड येथील समाजशास्त्र विभागातील प्रा.डॉ. संग्राम आंदे यांना २०२४ चा माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन महाराष्ट्रकडून राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी अनेक ग्रंथ, अग्रलेखाचे लिखाण केले असून अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, विविध विषयावर व्याख्यान, संशोधनात्मक लिखाण, अमेरिकन डि लीट हे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आहे. त्यांच्या पुरस्काराबद्दल फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अडकिणे, प्राचार्य गोणे, प्राचार्य मस्के, प्रा. आहेर, प्रा. गायकवाड, प्रा. नेटकेसह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.



### विचार विकास परिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शिक्षकांचा सन्मान

**लोहा** - विचार विकास परिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था माळाकोळी तालुका. लोहा च्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून रवींद्रनाथ टागोर इंग्लिश स्कूल या संस्थेच्या वतीने शिक्षकांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त प्रमुख मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे ,सचिव अनिल ढवळे संस्थेचे सहसचिव रघुनाथ धारबा मस्के हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव तथा पत्रकार विनोद मस्के यांनी प्रास्ताविक यांनी केले कार्यक्रमाचे अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे , सचिव अनिल ढवळे, प्राचार्य, श्यामसुंदर कोमले , उपप्राचार्य अर्चना हणमंते यांचा सत्कार करण्यात आला. सहसचिव रघुनाथ मस्के यांच्या हस्ते शिक्षक , सोमनाथ उल्लागडे,शिलरत्न कांबळे, शिक्षिका गोदावरी घुगे , शिल्पा पेटकर, संध्या वाघमारे, प्रियंका बयास,गिता पांचाळ, भगवान मस्के यांचा सत्कार केला.

### रामगिरी महाराज व आ. नितेश राणे यांच्या वक्तव्याचा भोकर येथे निषेध


**भोकर**-पैगंबर हुजूर मोहम्मद सल्लल्लाहू अलेही वसल्लम यांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य करून धार्मीक तेढ निर्माण करणाऱ्या रामगीरी महाराज व आ.नितेश राणे यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी व केद्र सरकारच्या वक्फ बिलाच्या विरोधात सकल मुस्लिम समाज भोकर च्या वतिने भोकर उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर धरने आंदोलन करण्यात आले मौजे पंचाळे तालुका सिन्नर जिल्हा नाशिक या ठिकाणी सुरू असलेल्या सप्ताह चे प्रवचन चालू असताना उपस्थित लोकसमक्ष थेट प्रक्षेपण असताना रामगिरी महाराज यांनी मुस्लिम धर्मियां बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. तसेच आ.राणे मुस्लिमा विषयी आक्षेपार्ह वक्तव्य करत आहेत या घटनेचा निषेध करण्यासाठी सकल मुस्लिम समाज भोकरच्या वतीने दिनांक ६ सप्टेंबर रोजी मूस्लीम व्यापारी आपली दूकाने बंद ठेवून निषेध नोंदविला व उपविभागीय अधिकारी कार्यलया समोर धरने आंदोलन करण्यात आले आंदोलनात मौलाना रिजवानोद्दीन साहब, मुफ्ती मौलाना खुर्शीद अहमद , हाफेज उमर फारूक,मौलाना जुबेर, हाफिज शमशाद, मौलाना मुबीन खॉन इनामदार आदींनी आपले विचार मांडून रामगिरी महाराज व नितेश राणे यांच्या वक्तव्याचा निषेध केला. यावेळी मौलाना रिजवान सरवरी, मौलाना आमेर, मौलाना खालेद, मौलाना इमरान नदवी, हाफेज आमेर, हाफेज फैजान, हाफेज फुरखॉन, मौलाना फहिमोद्दीन, मौलाना निजाम, मौलाना हाफेज अकबर, मौलाना सुजाओद्दीन, मौलाना जमील, मौलाना मस्लियोद्दीनसह आदीसहमुस्लिम धर्मगुरु उपस्थित होते.

### पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांचा दौरा

**नांदेड**-राज्याचे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील हे नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सोमवार ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ७.२० वाजता राज्यराणी एक्सप्रेसने मनमाड येथून नांदेड रेल्वे स्टेशन येथे आगमन. सकाळी ७.४० वाजता शासकीय निवासस्थान नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.५० वाजता शासकीय निवासस्थान नांदेड येथून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेडकडे प्रयाण. सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आगमन व आढावा बैठकीस उपस्थिती. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालस येथून मौजे कासारखेडा, आलेगाव व निळा ता. नांदेडकडे प्रयाण व या गावातील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी. दुपारी १२.३० ता. वसमत जि. हिंगोलीकडे प्रयाण करतील.

### सुधाकर सूर्यवंशी यांचा शिवसेना उबाठा गटाला राम राम

**मुदखेड**-शिवसेना उबाठा गटाचे मुदखेड शहर संघटक सुधाकर सूर्यवंशी यांनी आपल्या पदाचा राजीनामा जिल्हाध्यक्ष बबन बारसे यांना देऊन भाजपात प्रवेश केला.नवीन पक्षात आलेल्या लोकांना पद दिले जात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना पक्षात एकनिष्ठ पणे काम करणाऱ्यावर अन्याय होत आहे. हा अन्याय किती दिवस सहन करायचा तालुक्यातील तालुका प्रमुख व जिल्हा प्रमुख यांचा भोकर मतदारसंघकडे व मुदखेड शहराकडे लक्ष नसून यांनी फक्त निष्ठावंत कार्यकर्त्यांचा आजपर्यंत वापर करून घेतला आहे. यांच्या एकाधिकार शाहिला कंटाळून शिवसेना उबाठा गटाला राम राम करीत भाजपात जाणार असल्याची माहिती सुधाकर सूर्यवंशी यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.



# डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा : पो.नि. नागनाथ आयलाने

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ०८ सप्टेंबर-**

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव व नवरात्र महोत्सव साजरा करीत असताना जयंती मंडळांनी डीजे मुक्त मिरवणूक काढून रामपारींक वाद्याच्या गजरात उत्सव साजरे करावे असे आव्हान दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीस ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी गणेश मंडळ व पोलीस पाटील सामाजिक कार्यकर्ते यांना या बैठकीदरम्यान संबोधन केले. नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे दिनांक ६ ऑगस्ट रोजी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली या बैठकीत आगामी काळात येणारे सर्वच उत्सव गणेश महोत्सव , नवरात्र महोउत्सव साजरे करत असताना डीजे मुक्त मिरवणूक काढून पारंपारिक वाद्याच्या गजरात गणेश उत्सव व नवरात्र महोत्सव साजरा करण्यात यावा अन्यथा कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचे काम कोणत्याही गणेश मंडळ



करीत असेल तर त्यावर आम्ही कायद्याने गुन्हे दाखल करू असे या बैठकीस ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलानी यांनी सूचना दिली. यावेळी व्यासपीठावर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार काशिनाथ डांगे, राज्यमार्ग परिवहन विभागाचे केशव जावळे, अच्युत भातलोंडे, सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड ,अग्निशमन दलाचे अधिकारी दिनानाथ गायकवाड यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गडवे यांनी केले.यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. याचवेळी यावर्षी ज्या मंडळांनी सजीव व सुंदर देखावे, प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून जनतेस चांगला संदेश देणाऱ्या गणेश मंडळास ५ हजार रुपये बक्षीस पोलीस निरीक्षक नागनाथ आयलानी यांनी स्वतः देण्याचे जाहीर केले आहे.

# अवैध गुटखा विक्री करणाऱ्यावर मुदखेड पोलिसांची कारवाइ

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ०८ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मुदखेड शहरात ही दोन ठिकाणी धाड टाकली असता या धाडीत अवैध गुटखा व सुगंधित जर्दा असा एकूण ५८५० रुपयांचा मुद्दे माल जप्त करण्यात आला व दोघांना अटकही करण्यात आली ही धाड शहरातील रेल्वे गेट लगत असलेल्या पान टपरीवर धाड टाकली असता हा मुद्दे माल सापडला. ही धाड पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशाने व पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक बी.आर. कांबळे बलवीरसिंह ठाकूर, चंद्रशेखर मुंडे, विनायक मठपती, हेड कॉन्स्टेबल गंगाधर शिंदे, दिलीप चक्रधर, शेख नसरीन, आशा गोडबोले यांनी केली.

### निकिता सुभाष सावते यांचे निधन

**मुदखेड**-नांदेड येथील चैतन्य नगर येथील रहिवासी निकिता सुभाष सावते यांचे उपचारादरम्यान दि.६ सप्टेंबर रोजी दीर्घकाळ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय २५ होते. मुदखेड नगरपरिषदेचे अभियंता सुशील खिल्लारे यांची ते भाची होत्या.



# विविध मागण्यासाठी सोनखेड येथे शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, ०८ सप्टेंबर-**

येथील शेतकरी नेते लक्ष्मण मोरे यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्यासाठी शेतकऱ्यांनी आज दि. ८ सप्टेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाला परीसरातील हजारो शेतकरी बंधू उपस्थित होते.

गेली बरीच दिवसापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणारे नांदेड जिल्ह्यातील युवा शेतकरी नेतृत्व लक्ष्मण मोरे यांनी रविकांत तुपकर यांच्या उपोषणाला पाठिंबा देत दि.८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३०.वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सोयाबीनलस ९ हजार रुपये हजार रुपये भाव द्यावा, कापसाला १२ हजार रूपये भाव देवून संपूर्ण कर्ज मुक्ती करत सातबारा कोरा करावा, ऑनलाईन न करता सरसकट शंभर टक्के पिक विमा देऊन ओला दुष्काळ



जाहिर करावा या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या मागण्या सरकारने मान्य नाही केल्यास जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा घेऊन येऊ असा इशारा यावेळी बोलतांना लक्ष्मण मोरे व शेतकरी बांधवांनी दिला आहे. या आंदोलनाला सरपंच अच्युत मोरे, बाळासाहेब जाधव, अंगद पाटील, बालाजी दिघे, सत्यवान किरवले, ऋषी वानखेडे, नितीन पाटील कोकाटे, लक्ष्मण चव्हाण, शंकर मोरे, माणिक मोरे, द्यानोबा मोरे, गजानन मोरे, शिवाजी किरकान, अविनाश मोरे, अक्षय मोरे, निवास मोरे, ओम वरळे, बाबुराव कोल्हे, पवन घटोळ, विजय देशमुख या सह परिसरातील हजारो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# जी. डी. गोयंका हेल्थकेअर अकॅडमीच्या नवीन केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०८ सप्टेंबर-**

जी. डी. गोएंका हेल्थकेअर हेल्थकेअर अकॅडमी, होलिस्टिक हेल्थकेअर सोल्यूशन्सची भारतातील आघाडीवर असणारी अकॅडमी आहे आणि आरोग्य सेवा इकोसिस्टमला अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने भारतातील शिक्षण प्रदात्यांनी नांदेड, महाराष्ट्र येथे पॅरामेडिकल आणि अलाईड हेल्थकेअर कोर्सेस सुरू करण्याची घोषणा करण्यात आली असुन नांदेड येथील केंद्राचे आज दि. ८ सप्टेंबर रोजी कल्याणकर कॉम्प्लेक्स, मालेगाव रोड, तरोडा नाका येथे संत बाबा कुलवंतसिंघजी, संत बाबा बलवंतसिंघजी यांच्या हस्ते अकॅडमीची सुरवात करण्यात आली.यावेळी भाजपा महानगराध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे यांची उपस्थिती होती.



दहावी, बारावीनंतर किंवा पदवीनंतरही पॅरामेडिक्स आणि संबंधित आरोग्यसेवा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरणारी जी डी गोयंका हेल्थकेअर अकॅडमी वैयक्तिक गरजा, कौशल्ये आणि शैक्षणिक प्राधान्यांनुसार अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणार आहे. प्रारंभिक टप्प्यातील ऑफरिंगचा एक भाग म्हणून, अकॅडमी वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कार्डियाक केअर तंत्रज्ञ, आपत्कालीन वैद्यकीय तंत्रज्ञ - पॅरामेडिक, रेडिओलॉजी तंत्रज्ञ, एक्स रे तंत्रज्ञ आणि ऑपरेशन थिएटर तंत्रज्ञ आणि रेडिओलॉजी तंत्रज्ञ. B.VOC आणि M.VOC (बॅचलर ऑफ व्होकेशन आणि मास्टर ऑफ व्होकेशन कोर्सेस) प्रमाणपत्र कार्यक्रमांमध्ये समाविष्ट आहे इमर्जन्सी मेडिकल टेक्निशियन बेसिक, मेडिकल नर्सिंग असिस्टंट, पेशंट्स रिलेशन असोसिएट, फ्लेबोटॉमी टेक्निशियन कोर्स इ. निवडलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारावर, प्रात्यक्षिक सत्रे अकॅडमीच्या अत्याधुनिक प्रयोगशाळेत हॅंड-ऑन प्रॅक्टिकल प्रशिक्षणासह आयोजित केली जातील. विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाचा भाग म्हणून स्थानिक प्रदेश आणि इतर क्षेत्रातील आघाडीच्या आरोग्य सुविधांमध्ये क्लिनिकल इंटर्नशिपच्या स्वरूपात क्लिनिकल एक्सपोजरची संधी देखील मिळेल. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या निवडलेल्या डोमेनमध्ये गुणवत्ता राखण्यासाठी उत्तम अनुभवी प्राध्यापक आणि डचए चे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी डॉ. राहुल राचेवाड, डॉ. समीर कोटलवार, डॉ. आरेफ एम. सय्यद, संचालक ओम. एस. मालीवाल, अहेमद रिझवानउल्लाह, डॉ. केदारनाथ देशमुख, डॉ. सचिन सिंघल, जसपालसिंघ कोल्हापुरे, डॉ. महेश काबरा, डॉ. विपीन सोमानी यांची उपस्थिती होती.

# देगलुर उपजिल्हा रुग्णालयात पाच महिन्यांत तब्बल ४२० शस्त्रक्रिया

## डॉ. देवनीकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ०८ सप्टेंबर-**

शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे एप्रिल ते सप्टेंबर या पाच महिन्यांच्या कालावधीत विविध प्रकारच्या तब्बल ४२० शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय हे रुग्णांसाठी वरदान ठरले आहे. आरोग्यविषयक निकषानुसारही उपजिल्हा रुग्णालय, देगलूर हे सध्या जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर पोहोचले आहे.

कुटुंबनियोजन स्त्री शस्त्रक्रिया १९५, गरोदर मातेवरील सिझेरियन शस्त्रक्रिया ३७, डोळ्याच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया १३७, हायड्रोसिल शस्त्रक्रिया १४, हर्निया शस्त्रक्रिया १४, इतर मायनर गाठीच्या शस्त्रक्रिया २२, अपेंडिक्स शस्त्रक्रिया १४, छातीवरची गाठ ३ असे एकूण जवळपास ४२० शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. यासह सिटीस्कॅन २९४९ व वर्षभरात एकूण ७४८८, गरोदर मातेच्या सोनोग्राफी २१६, नैसर्गिक प्रसूती ४१५ त्यामध्ये जुळे दोन प्रसूती, बाह्य रुग्ण विभाग (ओपीडी) ५३८०६ इत्यादी रुग्णांनी उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे लाभ घेतला आहे. मात्र ५० रुग्णांची संख्या वाढली खाटांच्या देगलूरच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये दिवसेंदिवस आंतर रुग्णांची वाढती संख्या पाहता येथे १०० खाटांचे रुग्णालय करणे अत्यंत गरजेचे बनले आहे. उपजिल्हा रुग्णालय फक्त शोभेची वस्तू बनून राहिली होती. मात्र वैद्यकीय अधीक्षक म्हणून डॉ. नरेश देवणीकर यांनी पदभार स्वीकारला. तेव्हापासून रुग्णांवर रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जात आहेत.

# चित्रकार वर्मा यांच्या प्रात्यक्षिकाने चिमुकले विद्यार्थी भारावले !

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, ०७ सप्टेंबर-**

पी.एम.श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय ता.बिलोली जि.नांदेड (शंकरनगर) येथे दि. १ ते ३१ऑगस्ट २०२४ पर्यंत 'आर्ट इन एज्युकेशन व्हिज्युअलआर्ट (२ऊ/३ऊ) फोक आर्ट रिवाइवल वर्कशॉप' चे आयोजन करण्यात आले होते. सदर एक महिन्याच्या कला कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी नागरीकरण न झालेल्या म्हणजे आदिवासी आणि ग्रामीण जीवनातील कलेसाठी लोककला ही संज्ञा योजिली जाते,प्रामुख्याने महाराष्ट्रातील वारली चित्र, गोंड चित्र, मधुबनी चित्र यांचा समावेश होतो. या लोककलांचा वापर करून विवीध सुंदर चित्र साकारत त्याचे प्रदर्शन दि. ५|९|२०२४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून करण्यात आले होते.

या प्रदर्शनाच्या समापन सोहळ्याच्या आयोजन प्रसंगी ज.न. वि. चे प्राचार्य सुहास मांडले यांनी माहूर येथील प्रसिध्द चित्रकार रणजीत दत्त वर्मा यांना व्दियार्थी मार्गदर्शन तथा निसर्गचित्रणाच्या प्रात्यक्षिकासाठी पाचारण केले होते. निसर्ग चित्रणात चित्रकार वर्मा यांनी पावसाळी आभास निर्माण करत चित्र पूर्ण केले हे बघून विद्यार्थी व पालक भारावून गेले होते. यापूर्वीही अनेक ठिकाणी वर्मा यांची प्रात्यक्षिके झाली आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सुव्यवस्थित आयोजन ज न.वि.चे कलाशिक्षक तथा प्रसिद्ध चित्रकार आनंद माळी यांनी केले होते.एक महिन्याच्या अखंड परिश्रमाचे फळ विद्यार्थ्यांच्या चित्र प्रदर्शनातून दिसून येत होते.याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून पूज्य साने गुरुजी विद्यामंदिर,देगाव येथील कला शिक्षक दिलीप रणवीरकर उपस्थित होते. प्रदर्शनातील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलाशिक्षक आनंद माळी तर आभार प्राचार्य सुहास मांडले यांनी मानले. या सोबतच चित्रकार वर्मा यांच्या कलाकृती श्री बजरंग गणेशोत्सव मंडळ, अमरावती यांनी आयोजित केलेल्या अंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सद्या झळकत आहेत. या प्रदर्शनाचे नियोजन सारंग नागठाणे, श्री आर्ट कला वर्ग व कला निर्मीती, अमरावती यांनी केले असून, नांदेड चे प्रसिद्ध चित्रकार आनंद माली, सुनिता चालीकवार (गंजेवार) विलास गोपाळे, सुर्यकांत जाधव,स्वाती नेताम यांचा ही समावेश आहे. वर्मा यांच्या या दुहेरी यशाबद्दल माहूरचे तहसिलदार किशोर यादव, गट शिक्षणाधिकारी श्रीकृष्णा भराडीया,म.प्रा.शि. प. तालुकाध्यक्ष शेषराव पाटील, केंद्र प्रमुख संतोष चव्हाण, शिक्षक भारती तालुकाध्यक्ष अरविंद जाधव धनंजय गिऱ्हे यासह अनेकांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास अनेक कार्यकर्त्यांचा शेकाप मध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ०८ सप्टेंबर-**

आ. श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून उमरा सर्कल मधील माजी सरपंच आनंदराव वाघमारे ,पोलीस पाटील बाबाराव पा.सिरसाट मुकदम ,विनायक पां. सिरसाट, ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील ,मुबीन शेख ग्रा.पं.सदस्य, दिनाजी गवाले, बालाजी पा.शिंदे, शैलेश पा.शिरसाट, विकास पा.शिंदे, सोपान पा.वडजे, माधव पा.सिरसाट, किरण पा. सिरसाट, गंगाधर पवार, शंकर पा. बोडके, लक्ष्मण शिरसाट, किशन सिरसाट, ज्ञानेश्वर पा. सिरसाट, बालाजी पा.भरकडे, मनोहर पा.शिरसाट, सुरेश पा. सिरसाट, आनंदा पांचाळ, आनंद वरपडे, रावसाहेब पा. शिंदे, शंकर पा. ढगे, मारोती पा.पवळे, वाजीद पठाण, गौतम सोनटक्के, भिमराव पटेकर, बाबु वाघमारे, दिपक पटेकर, सुनिल निलपत्रेवार, शेषेराव जोगदंड यांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी खरेदी विक्री संघांचे सभापती स्वप्निल पा. उमरेकर, धनजचे सरपंच पंजाबराव पा. माळेगावे, सुगावचे उपसरपंच विजय पा. जाधव, साईनाथ पा. सावळे, अविनाश पाटील उमरेकर, बालाजी पा. जाधव, बालाजी पा. शिंदे मोठया संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले


## ज्ञानेश्वर पाटील यांना कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ८ सप्टेंबर-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील ज्ञानेश्वर कृष्णात पाटील या खेळाडूने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने दि.३१ ऑगस्ट २०२४रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन ६३ किलो वजन गटातील ग्रीकोरोमन कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक संपादन केले आहे. मागील वर्षीही त्याने विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून विद्यापीठाचे प्रतिनिधित्व आंतरविद्यापीठ स्पर्धेत केले होते होते.



या क्रीडा यशाबद्दल ज्ञानेश्वर पाटील यांचे शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, उपसचिव पंकज बियाणी सर्व संचालक मंडळ, प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप पाटील, महाविद्यालयातील क्रीडा समिती यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ज्ञानेश्वर पाटील यांना महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजयकुमार हंडे यांचे मार्गदर्शन लाभले.



## संक्षिप्त वृत्त



### तलाठी अन् कृषी सहाय्यकांची बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे

**शिरूर अनंतपाळ, दि. ८ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ शहरात सततच्या पावसाने सोयाबीन व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या बाबतीत कृषी विभाग व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करावा व शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून द्यावी, अशी मागणी केली होती त्यानूसार शिरूर अनंतपाळचे तलाठी रामलिंग पाटील व कृषी सहायक वर्षा भोग यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करून पंचनामे केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, युवा शेतकरी सुचित लासूणे, गुंडेराव आवाळे गुरूजी, व्यंकट हांद्राळे, विनोद धुमाळे, सोमेश्वर तोंडारे, पिंटू गलबले, विश्वंभर लामतुरे, काशिनाथ अनकले, उदय बावगे, यश दुरूगकर, लाला मुजेवार, तानाजी वलांडे, खुर्शीद मुजेवार, जावेद तांबोळी आदी शेतकरी उपस्थित होते.



### युवा क्रांती गणेश मंडळातर्फे २२ जणांचे रक्तदान

**दैठणा, दि. ८ सप्टेंबर-**

दैठणा (ता. शिरूर आनंतपाळ) युवा क्रांती गणेश मंडळ दैठणा यांच्याकडून रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी सर्वात पहिला डोनर म्हणून प्रदुम्न पाटील यांचा सत्कार करण्यात आला. धनराज बिरादार, उत्तरेश्वर पाटील, रितेश हुले, अंतेश्वर बिरादार, प्रमोद पाटील, श्रीकांत पाटील, योगेश हुले, तुकाराम बिरादार, निलेश बिरादार, अक्षय शिवनखेडे, आकाश सांगवे, श्यामराव नमनगे, बद्रीनाथ सांगवे, गोविंद तोट, बळीराम पाटील, कृष्णा सूर्यवंशी, सुमित मदने, सुमित पाटील, मंगेश पाटील, समाधान एरोळे आदींसह २२ जणांनी रक्तदान केले. मंडळाचे अध्यक्ष अक्षय शिवनखेडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिबीर पार पाडण्यासाठी या भालचंद्र ब्लड बँकेचे कर्मचारी दिगंबर पवार जनसंपर्क अधिकारी सुनील जागीरदार, टेक्निकल सुपरवायझर इतर सहाय्यक कर्मचारी म्हणून संतोष पाटील, अरुण कासले, संजय ठाकूर, अमर बुरबुरे, सुरेखा हजारे यांनी परिश्रम घेतेले.



### क्रीडा मंत्री संजय बनसोडेंच्या हस्ते मानाच्या आजोबा गणपतीची आरती

**उदगीर, दि. ८ सप्टेंबर-**

मतदार संघात सर्व जाती धर्माला सोबत घेवुन गणेशोत्सवाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उदगीर शहरात विविध गणेशमंडळाकडुन सामाजिक प्रबोधनाचे देखावे सादर करुन समाजात जनजागृती केली जाते. उदगीर हे विविध क्षेत्रात अग्रेसर असणारे ऐतिहासिक शहर आहे. गणपती बाप्पांच्या आगमनाने मतदार संघात नवचैतन्य निर्माण झाले असून मानाच्या आजोबा गणपतीची आरती ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी सर्वांना सुख, समृध्दी आणि चांगले आरोग्य लाभो अशी श्री गणपती बाप्पाच्या चरणी क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी प्रार्थना केली. यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, सुभाष धनुरे, राजकुमार हुडगे, वसंत पाटील, मनोज पुदाले, विजय निटुरे, रामदास जळकोटे, प्रशांत मांगुळकर, मल्लेश झुंगा, सुरेश कुरुपखेळगे, धनंजय गुडसुरकर, आशिष अंबरखाने, अमोल निडवदे, डॉ. रवी मुळे, राजकुमार धनुरे, भारत करेप्पा, सुरज पोस्ते, गिरीश उप्परबावडे, प्रमोद हुडगे, रामेश्वर चांडेश्वरे, नागनाथ स्वामी, बबलु मुळे, विष्णू रंजीटे, यशवंत पाटील, राहुल धनुरे, गुरुनाथ धनशेट्टे, काशिनाथ अजुंरे, बाळु बागबंदे, आदेप्पा अजुंरे, सुरज चवळे, अमोल तिपन्ना, आनंद मुळे, राहुल धनुरे, भिम हाळे, राजकुमार कुरुपखेळगे, रमेश पांढरे उपस्थित होते. यावेळी मानाचा आजोबा गणपती, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ, संघर्ष मित्र मंडळ व श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ, रक्षाधिश गणेश मंडळ यांच्यासह विविध गणेश मंडाळाच्या पहिल्या श्री गणेशाची आरती ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विविध पक्षाच्या पदाधिका-यांसह गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाचट कपातीच्या निर्णयाबाबत कराडांचा दावा फेक

### कारखान्याच्या निर्णयाचेही श्रेय लाटण्याचे प्रयत्न; करांडाचा जीआर फंडा जुनाच

**मांजरा कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे यांची टीका**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ८ सप्टेंबर-**

शासनाकडून एखादा जीआर निघत असल्याची माहिती मिळताच, त्या जीआरशी संबंधित मागणी करायची आणि जीआर निघाला की मी मागणी केल्याने शासनाने निर्णय घेतला, असे भासवून लोकांना वेड्यात काढायचे. लोकांच्या भल्याचे काहीच काम न करता उठसूठ कोणत्याही कामाचे श्रेय घेण्याचा हा जुनाच फंडा आमदार रमेश कराड यांनी आता मांजरा कारखान्याने नुकत्याच पाचट कपातीसाठी घेतलेल्या निर्णयाला वापरला आहे. मीच मागणी केल्यामुळे कारखान्याने पाचट कपातीची रक्कम परत केल्याचा आमदार कराड यांचा दावा फेक असून जीआरच्या माध्यमातून सुरू असलेले श्रेयाचे फंडे त्यांनी मांजरा परिवाराच्या निर्णयासाठी वापरू नयेत, ते शासन जीआरपुरतेच मर्यादित ठेवावेत, असा सल्ला विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे यांनी दिला आहे.

मजुरांचा तुटवडा आणि कार्यक्षेत्रातील वाढते ऊसाचे क्षेत्र लक्षात घेता विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने गेल्यावर्षीच्या गळीत हंगामात देशात पहिल्यांदाच शंभर टक्के ऊसाची तोडणी हार्वेस्टरने केली. शंभर टक्के ऊसाच्या तोडणीचा प्रायोगिक तत्वावर राबवलेला प्रयोग होता. प्रयोगातून हार्वेस्टरने शंभर टक्के ऊसाची तोडणी या वर्षी व पुढील हंगामात नियमितपणे स्वरूपात राबवण्याचे नियोजन होते. प्रयोग म्हटले की चाचण्या कराव्याच लागतात. यामुळे सात टक्के पाचट कपातीसह काही प्रयोग व चाचणी घेण्यात आल्या.

हार्वेस्टरच्या साह्याने तोडलेल्या ऊसामध्ये पाचटीचे प्रमाण नियंत्रित रहावे व ते शासन धोरणानुसारच ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, अनेकदा सांगूनही काही हार्वेस्टरच्या ऑपरेटरकडून त्याचे पालन होत नव्हते. पाचटीचे प्रमाण आठ टक्क्यापेक्षाही जास्त येण्यास सुरवात झाली. त्याचा परिणाम नियमित गाळपावर होऊ लागला. यामुळे पाचटीपोटी सात टक्के वजन कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला व पाचट कमी आली उर्वरित अडीच टक्के वजनाची रक्कम परत करण्याचेही निश्चित करण्यात आले. या निर्णयानंतर ऊसातील पाचटीचे प्रमाण नियंत्रित होण्यास मदत झाली. त्यानंतर आधीच ठरल्याप्रमाणे पाचट कपातीचे दोन कोटी ३५ लाख २० हजार रूपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना परत करण्यात आले. कोणी मागणी केली असती किंवा केली नसती तरी ही रक्कम शेतकऱ्यांना परत करण्यात येणारच होती. गौरी गणपती सणाचे औचित्य साधून ती देण्यात आली. मात्र, कराड यांनी जीआरचा फंडा मांजरा साखर कारखान्याच्या निर्णयाला वापरत त्यांच्या मागणीची दखल घेऊन पाचट कपातीची रक्कम परत केल्याचा दावा केला असून तो चुकीचा (फेक) आहे. यामुळे श्रेयाचा फंडा त्यांनी जीआर पुरताच मर्यादित ठेवावा व मांजरा परिवारातील निर्णयासाठी यापुढील काळातही तो वापरू आणू नये, कारण त्यावर ऊस उत्पादक शेतकरी व कोणीच विश्वास ठेवणार नाही, असा सल्लाही श्री. उटगे यांनी दिला आहे.

**श्रेय लाटले, आता ई-पीक पाहणी रद्द झाल्याचा जीआर काढून दाखवा**

सोयाबीन व कापसाच्या अनुदानासाठी शासनाने ई - पीक पाहणीची अट घातली आहे. आमदार कराड यांनी ही ई - पीक पाहणीची अट शासनाने त्यांच्या मागणीनंतर शिथिल केल्याचा दावा २० ऑगस्ट रोजी प्रसिद्धीपत्रक काढून केला होता. त्यासंबंधित जीआर (शासन निर्णय) निघण्यापूर्वी कराड यांनी श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला. मात्र, अजून जीआर निघाला नाही. श्रेय लाटण्याची घाई केली तशी जीआर काढण्यासाठी शासनाने पाठपुरावा करून सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही. उटगे यांनी केली आहे



### 'कॉक्सिट'चे वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश

**लातूर, दि. ८ सप्टेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व जयक्रांती बी. एड. कॉलेज, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच वेटलिफ्टिंग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत कॉक्सिट महाविद्यालयाच्या हर्षद पाटील हर्षद याला गोल्ड मेडल, मुकुंद मुरकुटे आणि विष्णू आगे यांना सिल्वर मेडल तर अभिषेक बिराजदार ब्रांझ मेडल मिळाले.

या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत कॉक्सिट महाविद्यालयाचे नावलौकिक केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही.व्ही. भोसले, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, प्लेसमेंट ऑफिसर कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे, क्रीडा संचालक प्रा. बी. बी. देवडे आदींनी अभिनंदन केले.

## लातूर जिल्हा बँकेत श्रींची स्थापना उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ८ सप्टेंबर-**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गणपती बाप्पा मोरया मंगल मूर्ती मोरया या ढोल ताशांच्या गजरात गणरायांचे मिरवणुकीने आगमन झाले जिल्हा बँकेच्या मुख्यालयात किसान बँक स्टॉप गणेश मंडळाच्या वतीने शनिवारी श्रींची प्रतिष्ठापना पुजा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव यांच्या सुविध पत्नी रेखा जाधव यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी किसान बँक स्टॉप गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



किसान बँक स्टॉप गणेश मंडळ २०२४ची कार्यकारणी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख बँकेचे चेअरमन तथा गणेश मंडळांचे पदसिद्ध अध्यक्ष आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली यावर्षीची कार्यकारणी करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, येरटे, मुळे, मलवाडे खाडप, कोळपे, अमोल सूर्यवंशी पवार, सुनील पाटील, देशमुख, फील्ड ऑफिसर माने, बेग, शिंदे, दाडगे, जाधव, माले उपस्थित होते. यावेळी किसान बँक गणेश मंडळाच्यावतीने आरतीचे यजमान बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, रेखा प्रमोद जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

## तलवारबाजी स्पर्धेत अहमदपूरचे जानव्ही जाधव, वैभवी माने यांना रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ८ सप्टेंबर-**

२ ते ५ सप्टेंबर दरम्यान मलेशिया येथील कॉलालंमपुर येथे ऑलिम्पिक काऊन्सिल ऑफ मलेशियाद्वारा आयोजीत करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेअंतर्गत एशियन कॅडेट कप २०२४ करीता फेंसिंग असोशियशन ऑफ इंडिया कडून भारतीय संघात निवड झालेल्या खेळाडूमध्ये यामध्ये अहमदपूर येथील जान्हवी गणपतराव जाधव व वैभवी प्रशांत माने यांची तर खुशी खुशी (हरियाणा), बेंनी रिब्बा (छत्तीसगड). या चार भारतीय खेळाडूंनी धडाकेबाज कामगिरी करत देशाला रौप्य पदक मिळून दिले.



जान्हवी आणि वैभवी यांचे अभिनंदन भारतीय व महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष सतेज बंटी पाटील, महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे मार्गदर्शक छत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक दुधारे, महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे कार्याध्यक्ष शिवाजी राजेजाधव, उपाध्यक्ष प्रकाश काटोळे, सचिव प्राध्यापक डॉ. उदय डोंगरे, कोषाध्यक्ष राजकुमार सोमवंशी मार्गदर्शक जीवनगौरव पुरस्कार विजेते गणपतराव माने, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ताभाऊ गलाले. प्रा.अभिजीत मोरे, तुषार आहेर, क्रीडा शिक्षक संतोष कदम, प्रशांत माने, ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, मोसिन शेख, आकाश बनसोडे, वजीरोद्दिन काझी, डॉ. रोहत गलाले, वैभव कज्जेवाड सूरज कदम भाऊराव कदम, बबलू पठाण यांनी अभिनंदन केले.

## लातूर-औसा महामार्गावर अपघात

**जखमींना विलासराव देशमुख रुग्णालयात उपचारासाठी दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ८ सप्टेंबर-**

लातूरकडून औसाकडे जाणाऱ्या कारचा दुचाकीला चुकवण्याच्या प्रयत्नात अपघात झाला. लातूर-औसा महामार्गावर रविवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजल्याच्या सुमारास कारंजे-खडी केंद्राजवळ दुचाकी आणि कारचा अपघात झाला. या अपघातातील जखमींना लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

लातूरहून अशा मार्गावर जाणाऱ्या खडी केंद्राजवळ एका अज्ञात दुचाकीला चुकवण्याच्या प्रयत्नात भरधावक कारचा अपघात झाला आहे. या अपघातातील कार एवढी भरधाव होती की लातूरहुन औसाकडे जाणारी कार दुभाजकावरून दुसऱ्या मार्गावरील रस्ता ओलांडून कारंजे खडी केंद्राच्या खदानीच्या काठाला



जाऊन थांबली. जर ही कार आणखी थोडे पुढे गेली असती तर या खदानित असलेल्या पाण्यामध्ये जाऊन पडली असती आणि मोठा अपघात झाला असता. या अपघातामध्ये दुचाकी वरील आणि कार मधील ते पाच व्यक्ती जखमी झाल्याचे कळते. औसा लातूर या मार्गावर सातत्याने अपघात होत आहेत याबाबत वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे गतिरोधक निर्माण करण्याची मागणी होत आहे. जे गतिरोधक निर्माण करण्यात आले आहेत. ते अत्यंत तकलादू असून अशी भरदार वाहने सहज पार करत आहेत. याकडे प्रशासनाने लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## कर्जमुक्त करुन सोयाबीनला ९ हजार रुपये भाव द्या

### कवळी ग्रा. पं. ने ग्रामसभेने ठराव मंजूर करुन वेधले जिल्ह्याचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ८ सप्टेंबर-**

गेल्या चार पाच वर्षापासून झालेल्या नापिकीत मिळणाऱ्या कमी भावामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या शेतर्कयांना आत्महत्येपासून रोखण्यासाठी संपुर्ण कर्जमुक्ती करुन सोयाबीनला नऊ हजार रुपयेचा भाव द्यावा. चालू वर्षासह गेल्या वर्षीचा पीक विमा तात्काळ द्यावा व कांद्यावरील निर्यातबंदी कायमस्वरुपी रद्द करावी. या प्रमुख मागण्यासह शासनाचे धोरण आणि शेतकऱ्यांचे मरण अशा अनेक विषयावर चर्चा करीत औसा तालुक्यातील कवळी येथील गावकाऱ्यांनी ग्रामसभेत ऐतिहासिक ठराव एकमुखाने मंजूर करुन लातूर जिल्ह्याचे लक्ष वेधले.

कवळी येथे ग्रामपंयत अंतर्गत ग्रामसभा झाली. महिला सरपंच राहीबाई लहू चव्हाण अध्यक्षस्थानी होत्या .यावेळी शेतकरी नेते राजेंद्र मोरे यांनी सरकारच्या आयात व निर्यात धोरणामुळे शेतकरी कसा उध्वस्त झाला आहे .त्यांच्या घामाची कवडीमोल किंमत होत असल्याने कर्जाचा डोंगर डोक्यावर वाढत आहे. शेती पिकविण्यासाठी बि-बियाणे, रासायनिक खत, किटकनाशकं, मशागतीचा खर्च आजच्या आधुनिकीकरणात वाढला आहे. पिकाचे मिळणारे उत्पन्न झालेल्या खर्चाचा ताळमेळ जुळत नसल्याने शेतर्कयांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरत नाही. यामुळे शेतकरी नापिकीच्या आणि मिळणाऱ्या भावाच्या नैराश्येतून आत्महत्या करीत असून यामध्ये वाढ होत आहे. अशा प्रश्नावर यावेळी चर्चा करण्यात आली. ग्रामसेवक एन.टी. रायफळे, उपसरपंच सुनीता महादेव जगताप, ग्रामपंचायत सदस्या विनया शिंदे, सुशीला माळी, स्वप्नाली गायकवाड, शिवाजी करंडे, समाधान जगताप, निवृती भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, पीक विमा तात्काळ द्यावा, सोयाबीनला भाव द्यावा अशा मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर जिजाऊ माँ साहेब यांच्या मातृतीर्थ सिंदखेड



राजा येथे आमरण उपोषण करीत आहेत. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सत्तार पटेल, अरुण कुलकर्णी, अशोक दहिफळे, राजीव कसबे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते वेगवेगळ्या प्रकारे सरकारचे लक्ष वेधण्याचे आंदोलन करीत आहेत. तरीही सत्तेच्या मस्तीतील सरकारला जाग येत नाही. त्याचाच भाग म्हणून संपूर्ण राज्यात निवेदन देत सरकारचा अत्यंत तीव्र स्वरूपात निषध व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर व निराधार लोकांच्या प्रश्नावर यावेळी चर्चा घडवून आणली. या चर्चे नंतर सोयाबीनला ९००० रुपये प्रतीक्विंटल भाव मिळावा, २०२३ चा पीकविमा मिळावा, सतत चार पाच वर्ष शेतीमालाला भाव कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी तसेच २०२४ मधील अतिवृष्टी अनुदान व पीकविमा तात्काळ मिळावा, ठिबक तुषार सिंचन अनुदान तात्काळ मिळावे, कांद्यावरील निर्यात बंदी अट कायमस्वरूपी रद्द करावी, साखरेला ४००० रुपये प्रतीक्विंटल भाव मिळावा, ई-पिकपाहणीची अट कायमस्वरूपी रद्द करावी. अशा मागण्याबाबत ग्रामसभेत चर्चा होऊन एकमुखाने ठराव मंजूर करुन सरकारचे लक्ष वेधले आहे.